
# तांबट

प्रल्हाद जाधव

ग्रंथाली



ग्रंथाली प्रकाशन क्रमांक ५६७
ISBN NO.978-93-80092-76-8

# तांबट

पहिली आवृत्ती
२५ ऑक्टोबर २०१३

© प्रल्हाद जाधव
१४-सागर, बी रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०

प्रकाशन
ग्रंथाली
वुलन मिल म्युनि. स्कूल, तळमजला, खोली क्र.९,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई-४०० ०१६.
दूरध्वनी : २४३० ६६२४/ २४२१ ६०५०
Email : granthali01@gmail.com

अक्षरजुळणी
ग्रंथाली संगणक विभाग

मुद्रण
इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाउस,
४२, जी.डी.आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई-४०० ०३१


मुखपृष्ठ । रेखाटने
गोपी कुकडे

मांडणी
प्रा. विजय जामसंडेकर

मूल्य
१५० रुपये

अनुवादाचे हक्क लेखकाकडे राखीव.
मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, वेब किंवा
रंगभूमी-चित्रपटासारख्या माध्यमांतील
कोणत्याही प्रकारच्या रुपांतरापूर्वी
लेखकाची परवानगी आवश्यक.

खरं तर
तांबटाचं आणि माझं नातं
शब्दांपलीकडचं आहे...








' Bird -watching is economical, it saves going to heaven.'

**- Emily Dikinson**

**आभार**

मारुती चितमपल्ली ।  दिनकर गांगल । श्रीनिवास विनायक कुलकर्णी ।
सुदेश हिंगलासपूरकर । शिरीष वीरकर । विनोद पवार । दिलीप चावरे ।
सुरेश वाघे । शरद चव्हाण । नीलिमा धोदरे । नारायण बांदेकर ।





■■

मुंबईला वांद्र्याच्या शासकीय वसाहतीत आम्ही जवळपास दहा वर्षं राहत होतो.

नागपूरहून मुंबईला बदली झाली तेव्हा 'घराचं काय होणार' हा प्रश्न आ वासून समोर उभा होता. कारण मुंबईत घर मिळवायचं म्हणजे अवघड गोष्ट! मिळालंच तर ते आपल्या मनासारखं असणं ही आणखी अवघड गोष्ट! दोन-अडीच वर्षं पनवेलला आणि सानपाड्याला काढल्यानंतर वांद्र्याला 'बी-टाइप'मध्ये दोन खोल्यांचं छोटंसं घर मिळालं.

घर लहान आहे अशी तक्रार नव्हती; पण ते इमारतीच्या मधोमध असल्यामुळे तिथं थेट सूर्यप्रकाश यायचा नाही. मोकळी हवा यायची नाही. गुदमरल्यासारखं, खुराड्यात कोंडून घेतल्यासारखं वाटायचं.

तळमजल्याच्या काही खोल्यांच्या भिंती पडल्यामुळे त्या वापरात नव्हत्या. त्या मोकळ्या जागेचा वापर रहिवासी कचरा टाकण्यासाठी करत. जाता-येता, कचऱ्याचा कुबट वास येई. बऱ्याचदा, तिथं डुकरं पडून असायची. आजूबाजूला कुत्री भटकायची. रंग उडालेल्या भिंती, धूळ, पिचलेली कुटुंबं, वैफल्यग्रस्त कर्मचारी असं नकारात्मक वातावरण असायचं. सर्वत्र उदासीनता आणि असुरक्षिततेची भावना भरून राहिलेली असायची.

पहिल्याच दिवशी, तिथं आमच्या स्कूटरचं कव्हर चोरीला गेलं, त्यामुळे त्या जागेविषयी मनात अढी निर्माण झाली.

त्यानंतर महत्प्रयासानं दुसरं घर 'वाय-टाइप'मध्ये मिळालं. तेसुद्धा इमारतीच्या मधोमध असल्यानं गैरसोयीचं होतं. अंधार, ओल, मोकळ्या हवेचा अभाव यांमुळे तिथंही जीव रमत नव्हता. एकाही खोलीतून थेट सूर्यप्रकाश किंवा मोकळी हवा येत नसल्यामुळे गुहेत राहत असल्यासारखं वाटायचं. खोल्या आकारानं पहिल्या जागेपेक्षा थोड्या मोठ्या होत्या, एवढंच काय ते समाधान!

मनासारखं घर कधी मिळणार याची वाट पाहत आम्ही दिवस काढत होतो. ते बदलून मिळावं यासाठी प्रयत्न सुरू होतेच.

अखेरीस,'वाय-टाइप'मध्येच एक क्रमांकाच्या इमारतीत दुसऱ्या माळ्यावरचं पूर्वेकडचं घर मिळालं. भरपूर प्रकाश, मोकळी हवा, सगळ्या खोल्यांतून दिसणारी झाडं आणि मोकळं आकाश यांमुळे मी खूष झालो. पत्नी सुरेखा आणि मुलं आशय व अनुराग, सारे आनंदित झाले.

या नव्या घरातील हॉलला लागून पूर्वेकडे असणाऱ्या गॅलरीतून गुलाबी कॅशियाचं भलं मोठं झाड दिसायचं. त्याच्या बाजूला करंज, गुलमोहोर, भेंडी अशी झाडं होती. भेंडीच्या पलीकडचं सोनमोहोराचं भलंमोठं झाड, रस्त्याच्या पलीकडे सदैव सळसळणारा पिंपळ, डावीकडे रस्त्याच्या बाजूनं रांगेत उभी असलेली अशोकाची पाच-सहा झाडं, त्यापलीकडचं मैदान आणि मैदानाच्या कडेची लहानमोठी अनेक झाडं नेहमी नजरेत भरत.

स्वयंपाकघरात आलो की तिथल्या खिडकीतून कॅशियाचा पिसारा अधिक जवळून दिसायचा. कॅशियाच्या उंच फांदीवर बसलेल्या पक्ष्यांनाही तिथून आमच्या सर्व हालचाली दिसत असणार. एखादा खमंग पदार्थ शिजत असेल तर कावळे थेट खिडकीच्या

तावदानावर येऊन बसत आणि आपला हिस्सा मिळवूनच उडून जात!

पहाटे पहाटे, कॅशियावर बुलबुल परस्परांशी खेळताना दिसत. त्यांची 'ए टिटूऽऽऽ' ही गोड शीळ मनाला भुरळ घालायची. ते आम्हांला जागं करायला आलेत आणि 'ए उठाऽऽऽ' असं म्हणताहेत असं वाटायचं.

स्वयंपाकघर ओलांडून पहिल्या बेडरूममध्ये आलं की एका खिडकीतून गुलमोहोर तर दुसऱ्या खिडकीतून जांभूळ, नारळ आणि पांगाऱ्याची झाडं अगदी जवळून दिसायची. त्यांची फळं, फुलं, बहर, पानगळ सारं केवळ नजरेनं टिपता यायचं. गुलमोहोर फुलला की तो लालबुंद प्रसन्न फुलांचा गुच्छ घेऊन आपल्या स्वागतासाठी बाहेर उभा आहे असं वाटायचं.

ती खोली ओलांडली की दुसरी बेडरूम. त्या बेडरूमला एक मोठी गॅलरी होती. गॅलरीतून जांभूळ, पांगारा, नारळ ही झाडं तर दिसायचीच पण त्यांच्या मागच्या रांगेत असणारी बदाम, फणस, वड ही झाडंही दिसायची. खालच्या चाळवजा इमारतीत बांधकाम विभागाची एक छोटी चौकी, एक गोदाम, वाण्याचं दुकान, दवाखाना आणि एक केशकर्तनालय होतं. अर्थात वरून चाळीचं फक्त छप्पर दिसायचं. त्याही पलीकडे रांगेनं उभ्या असलेल्या 'ए टाइप'च्या इमारती नजरेत भरायच्या. पांगारा, जांभूळ समोरच असल्यामुळे त्यांच्या पानांची सळसळ, त्यांवरील पक्ष्यांचे चित्कार घरातच अनुभवल्यासारखे वाटायचं.

बाहेरील खोलीच्या तुलनेत बेडरूमकडे प्रकाश किंचितसा कमी पण हवा अधिक आल्हाददायक असायची. अगदी छान, थंड वाटायचं. बाहेर ऊन जाणवायला लागलं की आम्ही या खोलीत येऊन बसायचो.

बाहेरच्या गॅलरीत उभं राहून समोर पाहिलं की उजवीकडे 'बेस्ट'चा वाहनतळ दिसायचा. तिथं गाड्यांची ये-जा सुरू असायची. एकीकडे रिक्षा तर दुसरीकडे टॅक्सी ह्यांची गर्दी असायची. डावीकडच्या पटांगणात सतत काही ना काही कार्यक्रम सुरू असायचे. कधी एखाद्या राजकीय पक्षाची सभा, कधी मेळावा, तर कधी जत्रा! सुट्टीच्या दिवशी मुलांचे क्रिकेटचे सामने ठरलेले! लाऊड स्पीकरवरून सामन्यांचं समालोचन सुरू असायचं. ते ऐकत ऐकतच आमची घरातली कामं चालायची.

फिरायला बाहेर पडलं आणि चार-पाच इमारती ओलांडल्या की मधल्या मोकळ्या जागेत

वडाची दोन मोठी झाडं दिसायची. त्यांतलं एक नंतर पडून गेलं. वडाच्या बाजूला नीर फणसाचं उंच शिडशिडीत झाड होतं. त्याची हिरवीगार, काटेरी फळं आपल्या वेगळेपणामुळे लक्ष वेधून घ्यायची. तेही नंतर सुकून गेलं. पांगारा आणि गुलमोहोराची झाडं मात्र तग धरून होती.

पटांगणाच्या भोवती विविध प्रकारची झाडं होती. त्यांचे फळां-फुलांचे, पानगळीचे उत्सव वर्षभर सुरू असायचे. तिथं विविध पक्ष्यांचा सदैव वावर असायचा. या झाडांखालून एखादी चक्कर जरी मारून आलं तरी एकदम ताजंतवानं वाटायचं.

'वाय-टाइप'मधील दहा-बारा इमारती सोडल्या तर बाहेर वसाहतभर 'ए' आणि 'बी' टाइपच्या असंख्य इमारती पसरलेल्या होत्या. तिथं माणसांची, वाहनांची वर्दळ सुरू असायची. किराणा, भाजीपाला, हॉटेलं, रस्त्यावरचे विक्रेते आणि हातगाड्या ह्यांची कायम गर्दी असायची.

'वाय-टाइप'चं मुख्य प्रवेशद्वार ओलांडून बाहेर आलं की रस्ता. रस्त्याच्या पलीकडे वाहनतळ. तो ओलांडून पुढे गेलं की बांधकाम विभागाचं मोठं कार्यालय. वसाहतीतील इमारतींची देखभाल-दुरुस्ती, पाणीपुरवठा, वीज, साफसफाई यांसारखा बराचसा कारभार तिथनं चालायचा. या कार्यालयाभोवती वड, पिंपळ, करंज, बदाम, नारळ, जांभूळ, शिरीष अशा झाडांची गर्दी होती. वसाहतीतील सर्वांत उंच आणि घनदाट म्हणता येतील अशी झाडं होती ती! सकाळ-संध्याकाळ विविध पक्ष्यांच्या कलकलाटानं ती गजबजून गेलेली असायची.

तिथून थोडं पुढे गेलं की महात्मा गांधी विद्यामंदिर! तिथं विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांची नेहमी गर्दी असायची. सुट्टीच्या दिवशीही तिथं काही ना काही कार्यक्रम सुरू असायचे.

विद्यालयाकडून सरळ पुढे गेलं की 'बेस्ट'चा दुसरा वाहनतळ लागायचा. वाहनतळाच्या समोरून थोडं आत गेलं की 'बी-टाइप' इमारतींच्या गर्दीत मधोमध 'जॉगर्स पार्क'! अर्थात हे नंतरच्या काळात उभारलं गेलं. तिथं आम्ही अधूनमधून फिरायला जायचो.

सामानसुमान लावून स्थिरस्थावर झाल्यावर, सुट्टीच्या एका दिवशी संध्याकाळी पांगाऱ्याकडच्या गॅलरीत मी उभा होतो. समोर, जांभळीच्या फांद्या डोलत होत्या. हवेच्या झुळुकांसमवेत पानांची सळसळ सुरू होती. अशातच एका पक्ष्यानं माझं लक्ष वेधून घेतलं.

आकारानं चिमणीपेक्षा थोडा मोठा आणि रंगानं हिरवागार. कपाळावर गंध लावल्यासारखा रक्तवर्णी ठिपका. मानेवरही तसाच एक ठिपका आणि त्याच्याखाली पसरलेला फिकट पिवळा रंग. उगवत्या सूर्याचं चित्र काढलं आणि ते उलटं धरून पाहिलं तर जसं दिसेल तसा त्याच्या मानेवरचा ठिपका मनमोहक भासत होता.

पाय जागीच खिळल्यासारखा मी उभा होतो. हा पक्षी मी पूर्वी कधी पाहिलेला नव्हता. काही क्षणांनी, दुसरा एक तसाच पक्षी तिथं आला आणि त्या दोघांची आपापसात दंगामस्ती सुरू झाली. मला गंमत वाटली. मी अनुरागला हाक मारून त्याला ते पक्षी दाखवले. ते वेगळे आणि देखणे पक्षी पाहून तोही खूष झाला.

कोणते पक्षी असतील बरं ते?

दोन-तीन मिनिटांचंच त्यांचं दर्शन; पण मनात मात्र ते जणू कायमच्या वास्तव्याला आले!

मी मित्रांना विचारलं, पुस्तकात शोधाशोध सुरू केली, पण काही उपयोग होत नव्हता. नुसत्या ढोबळ वर्णनावरून पक्षी ओळखून दाखवणं हेही तसं अवघडच होतं. माझे मित्र आणि प्रसिद्ध पक्षिनिरीक्षक मारुती चितमपल्ली लेखनासाठी कुठेतरी बाहेर गेल्यामुळे फोनवर सापडत नव्हते. अशा परिस्थितीत एकच मार्ग उरला होता, तो म्हणजे त्या पक्ष्यावर लक्ष ठेवून त्याच्याविषयी अधिकाधिक माहिती मिळवणं, त्याचं नाव शोधून काढणं.

पक्ष्यांची बाहेर पडायची खात्रीची वेळ म्हणजे सकाळ आणि संध्याकाळ. मी त्या वेळी आवर्जून गॅलरीत येऊन उभा राहू लागलो. त्या पक्ष्यानंही मला आठ-पंधरा दिवसांत दोन-तीन वेळा दर्शन दिलं. त्यामुळे त्याच्या रंगरूपाचे आणखी काही बारकावे टिपून घेता आले. संमोहित झाल्याप्रमाणे मी त्याच्याकडे अधिकाधिक ओढला जात होतो.

जाड-भरड चोच, आखूड शेपटी, काळ्या डोळ्यांभवती वरून आणि खालून पिवळ्या रंगाचं अर्धवर्तुळ, मानेखाली पोटाच्या दिशेनं उतरणारे हिरव्या-पिवळ्या रंगाचे फटकारे आणि चोचीच्या बुडातून वर आलेले मिश्यांसारखे केस माझ्या नजरेत भरले होते. मात्र पक्षी नेमका कोणता याचा पत्ता लागत नसल्यानं अस्वस्थ झालो होतो.


एक दिवस तो तिढा सुटला.

एकदा गॅलरीत उभा असताना त्यांतला एक पक्षी चक्क आवाज काढताना दिसला.

चोच आणि शेपटी धनुकलीसारखी आतल्या बाजूला वाकवत तो,
'टुक्... टुक्...'
'टुक्... टुक्...'
असा आवाज काढत होता. मी पुन:पुन्हा खात्री करून घेतली. होय, त्याचाच आवाज होता तो. त्यावरून पक्ष्याच्या नावाचा शोध लावता येणं सोपं झालं होतं.

पहिल्यांदा वाटलं, की तो सुतारपक्षी असणार. सुतारपक्षी  झाडावर बसून 'टुक्... टुक्...' करतो असं लहानपणापासून मनावर बिंबलं होतं. दुसरा विचार मनात होता तो तांबट पक्ष्याचा. नेमका अंदाज येईना म्हणून 'विश्वकोश' काढून त्यातली माहिती चाळायला सुरुवात केली. आधी 'तांबट' पक्ष्यावरील नोंद मिळाली. अंदाज खरा निघाला. बारीकसारीक तपशिलांसह त्यात तांबटाचं वर्णन दिलेलं होतं. जीव भांड्यात पडला.

अनुभवाच्या पुस्तकात एका नव्या पक्ष्याची नोंद झाली. तांबटाशी नातं जोडलं गेलं. हे नातं एवढ्यापुरतंच मर्यादित राहणार नसून दिवसेंदिवस अधिक गहिरं होत जाणार आहे ह्याची मला त्या वेळी कल्पनाही नव्हती!



'टुक्... टुक्...'
'टुक्... टुक्...'
हा आवाज माझ्या चांगल्या ओळखीचा झाला. तो कानी पडला की मी बाहेर पळायचो आणि तांबटांचा शोध घ्यायला लागायचो. ते असायचे कधी जांभळीवर, कधी पांगाऱ्यावर, कधी गुलमोहोरावर तर कधी गुलाबी कॅशियावर! कधी त्यांचं दर्शन घडायचं तर कधी नुसता आवाज ऐकू यायचा. आवाजावरून कधी ते जांभळीवर बसलेत असं वाटायचं, पण प्रत्यक्षात ते कॅशियावर बसलेले असायचे. कधी आवाज कॅशियाकडून येतोय असं वाटलं आणि तिकडे गेलो तर ते जांभळीवर बसल्याचं आढळून येई. कधी अखंडपणे चार-चार, पाच-पाच मिनिटं त्यांचं 'टुक्... टुक्...' चाललेलं असायचं तर कधी ते अर्ध्या-पाऊण मिनिटांतच संपून जायचं!

'टुक्... टुक्...'चा तो आवाज आमच्यामध्ये संबंधांचं एक जाळं विणू पाहत होता. दिवसेंदिवस ते जाळं अधिकच मजबूत होऊ लागलं. तांबटाविषयी अधिकाधिक जाणून घ्यावं असं उत्कटपणे वाटू लागलं. ते कुठं राहतात, काय खातात, त्यांचं कुटुंब कसं असतं, यांसारखे अनेक प्रश्न पडत होते.

एकदा गॅलरीत उभा होतो. जांभळीवर तांबट दिसला. मी नजरेनं त्याचा पाठलाग करू लागलो. खेळता खेळता, त्यानं एक छोटी भरारी घेतली आणि तो गॅलरीच्या समोर असणाऱ्या पांगाऱ्याच्या फांदीवरील ढोलीत शिरला. माझा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वास बसेना. पांगाऱ्याच्या झाडात अशी एखादी ढोली असेल याची तोवर मला कल्पना नव्हती. ते दृश्य नजरेआड होऊ नये म्हणून ढोलीवरून दृष्टी न हलवता मी एकटक तिथं पाहू लागलो.

काही क्षणांनी आत गेलेला तांबट बाहेर पडला आणि माझी खात्री पटली. तांबट इथंच राहतो तर! आपल्या शेजारी! आपल्या घराच्या गॅलरीपासून जेमतेम पंचवीस फुटांच्या अंतरावर! क्षणभर विश्वास बसेना पण ते गोड वास्तव होतं.

इतके दिवस कधी न दिसलेली ढोली नजरेस पडली होती. आश्चर्य वाटलं. अनेकदा आपल्या विचारात आपण एवढे मग्न असतो की डोळे उघडे असले तरी समोरच्या गोष्टी दिसतात असं नाही. मी अनुरागला हाक मारली. त्याला ढोली दाखवली. तिथं ढोली आहे हे इतके दिवस आमच्या कुणाच्याही लक्षात आलेलं नव्हतं. तोही आश्चर्यचकित झाला.

मग तांबटाचं ढोलीत शिरणं आणि बाहेर पडणं पाहत राहायचं हा आमचा नवा छंदच झाला. दोन्ही तांबटांचं दिवसभर इकडून तिकडे फिरणं आणि 'टुक्... टुक्...' करणं सुरू असायचं, कारण मात्र लक्षात येत नव्हतं.

निरीक्षणात जीव लावला, पक्षिनिरीक्षणाशी संबंधित मिळतील ती पुस्तकं वाचत गेलो आणि मग अनेक गोष्टी समजत गेल्या. काही दिवसांतच लक्षात आलं. दोन्ही तांबट सारखे ढोलीच्या आत-बाहेर करतात, याचा अर्थ ढोलीत त्यांची अंडी आहेत. जोडीनं फिरतात याचा अर्थ त्यांच्यापैकी एक नर आणि एक मादी आहे. अर्थातच आई आणि बाबा. ज्याचे रंग गडद ते बाबा आणि रंग फिकट ती आई आहे.

हे दोन्ही तांबट झाडांवर विविध ठिकाणी बसून सारखं 'टुक्... टुक्...' का बरं करत असतील? उत्तर अगदी सोपं होतं. ढोलीत त्यांची अंडी आहेत, अंड्यांमधले जीव वाढीला लागले आहेत आणि त्या जीवांसाठी तांबट गाणं गात आहेत. 'बाळांनो, आम्ही तुमच्या सोबतीला आहोत. काळजी करू नका' असं जणू त्यांना सांगत आहेत.

आई बाळाला कुशीत घेते, वासरू गाईला लुचतं, कासवी आपल्या प्रेमळ नजरेवर पिल्लांना वाढवते. पण पक्षी अंड्यातल्या पिल्लांवरचं आपलं प्रेम कसं व्यक्त करत असतील? अर्थातच गाणी गाऊन! विणीच्या हंगामात त्यांचा आवाज अधिक गोड आणि हळवा का झालेला असतो, हे यथाकाल लक्षात आलं.

तांबटांच्या नादात इतर पक्ष्यांकडेही आपोआप लक्ष जाऊ लागलं. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत अवतीभवती काहीना काही घडत राहायचं. मनातल्या मनात त्याची नोंद व्हायची.

आमची पहाट व्हायची ती कावळ्यांच्या आवाजानं. ते साडेचार-पाचपासून ओरडायला लागायचे. त्यांच्या ओरडण्याला कर्रऽऽऽ, क्रऽऽऽ, क्रॉऽऽऽ, काऽऽऽ यांसारख्या वेगवेगळ्या छटा असायच्या. पहाटेपासून सुरू झालेलं त्यांचं कोकलणं दिवसभर सुरू असायचं. इतकंच काय पण अंधार पडून रात्र झाली तरीही कुठून ना कुठून त्यांचा आवाज यायचा.

कावळ्यांना वाटायचं की ते इथले राजे आहेत! त्यांच्या हद्दीत इतर पक्ष्यांनी येऊ नये, फळा-फुलांचा स्वाद घेऊ नये, घरटी बांधू नयेत यासाठीही ते दक्ष असायचे. अवतीभवती घडणाऱ्या सगळ्या घडामोडींची जबाबदारी जणू त्यांच्यावर आहे अशा थाटात ते वावरत असायचे.

वसाहतीत वाणसामानाचं दुकान चालवणारा एक वृद्ध व्यापारी अधूनमधून कावळ्यांसाठी काही ना काही खाऊ घेऊन यायचा. कधी बिस्किटं, कधी फरसाण तर कधी आणखी काही... त्यानं आपल्या हातातली पुडी कुंपणाच्या भिंतीवर ठेवली रे ठेवली की कावळ्यांचा एकेक गट त्यावर तुटून पडायचा. प्रत्येक कावळा चोचीत सापडेल ते घेऊन पसार व्हायचा. तो व्यापारी जेव्हा मूठ मूठ फरसाण ठरावीक अंतरानं टाकत पुढे जाई तेव्हा ते कावळे जणू काही त्यानं पाळलेले असावेत अशा थाटात त्याच्या मागनं चालत जायचे!

एखाद्या कावळ्याला जोरदार भूक लागली असेल तर सकाळी सकाळी तो आमच्या स्वयंपाकघरातील खिडकीच्या तावदानावर बसून जोरजोरानं कोकलत राहायचा. मग त्याला पोळी किंवा पावाचे तुकडे नेऊन द्यावे लागत. अशा वेळी, इतरही कावळे जमायचे. वरून टाकलेल्या पोळीचा किंवा पावाचा तुकडा कुठे पडतोय हे एखादा कावळा आपल्या तीक्ष्ण नजरेनं नेमकं हेरायचा आणि अचूक उचलून पळ काढायचा. तुकडा जर पांगाऱ्याच्या आडव्या फांदीवर टोकाशी बसलेल्या कावळ्याच्या दिशेनं फेकला तर कावळा तो हवेतल्या हवेत झेली आणि पसार होई. अशा वेळी, बाकीचे कावळेही 'काऽऽऽव, काऽऽऽव' करत तिथं जमत आणि सारा परिसर डोक्यावर घेत.

कावळ्यांच्या मारामाऱ्या पाहण्यासारख्या असत. एकमेकांच्या पायात पाय, चोचीत चोच अडकावून उलटेपालटे होत ते पार अगदी जमिनीपर्यंत पोचत. ते जमिनीवर आपटणार असं वाटे तोच पुन्हा वेगवेगळे होऊन, परस्परांच्या विरुद्ध दिशेनं वर जाऊन एखाद्या फांदीचा आसरा घेत पुन्हा नव्यानं भांडण्यासाठी सज्ज होत.

एकदा, दुपारची वेळ होती. वारा पडला होता. झाडाचं पानंही हलत नव्हतं. दूरवर कुठंतरी तांबटाची 'टुक्... टुक्...' सुरू होती. एवढ्यात बाहेरून 'क्रऽऽऽ' असा प्रेमळ आवाज आणि त्याला मिळालेला 'क्रॉऽऽऽ' असा तितकाच जिव्हाळ्याचा प्रतिसाद कानी पडला. बाहेर आलो आणि पाहू लागलो.

अर्धवर्तुळाकार म्हणता येईल असा तारेचा एक मोठा तुकडा चोचीत घेऊन एक कावळा जमिनीवरून अलगद उडाला आणि छोटीशी भरारी घेऊन कुंपणाच्या भिंतीवर येऊन बसला. तार चोचीच्या एका बाजूला झुकत असल्यानं त्याचा तोल जात होता. त्यानं मान वर करून, चोच वासून तार वरच्यावर तोलत तिचा मध्य बरोबर चोचीत आणला. आता, तार एका बाजूला झुकण्याचा किंवा कावळ्याचा तोल जाण्याचा प्रश्न येणार नव्हता.

त्यानं आणखी एक उडी घेतली आणि तो जांभळीच्या खालच्या फांदीवर जाऊन बसला. त्यानंतर पायऱ्या चढाव्या त्याप्रमाणे एकेका फांदीवर चढत काळजीपूर्वक आणि तितक्याच जबाबदारीनं तो जांभळीच्या शेंड्याजवळ असणाऱ्या बेचकीपर्यंत पोचला.

प्रत्येक फांदीची पायरी चढताना त्याला इकडेतिकडे पाहावं लागायचं. दिशा बदलावी लागायची. तोंडातली तार कुठे अडकणार तर नाही ना याचा अंदाज घेत नेमका मार्ग काढून वर जावं लागायचं. जांभळीच्या शेंड्यावर बसलेला दुसरा कावळा वरून 'काऽऽऽव, काऽऽऽव' करत प्रत्येक टप्प्यावर त्याला 'सारं काही ठीक आहे' असा संदेश देत राहायचा.

बेचक्यात मोक्याची जागा पाहून कावळ्यानं तिथं ती तार आपल्या मनाप्रमाणे लावली.

आजूबाजूच्या काही फांद्या वाकवून त्यांना खोलगट आकार देत घरटं बांधण्याचं काम दोन्ही कावळ्यांनी सुरू केलं होतं...

तांबट ज्या ज्या वेळी ढोलीत येत त्या त्या वेळी आधी ते ढोलीच्या काठावर बसून आतला कचरा साफ करत असत. ढोलीच्या कडेवर पायाच्या नख्या भक्कमपणे रोवून, शेपूट बाहेरच्या खोडाला चिकटवून, मान आत घालून चोचीनं ढोलीच्या भिंती स्वच्छ करण्याची त्यांची नेहमीची सवय. हे काम ते मन लावून आणि उत्साहानं करत असत.


ढोलीच्या भिंतीला चिकटलेली घाण किंवा लाकडाची एखादी किल्ची जर सहजगत्या निघत नसेल तर तांबट आपल्या शरीराचा भार दोन्ही पायांवर तोलून संपूर्ण ताकदीनिशी त्या किल्चीवर घाव घालत आणि ती काढून बाहेर फेकून देत असत. त्यांचं हे कौशल्य दाद देण्यासारखं असायचं.

मी एकदा पहाटे पहाटे गॅलरीत उभा होतो. दिशा उजळत होत्या. सूर्य उगवताच काही क्षणांनी ढोलीची खालच्या बाजूची कड उजळली. कोवळा सोनेरी प्रकाश ढोलीतून आत गेला. वाटलं, ढोलीच्या मऊ गुळगुळीत भिंतीवरून प्रतिबिंबित होत तो प्रकाश संपूर्ण ढोलीत पसरला असेल. ढोलीच्या आतील भिंतींना दररोज दिला जाणारा कोवळा सोनेरी रंग!
त्या रंगानं, त्या उबेमुळे अंड्यातले जीव नक्की सुखावले असतील...
किती अंडी असतील आत?
दोन ते तीन.

किती दिवसांनी पिल्लं जन्माला येतील?
पंधरा ते वीस.
पिल्लं किती दिवसांनी ढोलीच्या बाहेर पडतील?
तीस ते चाळीस!

हाती येणारी माहिती, प्रत्यक्ष निरीक्षण आणि तर्क यांच्या आधारे माझी गाडी पुढे सरकत होती.

मी विचारांच्या तंद्रीत असताना एक तांबट चोचीत काहीतरी खाद्यपदार्थ घेऊन ढोलीच्या तोंडाशी आला आणि काय आश्चर्य! त्याची हालचाल जाणवून आतून एका पिल्लानं चोच वासून तोंड बाहेर काढलं. तांबटानं चक्क बाहेरूनच त्याला घास दिला. पिल्लानं अधाश्यासारखा तो घास गिळला आणि ते पुन्हा आत गेलं. मी जागच्या जागी खिळल्यासारखा उभा होतो, कारण एवढ्यात पिल्लं जन्माला येतील असं वाटलं नव्हतं. देवदुर्लभ असा क्षण होता तो!



अंड्यांतून पिल्लं बाहेर पडली होती, इतकंच काय तर ढोलीच्या तोंडाशी येऊन घास घ्यायलाही शिकली होती. तरल कविता शब्दांच्या बाहेर पडून दृश्य स्वरूपात समोर साकार व्हावी तसं झालं होतं. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. मी निरीक्षणात अधिक लक्ष घालू लागलो. तांबटांच्या फेऱ्यामागून फेऱ्या सुरू झाल्या. पिल्लांना खूप भूक लागत होती आणि त्यांना सतत चारण्याचं काम आई-बाबांना न थकता करावं लागत होतं.

तांबट आल्याचं जाणवलं, की पिल्लं घाईघाईनं ढोलीच्या तोंडाशी येत. आई किंवा बाबा बाहेरून त्यांच्या चोचीत घास घालत आणि निघून जात.

नीट लक्ष ठेवून पाहिलं. पुन:पुन्हा खात्री करून घेतली. दोन पिल्लं होती ती. एखादं पिल्लू जर कधी जास्तच खादाडपणा करायला लागलं तर आई किंवा बाबा त्याला चोचीत चोच घालून तसंच ढकलत खाली ढोलीच्या तळाशी न्यायचे आणि मग तो घास दुसऱ्या पिल्लाला चारायचे.

कधी कधी, एखादं पिल्लू चोचीतला खाऊ न गिळता चोच तशीच वासून बसून राही. तेव्हा त्याचं पोट भरलंय हे लक्षात येऊन आई किंवा बाबा तो खाऊ त्याच्या चोचीतून काढून दुसऱ्या पिल्लाला चारत. बाबा येऊन गेले, की आई. आई येऊन गेली, की बाबा. असं सतत चाललेलं असायचं.

चिमणी आपल्या पिल्लांना दिवसातून दोनशे वीस ते दोनशे साठ वेळा चारत असते असा उल्लेख 'पक्षिकोशा'त आहे. तांबटांचंही आपल्या पिल्लांना असंच येता-जाता चारणं सुरू होतं.

पिल्लं दिसामासी वाढत होती. ढोलीच्या तोंडापर्यंत यायला शिकली होती. ती ढोलीतून बाहेर पडायला कधी शिकणार याची वाट मी पाहत होतो. ढोलीवर आणि तांबटांवर बारीक नजर ठेवून होतो.

'टुक्...टुक्...' आवाज सुरू झाला. मी बाहेर येऊन पाहू लागलो. वरच्या फांदीवर एका टोकाला आई बसली होती. तिच्या चोचीत खाऊ होता. तिनं पुन्हा 'टुक्... टुक्...' केलं. ती पिल्लांना आपल्याजवळ बोलावत होती. एक पिल्लू ढोलीच्या तोंडाशी पोचलं. त्यानं मान वाकडी-तिकडी करत पाहिलं, आईच्या चोचीत खाऊ होता. तो त्याला हवा होता. ढोलीच्या कडेवर नख्या खुपसून मजबूत पकड घेत त्यानं पायांवर संपूर्ण शरीराचा भार तोलला आणि बाहेर झेप घेतली. पुढच्या क्षणी ते चक्क हवेत तरंगत होतं.

पिल्लानं एका जन्मजात प्रेरणेनंच पंख पसरले होते आणि ते पुढं पुढं झेपावत होतं. अतिशय सुंदर असा क्षण होता तो! पिल्लाच्या जीवनाला अर्थ देणारा, त्याच्या जीवनाचा नवा अध्याय सुरू करून देणारा! एका क्षणी, पंखांनी हवेचा अधिक जोरानं प्रतिकार करत त्यानं स्वत:ला वर उचललं आणि मग एका झेपेतच ते आईजवळ जाऊन पोचलं. तिच्या शेजारी, त्याच फांदीवर जाऊन बसलं. बसताना त्याला थोडं कोलमडायला झालं खरं, पण अखेर जमलंच!

आईनं पुन्हा आनंदानं 'टुक्... टुक्...' केलं. चोचीतला थोडा खाऊ पिल्लाला चारला आणि एक छोटी भरारी घेऊन ती अधिक वरच्या फांदीवर जाऊन बसली. पिल्लानं एवढी हिंमत दाखवून तिला भेटायला यावं आणि तिनं मात्र त्याचं कौतुक न करता त्याच्यापासून पुन्हा दूर जावं याला काय म्हणावं? पंख पसरून तोल सांभाळत, फांदी अधिक घट्ट पकडून पिल्लू तसंच बसून राहिलं.

पिल्लाला काही धोका तर नाही ना यावर लक्ष ठेवत वरच्या फांदीवर बसलेले बाबा खाली आले. पिल्लाच्या बाजूला बसत त्यांनी एक स्निग्ध, मांसल अळी त्याच्या चोचीत सोडली... ती पिल्लाला गिळता येईना. मग बाबांनी ती तशीच बाहेर काढून चोचीतल्या चोचीत फिरवत आणखी थोडी मऊ करून त्याला चारली. त्यानं पिल्लू एकदम तरतरीत झालं.

खाऊचं आमिष दाखवत आई-बाबा पिल्लाला उडायला शिकवत होते.

एव्हाना दुसरं पिल्लूही बाहेर आलं. आधी बाहेर पडलेलं पिल्लू म्हणजे दादा, नंतरचं ताई; असं मनानं घेतलं. 'टुक्... टुक्...' या आवाजाच्या दिशेनं कानोसा घेत दुसऱ्या पिल्लानंही छोटी भरारी घेतली आणि लटपटत ते गुलमोहोराच्या फांदीवर येऊन बसलं. एखाद्या धसमुसळ्या मुलानं अंघोळ करून केस न पुसताच न्हाणीघरातून बाहेर यावं तशी त्याच्या अंगावरची पिसं विस्कटलेली आणि ओली दिसत होती. ते डावी-उजवीकडे मान वळवून भाबड्या कुतूहलानं जगाकडे पाहत होतं. आईनं आपल्या चोचीतला खाऊ त्याला चारला.


मोठे तांबट दोन्ही पिल्लांच्या संरक्षणासाठी सावध होते. कोणत्याही क्षणी एखादा शिकारी पक्षी खाली झेपावेल आणि पिल्लाला उचलून घेऊन जाईल, या धोक्याची त्यांना जाणीव होती. म्हणून ते सतत त्यांच्या भोवती-भोवती करत होते. परिस्थितीचा अंदाज घेत होते. मधूनच त्यांना एखादा घास चारत होते.

थोड्या वेळानं, आई एका झेपेत खाली आली. तिनं आपली चोच पहिल्या पिल्लाच्या डोक्यावर घासत त्याला कुरवाळलं, धीर दिला आणि पुन्हा ढोलीच्या तोंडाशी जाऊन

'टुक्... टुक्...' करू लागली. मग पिल्लानं छातीत हवा भरून घेत गुडघे वाकवत पायावर शरीराचं वजन तोललं आणि पायांनी फांदी मागे रेटत ढोलीच्या दिशेनं छोटीशी भरारी घेतली. ढोलीच्या कडेवर पाय ठेवताना त्याचा अंदाज थोडा चुकला, पण त्याची पूर्वकल्पना असल्यागत त्यानं स्वत:ला ढोलीत झोकून दिलं. दुसऱ्या पिल्लानंही त्याचं अनुकरण केलं. दोन्ही पिल्लं सुरक्षितपणे ढोलीत पोचली होती.

आई-बाबा तांबट आनंदानं 'टुक्...टुक्...' करत आणखी चारा-पाणी मिळवण्यासाठी दूरवर निघून गेली.

सकाळ झाली आणि प्रकाश पडू लागला की ढोलीच्या तोंडावरची कड आधी उजळायची. प्रकाश जसजसा वाढत जाई तसतशी वरच्या कडेवरून पडणारी सावली तसू-तसूनं माघार घेत जायची. प्रकाश जणू सावलीच्या मागे लागला आहे असं वाटायचं. संध्याकाळी याच्या नेमकं उलट व्हायचं. सावली प्रकाशाला हळूहळू मागे ढकलीत न्यायची आणि ढोलीत पूर्ण अंधार व्हायचा.




रात्री बाहेर गुडूप अंधार असायचा. मध्यरात्री, वसाहतीतील वॉचमनच्या शिट्टीचा आणि काठी ठोकत गेल्याचा आवाज यायचा. पहाटे पाच वाजता, रस्त्याच्या पलीकडील मशिदीतील बांग; त्यानंतर, देवळातील घंटांचा आवाज; आणि त्यानंतर आमच्या घरातील घड्याळाचा गजर व्हायचा. मी हे सर्व आवाज अनुभवत, पुन्हा एक तृप्त डुलकी काढून मग उठायचो.

फटफटायला लागलं आणि बाहेर येऊन उभं राहिलं की उंच आकाशातली घारींची मंडलं नजरेस पडायची. त्या कधी खाली यायच्या नाहीत; किंऽऽऽ अशी कर्कश शीळ घालत हवेतल्या हवेत कसरती करत राहायच्या. जमिनीवरचे लहान-सहान कीटक, उंदीर-घुशीसारखे प्राणी त्यांना नेमके कसे दिसतात याचं आश्चर्य वाटायचं. आकाशात घार, गरुड, ससाणा, शिक्रा यांसारखे पक्षी घिरट्या घालत असतील तर उंदीर, घुशी बाहेर पडण्याचं धाडस करत नाहीत. शत्रू बाहेर टपून बसलेला आहे हे त्यांना त्यांच्यातील उपजत प्रेरणेमुळे नेमकं कळतं.

तांबटाच्या पिल्लांना ही शिकवण अर्थातच त्यांच्या आई-वडिलांकडून मिळाली होती. म्हणूनच, बाहेर पडण्यापूर्वी आजूबाजूला पाहून आणि आकाशात आपला शत्रू तर घिरट्या घालत नाही ना याची खात्री करून घेऊनच ती बाहेर पडत.

बगळ्यांच्या रांगाही पहाटे पहाटे आकाशातून उडताना दिसत. त्यांची दिनचर्या सुरू झालेली असे आणि चरण्यासाठी त्यांना खाडीवर जायचं असे.



त्या रांगांकडे आणि त्यांतील बगळ्यांकडे मी बारकाईनं पाहायचो. लांबलचक पाय एकाला एक जोडून शिस्तीनं मागे करून दोन्ही पंख हलवत बगळे उडत असायचे. मागे जोडलेल्या त्यांच्या दोन्ही पायांच्या मधल्या फटीतून वरचं आकाश दिसायचं. संध्याकाळी ते पुन्हा पूर्वेच्या दिशेनं मुक्कामाच्या ठिकाणी परतायला लागायचे. तेव्हाही त्यांच्या पायांच्या फटींमधून वरचं आकाश दिसायचं. अतिशय आगळं असं चित्र असायचं ते!

एका पहाटे पहाटे गुलमोहोरावरून 'टुक्... टुक्...' असा आवाज येऊ लागला. मी मनातल्या मनात आकडे मोजू लागलो. एक, दोन, तीन, चार... तांबटांचे आवाज मोजण्याची सवय नकळतच लागली होती. काही क्षणांनी दुसरा तसाच आवाज येऊ लागला. दोन्ही मोठे तांबट सकाळीच बाहेर पडलेले दिसत होते. मी बाहेर येऊन पाहू लागलो.

त्या आवाजानं मोहिनी घातल्याप्रमाणे एका पिल्लानं ढोलीतून मान बाहेर काढली. अधिक विचार न करता पायांनी ढोलीची कडा मागे रेटत शरीर हवेत तोललं आणि क्षणात, ते समोरच्या डांबावर येऊन बसलं. मान उजवी-डावीकडे वळवत त्यानं आजूबाजूचं निरीक्षण केलं आणि गुलमोहोराच्या फांदीवर बसलेल्या आईकडे पाहू लागलं. आपली भुंडी शेपटी तुरतूर हलवत आई त्याचं स्वागत करत होती. उजवी-डावीकडे पाहत तिनं आपली चोच दोन्ही बाजूंनी झाडाच्या फांदीवर घासली आणि मान कलती करून पिल्लाकडे पाहिलं.

गुडघे वाकवून, पायांनी फांदी मागे रेटत पिल्लानं झेप घेतली आणि अगदी अलगद ते आईच्या शेजारी येऊन बसलं. तोल सांभाळत, पायांनी फांदी घट्ट धरून ठेवत त्यानं आईकडे पाहिलं. 'काय कसं वाटतं?' असे भाव त्याच्या डोळ्यांत होते. काहीही प्रतिक्रिया व्यक्त न करता आईनं आपल्या चोचीतला खाऊ पिल्लाला चारला, एक छोटी भरारी घेतली आणि ती समोरच्या फांदीवर जाऊन बसली.

पाठोपाठ पिल्लानंही भरारी घेतली आणि ते पुन्हा तिच्या शेजारी जाऊन बसलं. या वेळी पिल्लाला अगदी नीट बसता आलं. पण त्याच्या या कृतीला कोणताही प्रतिसाद न देता आईनं पुन्हा एक भरारी घेतली आणि ती खालच्या एका फांदीवर जाऊन बसली. मग पिल्लानंही छोटी भरारी घेतली आणि तेही पुन्हा खाली येऊन तिच्या बाजूला बसलं. वरच्या दिशेनं उडताना त्याला पंखांची फडफड करत ताकद लावायला लागत होती, तर खालच्या दिशेनं उतरताना पंख स्थिर ठेवून सावधपणे उतरावं लागत होतं.

झाडावर उतरताना, फांदीवर बसताना पक्ष्यांना आपले पाय आधी खाली सोडावे लागतात. ते गुडघ्यांत आवश्यक तेवढे वाकवून शरीराचं वजन तोलत फांदीवर पक्की पकड घालून बसावं लागतं. वर उडतानाही पाय आवश्यक तेवढे गुडघ्यांत वाकवून, शरीर तोलत, ताकदीनं फांदी मागे रेटत उडावं लागतं. एकदा का त्यांनी आकाश गाठलं की मग त्यांचे पाय आपोआप घडी घातल्यासारखे पोटाजवळ किंवा सरळ मागे जातात.

पिल्लू आईच्या बाजूलाच येऊन बसल्यामुळे त्या दोघांच्या भारानं ती डहाळी खाली गेली

आणि झुलू लागली. ती लय पकडूनच आईनं मोठी भरारी घेतली आणि ती वडाच्या उंच फांदीच्या टोकावर जाऊन बसली.

बापरे, पिल्लाच्या दृष्टीनं तिथवर पोचायचं म्हणजे कठीणच काम! मधलं भलंमोठं अंतर पार करावं लागणार होतं. शिवाय, फांद्यांच्या गर्दीतून अचूक वाट काढत नेमकी दिशा धरून तिच्या शेजारची जागा पकडायची होती. पिल्लू काय करणार हे मी उत्कंठेनं पाहू लागलो.

फांदीच्या सालीवर पिल्लानं पायाची घट्ट पकड घातली होती. त्यानं पायाजवळ निरखून पाहिलं, सालीच्या खालून एक अळी वळवळत बाहेर पडत होती. काय होतंय हे कळायच्या आतच, एका जन्मजात प्रेरणेनं त्यानं पटकन चोच मारली आणि अळी पकडली. चोच डावी-उजवीकडे फिरवत तिच्यावरची पकड मजबूत केली आणि मान वर करून अलगद गिळून टाकली. त्यानंतर त्यानं आपली चोच झाडाच्या फांदीवर दोन्ही बाजूंनी घासून स्वच्छ केली, अगदी आई करते त्याचप्रमाणे, मग ऐटीनं वर पाहिलं. उंच फांदीवरून आई त्याच्याकडेच बघत होती... कौतुकानं!

पिल्लानं क्षणभर विचार केला आणि आईजवळ पोचायचं असं ठरवलं. हवेतल्या हवेत दोन झाडांच्या मधलं अंतर पार करत त्यानं आडव्या गेलेल्या फांदीवरून छोटं वळण घेतलं, दोन फांद्यांच्या मधल्या जागेतून वरच्या दिशेनं सूर घेतला आणि तिथल्या पानांच्या गर्दीतून रस्ता काढत अखेर ते आईच्या बाजूला जाऊन पोचलं. अचूक दिशा पकडणं, गती घेणं, वळणं, सूर मारणं, झेपावणं या साऱ्या क्रिया काही क्षणांत करायच्या होत्या आणि एकही चूक न करता! अवघड कामगिरी होती, पण जमलं ते त्याला! झटक्यात ते आईच्या शेजारी येऊन बसलं. न कोलमडता. दिमाखानं. आत्मविश्वासानं. तिथून ते खाली पाहू लागलं.

उंचावरून पिल्लाला खालचं दृश्य कसं दिसत असेल?

एकीकडे खूप मोठा रस्ता, त्यावरून अखंडपणे सुरू असलेली वाहनांची ये-जा, खाली रांगेनं उभ्या असलेल्या अनेक इमारती, भलंमोठं कंपाउंड, हमरस्त्याकडून वसाहतीत येणाऱ्यां-जाणाऱ्यांसाठी असणारा छोटा रस्ता, दुकानं, वाहनतळ, तिथून सतत सुरू असणारी लाल रंगाच्या गाड्यांची ये-जा... हे सारं त्याच्या लक्षात आलं असेल का? बाजूला उभ्या असलेल्या टॅक्सी आणि रिक्षा... हे सारं पाहून त्याला काय वाटलं असेल? पांगाऱ्याखाली कुंपणाला लागून असणारी दुकानं, घरं, कार्यालयंसुद्धा त्याला दिसली असतील. त्यांच्या छपरांवरचा पालापाचोळा, त्यांवर पडणारा फुलांचा खच, त्यांत खेळणाऱ्या

चिमण्या-साळुंक्या; शिवाय जांभूळ, फणस, वड, नारळ, बाहवा, गुलमोहोर, भेंडा, करंज, काशीद, अशोक अशा झाडांची गर्दीही त्याला दिसली असेल. दोन-चार इमारती सोडून पलीकडच्या चौकात उभं असलेलं वडाचं भलंमोठं झाडही पिल्लाला दिसलं असणार.

हमरस्त्याच्या पलीकडे इमारतींच्या गर्दीतील मशिदीचे घुमट त्याला दिसले असतील का, सकाळची बांग तिथूनच येते हे त्याच्या लक्षात आलं असेल का, असे प्रश्न मला पडत होते.

बसल्या जागेवरून आई थोडी पुढे सरकली. सरकताना, आधी तिनं एक पाऊल उलटं फिरवलं आणि त्याबरोबर सारं शरीर उलटं फिरवत दुसरं पाऊल टाकलं. आता, तिचं तोंड विरुद्ध दिशेला झालं होतं. पिल्लानंही मग एक पाऊल उलटं टाकून फिरत दिशा बदलली.

इकडच्या बाजूला खाली असणाऱ्या शंकराच्या देवळातील घंटांचा आवाज, विक्रेत्यांच्या सायकलींची ट्रिंग-ट्रिंग, स्कूटर, रिक्षा, टॅक्सी, बेस्ट बस, अन्य वाहनांचे भोंगे, लाऊडस्पीकरवरची गाणी, समोरच्या मैदानात होणाऱ्या सभांमधील भाषणं, खेळणाऱ्या मुलांचं ओरडणं, कावळे, चिमण्या, पोपट, साळुंक्यांचा कलकलाट... असे दिवसरात्र कानांवर पडणारे आवाज कोठून येतात हे पिल्लाच्या लक्षात आलं असेल असं वाटलं.

एकेक पाय डावीकडे टाकत आई फांदीच्या टोकाकडे सरकली. मग पिल्लूही तिचं अनुकरण करत एकेक पाय डावीकडे टाकत फांदीच्या टोकाकडे सरकलं. तिथं पानांच्या झुबक्यात लालभडक रंगाची इटुकली पिपरं लगडलेली होती. आईनं त्यांतील एका फळात अलगद चोच खुपसून, आतील गर काढून पिल्लाच्या चोचीत घातला. त्यानं तो क्षणार्धात गिळून टाकला.

पिल्लाला भूक लागलेली होती. पुन्हा चोच वासून ते आईकडे अपेक्षेनं पाहू लागलं, पण ती लक्ष देईना. मग धसमुसळेपणानं त्यानं स्वत:च एका पिपरात चोच घातली. बुडाकडनं चोच घातल्यामुळे पिपर देठापासून सुटलं आणि खालच्या फांद्या, पानांना अडखळत, अडखळत जमिनीवर पडलं. पिल्लाचा विरस झाला.

त्यानं पुन्हा आईकडे पाहिलं. तिनं समोरचं एक पिपर चोचीच्या मधोमध पकडलं आणि देठाच्या बाजूचा भाग अलगद दाबला. त्याबरोबर नेमका तेवढ्या भागातील गर तिच्या चोचीत आला. बाकीचं फळ तसंच्या तसं देठाला धरून राहिलं होतं. मग पिल्लानंही एक पिपर हेरलं, बुडाकडे भार पडणार नाही अशा बेतानं चोचीत दाबलं आणि काय आश्चर्य! चोचीत भरपूर गर आलेला आणि उरलेलं फळ देठाला तसंच्या तसं!

आई पिल्लाकडे पाहत होती. फळं खाताना त्यांची नासाडी करायची नाही, शिल्लक राहिलेलं फळ पुढच्या वेळी आपल्यालाच खायला मिळू शकेल हे तिनं त्याला शिकवलं होतं. तिच्या डोळ्यांत पिल्लाविषयी पुरेपूर कौतुक दाटून आलेलं दिसत होतं. त्याच खुशीत फांदीवर आपल्या नख्यांची मजबूत पकड घालत तिनं आपलं अंग खालच्या बाजूला झोकून दिलं. नख्यांची पकड थोडी सैल करत ती फांदीच्या खालच्या अंगानं पलीकडे गेली आणि तिकडनंच पुन्हा वर आली.

तिची ती सुंदर गिरकी पाहून मी आश्चर्यचकित झालो. पिल्लाकडे पाहू लागलो. पिल्लू तो धडा गिरवणार होतं का? आईनं त्या फांदीभोवती पुन्हा तशीच गिरकी घेतली आणि ती पुन्हा वर येऊन बसली.

लक्षात आलं की आई पिल्लाची परीक्षा घेत आहे. फांदीभोवती गिरकी कशी घ्यायची हे पिल्लाला नीट कळावं म्हणून आईनं आणखी एक गिरकी घेऊन दाखवली. या वेळी जेव्हा ती फांदीला उलटी लटकली तेव्हा ती तशीच तिथं काही काळ थांबली. खालूनच मान वाकडी करून तिनं पिल्लाकडे पाहिलं. तशा उलट्या अवस्थेतच, तिनं फांदीवर चोच मारून एक अळी पकडली आणि अळी तशीच चोचीत पकडून ठेवून पुन्हा वर येऊन ऐटीत ती गिळून टाकली.

मग पिल्लानंही निर्धार केला. त्यानं आपल्या चारी नख्यांनी फांदीच्या भोवती पकड घातली आणि हळूहळू, खालच्या दिशेला अंग झोकून दिलं. ते पूर्ण उताणं झालं होतं. झाडाच्या शेंड्याकडनं प्रकाशाचे काही किरण खाली आले होते आणि ते थेट त्याच्या अंगावर पडत होते. प्रकाशाच्या त्या कवडशात पिल्लू खूपच गोड दिसत होतं. त्यानं फांदीवरील नख्यांची पकड थोडी सैल केली, शरीराला हलकासा झटका देऊन फांदीच्या दुसऱ्या बाजूनं ते वर आलं आणि पुन्हा व्यवस्थित बसलं.

'वा! छान!' तोंडून आपोआप शब्द बाहेर पडले. जणू काही मी फांदीभोवती गिरकी घ्यायला शिकलो होतो.

एवढासा तांबट पण किती हुशार!

अर्थात हुशारीच्या बाबतीत कावळ्याची बरोबरी कोणी करू शकत नाही हे तितकंच खरं.

तांबट आजूबाजूला नसले की घरटं बांधणारी कावळ्यांची जोडी हमखास दृष्टीस पडायची.

एक एक काडी आणून घरट्याच्या तळाशी आणि आजूबाजूला लावण्याचं त्यांचं काम बरेच दिवस सुरू होतं. कधी एखादी काडी वेडीवाकडी लागायची तर कधी एखादी वर आणत असताना वाटेतच पडून जायची. पण कावळे कधी कंटाळलेले दिसले नाहीत. काडी काडी जमवून एकमेकाला मदत करत घरटं बांधण्याचं त्यांचं काम अगदी मनापासून सुरू होतं.


लोखंडी तारा, प्लॅस्टिकच्या वाद्या, लहान-मोठ्या काड्या, असं करत करत हळूहळू त्यांनी मऊ गवत, कापूस, पिसं, केसांचे पुंजके, चिंध्या असे बदल करीत घरट्याच्या आतील भागाची भरणी सुरू केली.

एकदा घरटं बांधणाऱ्या दोन्ही कावळ्यांपैकी एक कावळा खालच्या फांदीवर उतरला. तिथली एक कोवळी डहाळी त्यानं हेरली आणि शेंड्याच्या बाजूनं तो तिच्यावर आपल्या चोचीचे घाव घालू लागला. हे काम तो एकाग्रपणे आणि पूर्ण ताकदीनिशी करीत होता. ती डहाळी म्हणजे जणू काही त्याची शत्रू होती आणि ती उद्ध्वस्त करून टाकायची असा त्यानं निर्धार केला होता!

काही वेळानं डहाळीच्या सालीचा एक तंतू सुटून त्याचं एक टोक मोकळं झालं. कावळ्यानं ते टोक नेमकं चोचीत धरून ओढायला सुरुवात केली आणि मग आपोआपच त्याचा लांब दोर निघायला सुरुवात झाली. डहाळीच्या बेचकीपाशी पोचल्यावर दोर निघण्याचं थांबलं.

मग त्यानं दोराचं टोक तसंच तोंडात धरून दिशा बदलली आणि तो दुसऱ्या फांदीवर जाऊन बसला. तिथून दोराला हिसडे मारू लागला. पण दोर काही तुटेना. कावळा पुन्हा तसाच विरुद्ध दिशेच्या फांदीवर गेला आणि तिथून दोर ओढू लागला. तरीही दोर तुटेना. मधेच एकदा दोर त्याच्या चोचीतून निसटला. तेव्हा त्यानं काळजीपूर्वक दोर चोचीत पकडला, मान गोलाकार फिरवत चोचीभोवती त्याचे काही वेढे मारून घेतले आणि जोरानं हिसडा दिला. आता मात्र दोर तुटला!

तुटलेला दोर तसाच चोचीत पकडून कावळा वरच्या फांदीवरील आपल्या घरट्यात पोचला आणि घरट्याच्या आतून तो आपल्या मनाप्रमाणं गुंफत आतली वीण पक्की करू लागला. बहुधा ती कावळीण असणार. विणीचा हंगाम जवळ आला होता. तिला अंडी घालायची होती, पिल्लांना जन्म द्यायचा होता आणि त्यासाठी तातडीनं घरटं बांधायची गरज निर्माण झाली होती. ही अनावर, नैसर्गिक भावनाच तिला या आश्चर्यकारक गोष्टी करण्याची प्रेरणा देत होती!



अखेर घरटं तयार झालं आणि त्यांचा घरट्यातील मुक्कामही सुरू झाला. जेव्हा पाहावं तेव्हा त्या दोघांपैकी एखादा कावळा समाधी लावल्यासारखा घरट्यात बसलेला दिसायचा. इतक्या एकाग्र चित्तानं की जणू आजूबाजूला जग नाहीच!

एकदा दुपारच्या निवांत वेळी कावळ्यांची ती जोडी वडाच्या फांदीवर एकमेकांना चिकटून बसलेली दिसली. आधी लक्षातच येईना. कारण दोघं अशा पद्धतीनं बसली होती, की जणू तिथं दोन पक्षी बसलेले नसून वेगळ्याच आकाराचा अज्ञात पक्षी बसलेला आहे!

एका कावळ्यानं आपलं डोकं दुसऱ्या कावळ्याच्या पुढे झुकवून असं वळवलं होतं, की त्यातून त्याच्या कानाकडची बाजू वरच्या कावळ्याच्या चोचीजवळ येत होती. वरचा कावळा आपली चोच दुसऱ्या कावळ्याच्या मानेवरून, डोक्यावरून हळुवारपणे फिरवत होता. प्रेमानं गोंजारत होता. पिसं स्वच्छ करत होता. त्याची चोच दुसऱ्या कावळ्याच्या मानेवरच्या पिसांतून जेव्हा हळुवारपणे फिरत होती तेव्हा पिसांच्या मुळाशी असणारा मऊसूत पांढरा रंगही उघडा पडत होता. सुखाच्या परमावधीत तो कावळा इतका बुडून गेला होता की त्याचे डोळे अनोख्या तृप्तीनं तुडुंब भरून गेलेले दिसत होते.

काही क्षणांनी दुसऱ्या कावळ्यानं चोच उलट्या बाजूला वळवून आपल्या दुसऱ्या कानाकडची बाजू वर आणली. मग वरच्या कावळ्यानं ती दुसरी बाजूही आपल्या चोचीनं साफ करायला घेतली. अचानक बाजूला कुठेतरी कावळ्यांचा एकदम गलका झाला आणि मग हे दोन्ही कावळे समाधीतून बाहेर यावे तसे भानावर येत 'काऽऽऽव, काऽऽऽव' करत परस्परविरोधी दिशांना उडून गेले.

तांबटाच्या दोन्ही पिल्लांमध्ये एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर आणि एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडण्याइतपत विश्वास निर्माण झालेला दिसत होता. मात्र भोवतीच्या वातावरणाची त्यांना अजून पुरेशी ओळख झाली नव्हती. म्हणूनच ती जर कधी हद्द सोडून बाहेर जाऊ लागली तर आई-बाबा त्यांना एकेका फांदीवरून उलट्या दिशेनं फिरवत ढोलीपर्यंत परत आणत. अशा वेळी त्यांची 'टुक्, टुक्...' अधिक आर्त आणि हळवी झालेली असे.

पिल्लं ढोलीत शिरली, की आई-बाबा निश्चिंत होऊन चरण्यासाठी निघून जात. पण तरीही फार दूर न जाता आजूबाजूच्या एखाद्या झाडावर बसून, ढोलीवर नेमकं लक्ष ठेवून राहत. पिल्लांना आवडणारा पदार्थ सापडला की ते लगेच ढोलीजवळ येत आणि त्यांना चारत. पिल्लांचं पोट भरल्याची खात्री झाली की मग परस्परांना घास देत आजूबाजूच्या परिसरात त्यांचा पाठशिवणीचा खेळ सुरू होई.

ढोलीत परतण्याची तांबटांची एक पद्धत ठरलेली होती. प्रथम ते दूरच्या एखाद्या झाडाच्या शेंड्यावर बसत. तिथून आधी ढोलीचं नीट निरीक्षण करत. मग एखादं जवळचं झाड, आधी त्याची वरची फांदी, मग क्रमाक्रमानं एकेक फांदी खाली उतरत. ढोलीसमोरच्या फांदीवर बसून मान इकडे-तिकडे हलवत तिचं बारीक निरीक्षण करत. सारं काही आलबेल आहे, कुठे काही धोका नाही याची खात्री झाल्यावर मग ढोलीच्या काठावर घट्ट पाय रोवून, शेपटी खोडाला चिकटवून बसत, शरीराचा संपूर्ण भार पायावर तोलत चार-पाच वेळा मान ढोलीच्या आतबाहेर करत, कचरा साफ करून नंतरच मग आत प्रवेश करत.


अन्नाच्या शोधात, तांबटांना अनेकदा दूरवर जावं लागत असे. त्या मधल्या काळात नकळत दुसरा एखादा पक्षी किंवा सापासारखा शत्रू ढोलीत येऊन घुसलेला नाही ना याची ते खात्री करून घेत असतात, हे नंतर लक्षात आलं.

तांबट आपल्या प्रत्येक कृतीतून पिल्लांना शिकवण्याचा प्रयत्न करत. शिकवलेला धडा पिल्लांनी करून दाखवला की खूष होत, मग पिल्लांना खाऊ-पिऊ घालत आणि उंच फांदीवर बसून जोरजोरात 'टुक्... टुक्...' सुरू करत.

पिल्लांना तहान लागली की ती काय करत असतील? तहान लागल्याचे भाव कशी व्यक्त करत असतील? पाणी म्हणजे काय, हे तरी त्यांना कळत असेल का? असे अनेक प्रश्न मला पडत राहायचे. हळुहळू त्यांची उत्तरंही मिळत जायची.

फळांचा रस आणि अळ्यांमधील द्रवपदार्थ पिल्लांना पाणी म्हणून पुरेसे असतात. शिवाय, पक्ष्यांनी बाहेरून काही कोरडं अन्न आणलं तर चोचीत त्याचं चांगलं पीठ तयार करून, त्यात आपली लाळ मिसळून, त्याचं दूध तयार करून नंतरच पिल्लांना ते चारण्याची त्यांची पद्धत असते. त्यामुळे पिल्लांना पाण्याची कमतरता कधी भासत नाही.

काही पक्ष्यांच्या छातीजवळची पिसं स्पंजासारखी असतात. गरज भासेल तेव्हा ते पक्षी पाणवठ्यावर जाऊन चिंब भिजतात, स्पंजासारख्या पिसांमध्ये पाणी भरून घेतात आणि मग घरट्यात येऊन पिल्लांना पाजतात. छातीजवळच्या पिसांना चोच लावून इवलाली पिल्लं पाणी पीत आहेत हे दृश्य गाईला लुचणारं वासरू किंवा आईला बिलगलेलं बाळ या दृश्यांइतकंच भावपूर्ण आणि अविस्मरणीय, यात काय शंका?



दोन्ही पिल्लांना सकाळी सकाळी ढोलीतून मान बाहेर काढून आजूबाजूचं जग न्याहाळण्याची सवय लागली होती. मीही त्या वेळी गॅलरीत उभा असायचो. वसाहतीत दूध घालणारी मुलं, वृत्तपत्रं टाकणारी मुलं, कामाला निघालेली माणसं यांच्याकडे पिल्लं कुतूहलानं टुकू टुकू पाहत असत.

वाण्याच्या दुकानाशेजारी एक कडक्या म्हातारा वस्तीला असे. तो भल्या पहाटे उठून पांगाऱ्याच्या झाडाखाली मोठमोठ्यानं खाकरत चूळ भरायचा. त्याचं दात घासणं, आंघोळ करणं यांसारखे उद्योग पिल्लं झाडावरून विस्मयानं पाहत बसलेली दिसायची. मान इकडेतिकडे करत चाललेलं त्यांचं निरागस निरीक्षण लोभसवाणं वाटे. माणसांच्या किंवा इतर पशुपक्ष्यांच्या मनात भीतीची जी भावना असते तिचा लवलेशही पिल्लांच्या डोळ्यांत दिसायचा नाही.

एकदा, एक माणूस मोटरसायकलवरून मोठमोठ्यानं हॉर्न वाजवत पांगाऱ्याखालून निघून गेला. तो इतक्या जोरात हॉर्न वाजवत होता, की माझ्या कानठळ्या बसण्याची वेळ आली. ढोलीच्या तोंडाशी येऊन बसलेलं पिल्लू मात्र त्या आवाजामुळे जराही विचलित झालेलं नव्हतं. पिल्लांचा हा निरागसपणा एक दिवस त्यांचा शत्रू तर ठरणार नाही ना, असा विचार त्या वेळी मनात आला.

सकाळच्या वेळी मी तांबटांच्या गमतीजमती पाहत गॅलरीत दात घासत उभा असायचो. कधी सुरेखा कपडे वाळत घालत असायची. कधी अनुराग कबुतरांच्या मागं लागलेला असायचा तर कधी आशय पायमोजे किंवा हातरुमाल शोधत असायचा. आम्ही जसं पिल्लांना ओळखतो तसंच ही पिल्लं किंवा मोठे तांबट आम्हांला ओळखत असतील काय, असाही विचार मनाला चाटून जायचा.

एके दिवशी, कावळ्याच्या घरट्यातून दोन कोवळ्या चोची अचानक वर आलेल्या दिसल्या. कावळिणीनं पिल्लं घातली होती. ती सदैव वरच्या दिशेनं चोची वासून बसलेली असत. कावळा किंवा कावळीण जवळ आली, की घरट्यातल्या घरट्यात त्यांची रेटारेटी आणि धडपड सुरू होई. त्यांना खायला भरपूर लागायचं. पोट कितीही भरलं तरी ती पुन्हा तोंड वर करून, चोची वासून बसून राहत.

अंगावर पिसं नसलेली त्यांची ती काळसर गुलाबी कांती, काळेभोर टपोरे डोळे आणि चोचीजवळचे मांसल पांढरे ठिपके... सारं काही दुरूनही नजरेत भरत असे.

संध्याकाळी सूर्य पश्चिमेला झुकला की घरट्याच्या धूसर-काळसर बाह्याकृतीतून वर आलेल्या त्यांच्या चोची आकाशाच्या झळाळत्या पार्श्वभूमीवर उठून दिसत. निसर्गानं रेखाटलेलं अवर्णनीय असं तैलचित्र आपण पाहत आहोत असं त्या वेळी वाटे!

वसाहतीच्या परिसरात, कावळ्यांच्या खालोखाल साळुंक्या आणि कबुतरं दिसायची.

कबुतरांचा सारा वेळ एकमेकांच्या भोवती घोटाळण्यात आणि 'गुटुर्र ऽऽऽ, गुटुर्र ऽऽऽ' करण्यातच जायचा. जागा मिळेल तिथं आणि संधी मिळेल तेव्हा एकमेकांशी तास न् तास गुजगोष्टी करत बसणं हेच त्यांच्या दृष्टीनं महत्त्वाचं असायचं. त्यातूनही कधी वेळ मिळाला आणि घरटं बांधण्याची आठवण झाली तर तोंडात एखादी काडी घेऊन एखादं कबूतर आमच्या गॅलरीतील लोखंडी जाळीतून खुशाल आत शिरायचं. मग कधी अनुराग तर कधी

सुरेखा त्यांना हाकलत बाहेर न्यायची. गॅलरीच्या जाळीतून बाहेर पडताना कधी अंदाज चुकून धडपडल्यामुळे एखाद्या कबुतराचं एखादं पीस गळून हवेत तरंगत राहायचं.

जवळजवळ, रोज, हे असं चाललेलं असायचं; पण कबुतरांच्या वागण्यात फरक काहीच पडत नव्हता. काही घडलंच नाही अशा थाटात, पुन्हा ती चोचीत काडी घेऊन, गॅलरीतून आत शिरायचं काम सुरू करत. अंडी घालायची वेळ आली की ती इतकी आक्रमक होत, की कुणालाही न जुमानता घरात घुसत आणि मग कधी कपाटावर, कधी गॅलरीतील एखाद्या कुंडीमध्ये, तर कधी अडगळीच्या जागी शिरून, अंडी घालून मोकळी होत.

एकदा, एका कबुतरानं घराच्या आतल्या भागात थेट घुसून, पाण्याच्या टाकीसाठी बाथरूमवर ठेवलेल्या मोकळ्या जागेत अंडी घातली. काय करावं ते कळेना. दिवसभर त्यांच्यावर लक्ष ठेवून बसणं शक्य नसायचं. सतत दारं-खिडक्या लावून बसणं तर आमच्या स्वभावातच नव्हतं. कधी सगळ्यांना मिळून बाहेर पडायचं असलं तरच आम्ही दारं-खिडक्या नीट बंद करून घेत असू. पण इतकी काळजी घेऊनही परत येऊन दार उघडलं की एखाददुसरं कबुतर फडफड करत बाहेर पडताना दिसायचं. आश्चर्य वाटायचं.

एकदा नीट लक्ष ठेवलं तेव्हा सारा प्रकार लक्षात आला. स्वयंपाकघराच्या खिडकीवर हवेसाठी एक छोटी आडवी झडप ठेवलेली होती. आम्ही घराबाहेर पडल्यावर त्या झडपेतून कबुतरं स्वयंपाकघरात यायची. तिथला दरवाजा ओलांडून मधल्या व्हरांड्यात यायची आणि तिथून नेमकं डावीकडे वळून बाथरूमवरच्या मोकळ्या जागेत झेप घ्यायची. व्हरांडा पार करताना त्यांना उडत जाणं शक्य नसायचं, म्हणून ती चक्क माणसासारखी चालत चालत व्हरांडा पार करत!

एकदा गॅलरीत उभं राहून आसपासचा परिसर न्याहळत होतो. तांबट राहतात ते पांगाऱ्याचं झाड पूर्णपणं वठलेलं आहे, त्यात एक बोटभरही जागा ओली, जिवंत राहिलेली नाही हे प्रथमच लक्षात आलं.

बुंध्यातून दोनतीन मोठ्या फांद्यांत विभागणी झालेला, उघडाबोडका आणि निष्पर्ण पांगारा चांगलाच उंच गेला होता. त्याची मधली फांदी उंचावर जाऊन जांभळीच्या झाडात लुप्त झाली होती. तर दुसरी खालच्या छोट्या वाटेला समांतर स्थितीत हवेतल्या हवेत तरंगत होती. ती एकदम जीर्ण आणि हलकी असल्यानं स्वत:च्या भारानं कोणत्याही क्षणी

मोडून खाली पडेल असं वाटायचं. कावळे, कबुतरं, साळुंक्या असे पक्षी तिच्या टोकाला बसले की ती त्यांच्या वजनानं वरखाली झुलत राहायची. तिच्या टोकावर बसलेला पक्षी जेव्हा मोठी झेप घेऊन उडून जाई त्यानंतरचं तिचं थरथरणं मनाला हूरहूर लावून जायचं. कधी असं वाटायचं, की पांगाऱ्याचं झाड थरथरणाऱ्या फांदीच्या हातानं पक्ष्यांना आपल्याकडे बोलावत आहे, आशीर्वाद देत आहे. झाड वठलेलं असलं तरी त्याचं स्वतःचं, या साऱ्या वातावरणात अतिशय महत्त्वाचं स्थान आहे, हे हळूहळू माझ्या लक्षात येऊ लागलं होतं.

पांगाऱ्याचा एकीकडचा बुंधा अर्धवट तुटलेला होता तर दुसऱ्या बाजूनं एक कोरडा ठकठकीत डांब डोकं वर काढून उभा होता. त्या डांबाच्या शेंड्यावर तांबट बसला की त्याची ढोली त्याला समोरच दिसे.

ढोलीच्या तोंडासारखी आणखी तीनचार तोंडं त्याच फांदीवर थोड्या थोड्या अंतरावर कोरलेली होती. तांबटांनी ढोली कोरण्याआधी त्या त्या ठिकाणी प्रयत्न करून पाहिलेला असणार, पण ती जागा पसंत न पडल्यानं अर्धवट सोडून ते दुसऱ्या जागी ढोली कोरायला लागलेले असणार. शत्रूला चकवण्यासाठी त्यांनी केलेली ती युक्तीही असू शकते. आपण नेमकं कोणत्या ढोलीत राहतो हे त्याला समजू नये आणि त्याचा शोध सुरू असताना आपल्याला पुरेसा वेळ मिळून सुरक्षित ठिकाणी निघून जाता यावं हे कारण त्याच्या मागे असावं.

एकंदरीत, तांबटाचं डोकं ही एक और चीज आहे हे माझ्या लक्षात आलं.

पांगारा म्हणजे जणू साऱ्या पाखरांचा कल्पवृक्ष होता. त्यांना बाहेर कुठे काही खाद्य मिळालं नाही तर ते या झाडावर मिळणार हे अगदी ठरलेलं असायचं! त्याच्या कोणत्याही फांदीवर बसून तिथल्या ढिसाळ सालीवर चोच मारली की प्रथम तिचा एक छोटासा ढलपा तुटून खाली पडायचा. त्यामागून पिवळसर पांढरा भुसा हळुहळू तरंगत खाली जायचा. मग चोच मारलेल्या त्या जागेतून काही अळ्या, वाळवी, एखादा कीटक बाहेर पडायचा आणि त्याची शिकार व्हायची. चिमण्या, साळुंक्या, कावळे, कबुतरं अशा पक्ष्यांनी अनेक ठिकाणी चोची मारून जागोजागी ढलपे पडलेला पांगारा म्हणजे समरांगणात एकाकी लढत उभा असलेला योद्धा आहे असं मला कधी कधी वाटायचं.

बाजूलाच, पांगाऱ्याचं दुसरं एक हिरवंगार झाड डौलानं उभं होतं. त्याच्या अंगावरची हिरवी

साल, सालीवरचे काटे आणि त्याची तळहाताएवढ्या आकाराची त्रिदळ पानं नजरेत भरत. तांबटांची ढोली ज्यावर आहे तो सुका पांगारा आणि हा हिरवा पांगारा एकाच वयाचे होते. एकाच दिवशी ती दोन्ही झाडं लावलेली असणार हे उघड होतं, मग त्यांपैकी एक झाड जगलं आणि दुसरं वठलं, असं का व्हावं?

निरखून पाहिलं तर हिरवा पांगारा वसाहतीच्या कुंपणाच्या आत सुरक्षित जागेत तर वठलेला पांगारा बाहेर रस्त्यावर बेवारस स्थितीत उभा आहे हे लक्षात आलं. बाहेरच्या पांगाऱ्याला जाणाऱ्यांनी-येणाऱ्यांनी सहज हात लावावा, त्याच्यावर फटके मारावे, घाव घालावे, त्याच्या फांद्या मोडण्याचा प्रयत्न करावा अशी स्थिती. ओल्या पांगाऱ्यापर्यंत मात्र कोणी पोचू शकत नसे. लोकांच्या उपद्रवामुळेच बाहेरचा पांगारा मरणपंथास लागला आणि पूर्णपणे वठून गेला असं मला वाटलं.

सुक्या पांगाऱ्याविषयी क्षणभर वाईट वाटलं खरं, पण ते वठलेलं झाडच तांबटांना आणि अन्य कीटकांना आधार देत आहे हेही लक्षात आलं. त्या झाडात आपल्या तांबटांची ढोली आहे. तिथंच पिल्लं आहेत, त्यांचे आई-बाबा आहेत, तिथंच त्यांचं छोटंसं जग आहे. मग आणखी काय हवं? झाड जरी वठलेलं असलं तरी त्याच्यातही दुसऱ्याचं जीवन फुलवण्याची ताकद आहे हे लक्षात आलं.

जंगलातली अडगळ ही केवळ अडगळ नसते तर अनेक पक्ष्यांचं, फुलपांखरांचं, किड्या-मुंग्यांचं ते एक बहरलेलं विश्व असतं. झाड सुकलं की ते मेलं असं आपण समजतो, पण पांगाऱ्याचं वाळलेलं झाड मला नवीनच दृष्टी देत होतं; विचारांना नवी दिशा देत होतं...

जिवंत ओल्या झाडात पक्षी आपली ढोली का करत नाहीत असा प्रश्न आधी पडायचा. आता त्याचं हसू येतं. ओल्या झाडात ढोली करण्याची कल्पनाच किती खुळचट! त्या झाडात जर छोटंसं छिद्र पाडलं किंवा एखादी ढोली पोखरली तर, झाड जिवंत असल्यामुळे ती लगेच भरून नाही का येणार?

पोपट, घुबड यांच्यासारखे पक्षी वड, पिंपळ, पिंपरण अशा मोठ्या झाडांच्या पोखरीत राहतात. झाडाची वाढ होत असताना त्याची दुबेळकी, गाठाळ फांद्या किंवा अशाच काही कारणांनी निसर्गतः जी ढोलीसारखी सुरक्षित जागा तयार झालेली असते ती पोखर. त्यात ते राहतात. अंडी घालतात. आपला चिमणा संसार फुलवतात.



पांगाऱ्याचं लाकूड ठिसूळ. ते चोचीनं सहज टोकरता येतं. त्यात हवी त्या आकाराची ढोली कमीत कमी वेळेत तयार करता येते. शिवाय, ते लाकूड मऊ, उन्हाळ्यात थंडावा देणारं आणि थंडीत उबदार. मग असं झाड सोडून तांबट कशाला जातील वडा-पिंपळाच्या झाडांत ढोली तयार करायला?

विचारांच्या तंद्रीतून भानावर आलो. तांबटाचं पिल्लू जांभळीच्या झाडात शिरलेल्या पांगाऱ्याच्या सुक्याठाक फांदीवरून एकदा डावीकडे आणि एकदा उजवीकडे असे एकेका बाजूला उडत, दिशा बदलत, उलटसुलट होत मजेत वर पोचलं. फांदीच्या टोकाजवळची साल फुगून वर आली होती. काही किडी त्या सालीखाली वळवळताना त्याला दिसल्या. त्यानं तो खाऊ फस्त करावा या हेतूनं चोच मारली. त्याबरोबर सालीचा भला मोठा ढलपा मोकळा होऊन भसकन खाली कोसळला. पिल्लाला ती क्रिया अनपेक्षित होती. ते एकदम घाबरून गेलं, मागे फिरलं आणि सवयीनं तीनचार वेळा फांद्या बदलत पटकन ढोलीत शिरलं.

कॅशियावर सकाळी आणि संध्याकाळी पाखरांची गर्दी असायची. कधी कावळे, कधी साळुंक्या, कधी चिमण्या तिथं बसलेल्या दिसायच्या. झाडाची मालकी वाटून घेतल्याप्रमाणेच तिथं त्यांचा ठरावीक वेळी वावर असायचा. वड, जांभूळ

आणि भेंडीच्या उंच फांद्यांवर बसणं पोपटांना पसंत असायचं. तर कोकिळांचं आवडतं झाड म्हणजे वाहनतळावरचा उंच पिंपळ. त्याच्या घनगर्द पर्णसंभारातून त्यांना शोधून काढणं अवघड असायचं. पण कोकिळाला शोधा कशाला, त्याचं गाणंच ऐकावं की!

कोकिळांच्या वावरण्यात एक प्रकारचा जडावलेपणा असायचा. उडताना किंवा इकडे तिकडे फिरताना कोकीळ आणि कोकिळा जोडीनं जाणार हेही ठरलेलं. परस्परांपासून दूर राहणं त्यांना पसंतच नसायचं.

कोकिळेच्या अंगावरचे राखाडी रंगाचे ठिपके जितके लोभसवाणे तितका कोकिळाचा काळाशार तकतकीत रंगही सुंदर. त्यांचे डोळेही कुंकवासारखे लाल आणि सदैव धुंदीत असल्यासारखे! कावळ्याची शेपटी पिसांनी गच्च भरलेली आणि तरतरीत तर कोकिळाची खाली झुकलेली, विस्कटलेली आणि पिसं दुरून मोजता यावी इतकी कमी! कावळा जितका तेज आणि सावध तितका कोकीळ मंद आणि आळसावलेला. इतका आळशी, की कोकिळा अंडी घालायला शिरणार तीसुद्धा कावळ्याच्या घरट्यात!

एकदा कोकिळांची एक जोडी पिंपळावरून जांभळीवर आणि तिथून वडावर अशी झेपावत आली. रंगात येऊन क्लऽऽऽ क्लऽऽ, क्लाऽऽ क्लाऽऽऽ असा कर्णकटू आवाज काढत त्यांनी एकमेकांचा पाठलाग सुरू केला.

कोकिळा पिपरांच्या एका घोसाजवळ थांबली. तिनं एक चांगलं पिपर हेरलं आणि आख्खंच्या आख्खं चोचीत घेतलं. चोचीतल्या चोचीत तिनं ते उलटसुलट फिरवून तसंच अलगद धरून ठेवलं. तशाच विचारमग्न अवस्थेत ती काही क्षण बसून राहिली. जणू भोजनापूर्वीची प्रार्थना! नंतर मान वर करून तिनं ते पिपर आख्खंच्या आख्खं गिळण्याचा प्रयत्न केला. तिच्या घशातून ते खाली जात नव्हतं. मग तिनं दोन-तीन आवंढे गिळून ते पोटात ढकललं, तशी खात्री करून घेतली आणि मग भरल्या पोटानं, तृप्त मनानं पुन्हा कोकिळाच्या मागे लागली.


कोकीळ आख्खं पिपर गिळतात तर कावळे ते टोकरून टोकरून खातात हे दृश्य अनेकदा अनुभवायला मिळालं.

कॅशियाच्या झाडावर एकदा एका कोकिळाचं दिवसभर कुहुऽऽऽ, कुहुऽऽऽ चाललं होतं. कोकिळांचं आवडतं झाड होतं वाहनतळावरचा पिंपळ! क्वचितच ते जांभळीकडे किंवा वडाच्या झाडाकडे फिरताना दिसत. मी त्यांना कॅशियाच्या झाडावर बसलेलं कधी

पाहिलं नव्हतं. त्यामुळे कॅशियावर बसून कोकीळ गातोय हे मला जरा नवलाईचं वाटलं.

नंतर रोजच सकाळ, दुपार, संध्याकाळ तो कोकीळ कॅशियावर बसून आर्त सुरात कुहुऽऽऽ, कुहुऽऽऽ करत गात आहे असं लक्षात आलं. कॅशियाच्या मधल्या फांदीवर कावळ्यानं घरटं बांधलं होतं. कावळा आणि कावळी सदैव त्या घरट्याच्या आसपास बसून असत. तिथंच आजूबाजूला कोकीळ-कोकिळाही वावरत होती.

कॅशियाचं झाड हे भरवस्तीत, रस्त्याच्या बाजूला उभं असणारं आणि येणाऱ्या-जाणाऱ्याच्या सहज नजरेत भरणारं. शिवाय, त्याची पानं लहान आकाराची. त्याच्यावर एखादा पक्षी येऊन बसला तर त्याचं अस्तित्व लगेच नजरेत भरणार. असं असताना कोकीळ कॅशियावर बसून गाण्याचा धोका का पत्करत आहे, याचा जेव्हा मी बारकाईनं विचार केला तेव्हा कारण लक्षात आलं... कावळ्याच्या घरट्यात कोकिळेनं अंडी घातली होती आणि अंड्यातील जीवांसाठी कोकीळ गात होता. त्या गायनानं तो अंड्यातल्या जीवांना धीर देत होता. आपलं नातं अधोरेखित करत होता. वारसा निर्माण करत होता,'बाळांनो, मी इथं तुमच्या सोबतीला आहे, चिंता करू नका' असं सांगत होता.



कबुतरं अंडी उबवायला बसलेली असतील आणि अशा वेळी जर कोणी तिथं गेलं तर ती आमच्याकडे ढुंकूनही बघायची नाहीत. त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला तर आपल्या जागेवरून हलायचीसुद्धा नाहीत. उलट, अधिक आक्रमक व्हायची. अशा थाटात वावरायची, की जणू काही ती घरमालक आहेत आणि आम्ही त्यांचे भाडेकरू! एवढा बेडरपणा त्यांच्यात कोठून येतो असा प्रश्न पडायचा.

अंड्यावर बसलेला पक्षी अतिशय निर्भय असतो हे पुढे वाचनामुळे लक्षात आलं. अशा पक्ष्यावर कितीही मोठं संकट आलं तरी तो आपली जागा सोडून जात नाही. साधं टिटवीचं उदाहरण घेता येईल. तिचं घरटं जमिनीवर असतं. ती जर अंडी उबवायला बसली असेल आणि अशा वेळी समोर हत्ती जरी आला तरी ती विचलित होत नाही. उलट, काही ना काही करामती करून ती हत्तीला तिथून पळवून लावू शकते.

मातृत्वाची असीम ओढ आणि त्या जबाबदारीची उपजत प्रेरणा या पक्ष्यांना एवढं मोठं धैर्य देत असते.

आपलं घरटं कोठे आहे, आपली अंडी कोठे आहेत हे पक्ष्यांना नेमकं कसं कळत असेल, तिथवर पोचायचा रस्ता त्यांना कसा सापडत असेल यांसारखे प्रश्न मला पडत. हळूहळू त्यांची उत्तरंही मिळत. आनंद होई.

एका सकाळी सूर्याचे सोनेरी किरण नेहमीप्रमाणे ढोलीच्या कडेवर पडले. तिथून तो प्रकाश ढोलीच्या शुभ्र, मऊ, गुळगुळीत भिंतीवरून परावर्तित होत आतही पसरला. तांबटाची पिल्लं जागी झाली. ढोलीच्या कडेला आत आणि बाहेरून नख्यांनी मजबूतपणे पकड घालून एका पिल्लानं मान बाहेर काढली. इकडे तिकडे पाहिलं, पण त्याला त्याची आई-बाबा कुठं दिसेनात. पायाच्या पुढच्या नख्यांवर भार टाकून त्यानं आपलं शरीर पूर्णपणे बाहेर काढलं. दिशा बदलून ते ढोलीच्या बाहेरच्या बाजूला येऊन बसलं आणि डोकं मागे पुढे करत ढोलीत डोकावू लागलं. मोठे तांबट हुबेहूब असेच ढोलीत डोकावतात हे मला माहीत झालं होतं. पण पिल्लू असं आतबाहेर करताना एक नवीन गोष्ट प्रथमच जाणवली. त्याची छोटीशी शेपटी पांगाऱ्याच्या खोडाला बाहेरून टेकत होती. ती खोडावर दाबल्यामुळे पिल्लाला आपलं अंग ढोलीमध्ये अधिक जोरानं ढकलणं सोपं जात होतं. त्याला गंमत वाटत होती आणि तो प्रयोग ते पुनःपुन्हा करून पाहत होतं.

ढोलीच्या आतल्या कडेजवळ लाकडाचं एक चिमुकलं तूस बाहेर आलं होतं. पिल्लू शरीर

आत झुकवत, चोचीनं ते तूस बाहेर काढण्याचा प्रयत्न करू लागलं. एकदा, दोनदा; पण जमेच ना! तिसऱ्या प्रयत्नात बाहेरच्या खोडाच्या भिंतीवर शेपटीचा जोर लावून पिल्लानं झपकन आपलं शरीर आत लोटलं, चोच नेमकी त्या तुसावर मारली आणि काय आश्चर्य! ते त्याच्या चोचीत आलेलं होतं. वा! पिल्लाचा हा एक छोटासा पराक्रमच होता आणि या पराक्रमासाठी त्याला मदत झाली होती ती त्याच्या भुंड्या शेपटीची!

तांबटाची शेपटी भुंडी, दिसायला अनाकर्षक पण तिचं काम किती महत्त्वाचं हे लक्षात आलं.

तांबटाच्या पायाला पुढं दोन आणि मागं दोन अशा चारच नख्या असतात हेही या वेळी प्रथमच लक्षात आलं.

पायाच्या नख्या वळवत, पिल्लानं आपली दिशा बदलली आणि अंग ढोलीच्या आत घालून चोच बाहेर काढली. काळजीपूर्वक इकडे तिकडे पाहत तोंडातलं तूस फुंकून बाहेर टाकलं. हवेतून तरंगत खाली जाणाऱ्या तुसाचा प्रवास त्या वेळी नेमका एका प्रकाशाच्या कवडशामधून होत होता. त्यामुळे प्रकाशाचा छोटासा तुकडाच जणू खाली जात आहे असं मला वाटलं.

काही क्षणांनी, पिल्लू पुन्हा बाहेर आलं. त्याला भूक लागली असावी. ते सरळ बाहेर पडलं आणि समोरच्या डांबावर येऊन बसलं. दूरवरून 'टुक्... टुक्...'चा आवाज येत होता. त्यानं इकडे तिकडे शोध घेतला पण आई किंवा बाबा त्याला कुठे दिसेनात. त्यानं मान वर करून पाहिलं. जांभळीच्या झाडाचा शेंडा हवेनं डोलत होता. जणू त्याला खुणावत होता, जवळ बोलावत होता.

क्षणात, एक भरारी घेऊन पिल्लू वर पोचलं. तिथल्या लवचीक फांदीवर बसताच ती एकदम खाली झुकली आणि हेलकावे खाऊ लागली. टपोऱ्या जांभळांचा घोस तिथं लगडलेला होता. त्यातील एका फळाला त्यानं हळुवारपणे चोच लावली आणि त्यातला रस शोषून घेतला. मग त्यानं त्यातलं आणखी एक फळ टोकरून त्याचा गर खायला सुरुवात केली. ही चव त्याच्या ओळखीची होती. आई त्या फळाचा गर त्याला नेहमी आणून चारत असे.

खाणं झाल्यावर पिल्लू फांदीच्या शेंड्याकडून जांभळाच्या मधोमध असणाऱ्या मुख्य खोडाकडे वळलं. तिथनं दोनतीन छोट्या छोट्या भराऱ्या घेत मधल्या फांदीच्या वरच्या टोकाला गेलं आणि तिथं बसून मान वाकडी करत आई-बाबांचा शोध घेऊ लागलं.

दूर अंतरावर असणाऱ्या उंच झाडाच्या फांदीवर बसून त्याची आई 'टुक्...टुक्...' करत होती. त्यानं तिच्याकडे जायचं ठरवलं. मधल्या अंतराचा अंदाज घेत श्वास छातीत भरून घेतला, पंख पसरले, पायांनी फांदी मागे रेटली आणि भरारी घेतली.

त्याचं हे तोवरचं सर्वात मोठं उड्डाण होतं. मधेच क्षणभर ते कोलमडल्यासारखं झालं पण पंख अधिक जोरानं फडफडवत हवेतल्या हवेत वर गेलं आणि जमिनीला समांतर तरंगत पुढे झेपावू लागलं. एकदा डावीकडे आणि एकदा उजवीकडे झुकत एक पल्लेदार सूर घेऊन ते आईजवळ पोचलं. तिच्या अगदी बाजूला जाऊन बसलं. त्याच्या भारानं ती फांदी थोडी खाली गेली आणि पुन्हा वर आली. पिल्लाला त्याची गंमत वाटली. अशा पद्धतीनं लवचीक फांदीवर बसून झोके घेण्याची त्याला मग सवयच लागली.

या भागातलं हे सर्वात उंच झाड. गुलाबी कॅशियाचं. मोराचा फुललेला पिसारा असावा तशा त्याच्या फांद्या आकाशाच्या दिशेनं पसरलेल्या होत्या. प्रत्येक फांदीवर पानं, शेंगा आणि पिवळसर-गुलाबी फुलांचे घोस लगडलेले होते. त्याची तजेलदार पोपटी पानं, वाऱ्याच्या लहरींबरोबर उलटसुलट दिशेनं डुलणाऱ्या शेंगा आणि फांदीसोबतच डोलणारे फुलांचे घोस पाहून मन आनंदानं उचंबळून येत होतं.

फुलांतील मकरंद चाखण्यासाठी सूर्यपक्षी, फूलटोचे, बुलबुल यांच्याबरोबर फुलपाखरं आणि भुंग्यांनीही तिथं वर्णी लावली होती. स्वतंत्र विश्व असावं तसं झाड पूर्णपणे गजबजून गेलं होतं.

कोतवालानं मकरंद पिण्यात गुंग असणारे भुंगे टिपण्यासाठी आवर्जून हजेरी लावली होती. तो भुंगे टिपताना हवेतल्या हवेत अनेक करामती करत होता. बसलेल्या जागेपासून दूर असणाऱ्या फांदीवर, तो आपली नजर आधी रोखायचा. तिथल्या फुलांच्या झुबक्यावर जमा झालेले भुंगे आणि पाखरं यांची गर्दी हेरायचा. त्यातील टपोरा भुंगा त्याला पसंत पडला की मग तो भरारी घ्यायचा, त्या फुलांच्या गुच्छाजवळ जाऊन हवेतल्या हवेत भुंग्याच्या हालचालींप्रमाणे वरखाली होत, त्या भुंग्याला नेमकं गिळंकृत करायचा आणि पुन्हा आपल्या जागेवर येऊन नवीन शिकारीची तयारी सुरू करायचा.

तांबटाच्या पिल्लालाही कॅशियाच्या फुलांतील मकरंद चाखावा असं वाटलं, फुलांतील परागांचा गोड चारा खावा असं वाटलं. त्यानं आपली जाडभरड चोच एका फुलात घातली आणि बाहेर काढली. पिवळ्या परागकणांची हळद त्याच्या चोचीला लागली.

काही परागकण निखळून तरंगत हळूहळू खाली जाऊ लागले. पिल्लू ती गंमत पाहत असताना आईनं मोठी भरारी घेतली. क्षणाचा विलंब न करता त्यानंही भरारी घेतली आणि तिच्या पाठोपाठ, तिच्यासारखीच वळणं घेत, तसेच सूर मारत, त्यानं भरारणं सुरू केलं. अखेरीस, ती दोघंही सोनमोहोराच्या शेंड्यावर येऊन पोचली.

हिरव्यागार बारीक पानांचं आणि भरगच्च पिवळ्या फुलांनी बहरून आलेलं सोनमोहोराचं झाड पाखरांना हृदयाशी धरण्यासाठी जणू उत्सुक झालं होतं. शेंड्यावरची पालवी लवलवत होती. कोवळ्या पानांच्या हजारो हातांनी पिल्लाला जवळ बोलावत होती. आपली ओळख सांगत होती.

पिवळ्या फुलातून वर आलेले मोहोरदार तुरे आणि त्यावरील वाटाण्याएवढ्या आकाराच्या काळपट टपोऱ्या कळ्या पाहून पिल्लू खूष झालं. ते आपली चोच एका कळीवर दोन्ही बाजूंनी घासू लागलं. जणू त्याला त्या कळीशी बोलायचं होतं, पण प्रथमच त्याच्या लक्षात आलं की त्याला बोलता येत नाही, आवाज काढता येत नाही. त्यानं आई-बाबांना 'टुक्... टुक्...' असा आवाज काढताना अनेक वेळा पाहिलं होतं, त्या आवाजाची स्पंदनं स्वत:च्या हृदयात अनुभवली होती; पण तो आवाज त्याला स्वत:ला मात्र काढता येत नव्हता.

पिल्लाला अगतिक झाल्यासारखं वाटलं. स्वत:ची चीडही आली. त्या तिरमिरीत ते आक्रमक गिरकी घेऊन आईच्या पुढे जाऊन बसलं. जणू त्याला 'मला कधी काढता येईल टुक् टुक् असा आवाज?' असं जोरानं ओरडून विचारायचं होतं, पण आवाज फुटत नव्हता. अतिशय हतबल झालं होतं ते. आवाज काढता येत नाही ही जाणीव त्याला इतकी अपमानास्पद वाटत होती, की त्या भावनावेगानं त्याची भुंडी शेपटी थरथरू लागली.

त्याला काय म्हणायचंय ते त्याच्या आईला कळलं असेल का? ते सतत आपली मान डावी-उजवीकडे करत उत्तराच्या अपेक्षेनं तिच्याकडे पाहत होतं. ती काय उत्तर देणार होती? आधी डावा आणि नंतर उजवा पाय आडवा टाकत बाजूबाजूनं सरकत ती पिल्लाजवळ पोचली. तिनं चोचीतील एक घास त्याला चारला आणि चोचीनंच त्याच्या डोक्यावर कुरवाळू लागली.

पिल्लू फुरंगटून बसलं होतं. बोलता येत नाही, आवाज काढता येत नाही ही जणू काही आईची चूक असल्यागत ते वागत होतं. आईनं छोटीशी भरारी घेऊन त्याच्यासमोर दोन

सुंदर गिरक्या घेतल्या. सरळ रेषेत वरून खाली आणि खालून वर उडण्याची कसरत करून दाखवली. त्यानंतर त्याच्यासमोर बसून तिनं आवाज कसा काढतात हे दाखवणं सुरू केलं. सारं अंग आतल्या बाजूला धनुकलीसारखं वाकवत संपूर्ण शक्तीनिशी पोटातली हवा बाहेर फेकत ती आवाज काढू लागली.

'टुक्... टुक्...'

'टुक्... टुक्...'

आवाज काढता काढता, ती हळुहळू इतकी बेभान झाली, की जणू काही तो आवाज एवढंच तिचं अस्तित्व उरलं.

तिच्या कपाळावरचा आणि मानेवरचा लाल ठिपका पूर्णपणे जागा झाला होता. त्यातील पीस न् पीस मोहोरून आलं होतं. शरीरावरची पिसं हिरवी-पिवळी-निळी प्रभा बाहेर फेकत होती. डोळ्यांभोवतीची पिवळी अर्धवर्तुळं फुलून आली होती. मानेवर आणि पोटावर पसरलेला लाल आणि पिवळा रंग निसर्गानं हळदी-कुंकवाचं ओलं बोट नुकतंच लावावं तसा भासत होता.

आईच्या कपाळावरचं, गळ्यावरचं आणि मानेवरचं हे रंगांचं वैभव पिल्लाच्या प्रथमच लक्षात येत होतं. अतिशय एकाग्रपणे ती 'टुक्... टुक्...' करत होती. अधिक जोरानं, अधिक स्वच्छ, अधिक लखलखीत.

ती पिल्लाला सांगत होती,''येईल, तुलाही बोलता येईल, गाता येईल... पण त्यासाठी अजून थोडं थांबावं लागेल बरं का...जेव्हा तुझ्या कपाळावर रक्तवर्णी टिळा लागेल, गळ्याखाली लाल चिरी उमलून येईल, डोळ्यांभोवती आणि मानेवर जेव्हा पिवळा रंग उमलून येईल आणि चोचीच्या बुडाशी जेव्हा केसांचं गोलाकार कुंपण तरारून येईल तेव्हा तुलाही बोलता येईल बरं का, माझ्या लाडक्या...''

पिल्लू आनंदित झालं. आई इतक्या छान पद्धतीनं त्याला समजावून सांगत होती, की आपल्यालाही लवकरच आवाज काढता येईल असा विश्वास त्याच्या मनात निर्माण झाला होता.

आई पुन्हा बेभान होऊन 'टुक्... टुक्...' करू लागली.

सोनमोहोराची बहरून आलेली पिवळीजर्द फुलं ही त्या झाडाची बोली आहे हेही त्या वेळी लक्षात आलं.



तांबटाचं पिल्लू ढोलीसमोरच्या डांबावर बसून आजूबाजूचा निसर्ग न्याहाळत होतं. त्याच्यासोबत, मीसुद्धा वातावरणात रमून गेलो होतो. वडाच्या लोंबकाळणाऱ्या कोवळ्या डहाळ्या हवेच्या लहरींसोबत झुलत होत्या. त्यांच्या अंगावर जागोजागी पिपरांचे लालचुटूक घोस लगडलेले होते.

एक भुकेला कावळा आला आणि पिपरं खाण्याच्या घाईत एका डहाळीच्या टोकाशी बसला. कावळ्याच्या वजनानं डहाळी खाली गेली. त्याला हे अनपेक्षित होतं. त्यामुळे तो तोल सावरण्यासाठी कसरत करू लागला. झुलणारी डहाळी घट्ट धरून ठेवत, मान वाकडी करत, डोळे किलकिले करत त्यानं एक पिपर तोंडात धरलं. ते नेमकं चोचीच्या मधोमध धरल्यामुळे त्याची पुढची अर्धी चोच उघडीच राहिली होती. डहाळी कावळ्यासह झुलतच होती. कावळा हा जणू त्या फांदीचाच भाग असल्यासारखं वाटलं. वडाच्या डहाळीला कावळ्याचं फूल धरलेलं आहे असाही गमतीशीर विचार मनात आला.

कावळ्याला पिपर खायचं होतं, पण त्या क्षणी तशा अवस्थेत, म्हणजे झुलत्या डहाळीवर ते त्याला खाता येणं शक्य नव्हतं. मग झुलणाऱ्या डहाळीची लय पकडून पाय गुडघ्यात वाकवत, डहाळी मागे रेटत त्यानं छोटी भरारी घेतली आणि तो वरच्या मोठ्या फांदीवर जाऊन बसला. तिथं, त्यानं ते पिपर फांदीच्या आणि पायाच्या मधे पकडलं. मान वर करून इकडे तिकडे पाहत फांदीवर आपली चोच दोन्ही बाजूंनी परजून स्वच्छ केली, पिपरात घुसवली आणि त्यातील गर काढून, मान वर करून, डोळे मिटून चवीचा अंदाज घेत गिळून टाकला.

पक्ष्यांना कोणताही पदार्थ गिळताना मान वर करावी लागते. आसपासची कबुतरं, साळुंक्या, चिमण्या, बुलबुल, पोपट यांसारख्या पक्ष्यांच्या निरीक्षणातून अशा गोष्टी शिकायला मिळत होत्या. आनंद होत होता, समाधान मिळत होतं. माणसाचं जगणं सुसह्य आणि अर्थपूर्ण करण्यासाठी निसर्गानं पक्ष्यांची निर्मिती केली आहे. मुंबईसारख्या सिमेंटच्या जंगलातही निसर्ग माणसाला भरभरून देऊ पाहत आहे हे लक्षात येत होतं...

पोपटांचा थवा आला की वसाहतीचा परिसर जागा होऊन उठायचा. त्यांच्या चित्कारांनी पुलकित होऊन जायचा. ते 'चिर्रऽऽऽ, चिर्रऽऽऽ' आवाज करत, झाडांच्या फांद्यांमधून एकमेकांचा पाठलाग करत राहायचे. फांद्यांवर बसल्या बसल्या आपापसात चिरचिरत राहायचे. कधी ते आरडाओरडा करत या झाडावरून त्या झाडावर झेपावत, तर कधी कर्णकटू आवाज करत एकमेकांच्या छातीवर बसून उलटेपालटे होत. कधी हवेतल्या हवेत मारामाऱ्या करत. एखादा स्वत:तच मश्गूल झालेला पोपट गोड शीळ घालत कधी स्वत:ला फांदीवर उलटं टांगून घेतानाही दिसायचा.

एकदा, मी आणि सुरेखा फिरायला पहाटे बाहेर पडलो.

वसाहतीत करंजाची अनेक झाडं होती. त्यांना नुकतीच पालवी फुटून मोहोरही धरला होता. ओंजळीसारखी दिसणारी पण आकारानं नखाएवढी, पांढऱ्या-गुलाबी रंगाची लक्षावधी फुलं त्यांच्या फांद्या फांद्यांवरून डोळे उघडायला लागली होती. कोवळ्या डहाळ्यांच्या टोकांना तुरे फुटलेले होते. लवलवणाऱ्या असंख्य कोवळ्या तुऱ्यांनी झाडाभोवती वेलबुट्टी चितारली आहे असं वाटत होतं! अशाच एका फांदीवर एका पोपटानं स्वत:ला उलटं टांगून घेतलेलं दिसलं.

तो पोपट उलट्या स्थितीतच एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर चालत गेला आणि मोठ्या

नखऱ्यानं कोवळ्या तुऱ्यांचा चारा चरू लागला. नीट पाहिलं तर आणखी चार-पाच पोपट तसेच मोठ्या नजाकतीनं चरताना दिसले. त्या कोवळ्या हिरव्या चाऱ्यानं पोपटांच्या हिरव्या रंगाचं आणि मस्तीचं रहस्य माझ्यासमोर उघड केलं.

गॅलरीत उभं असताना एकदा वडाच्या बाजूनं एक पोपट आला आणि जांभळीच्या फांदीवर बसला. मी पोपट इतक्या जवळून प्रथमच पाहत होतो. त्याची लालभडक चोच, हळदुले गुलाबी पाय, गडद हिरव्या रंगाचे पंख आणि शेपटीतून तरारून बाहेर आलेली पोपटी-पिवळट रंगाची लांबलचक पिसं पाहून क्षणभर स्वत:ला विसरून गेलो. हलक्या आवाजात स्वत:शी 'चिर्रऽऽऽ, चिर्रऽऽऽ' करत जेव्हा तो इकडे तिकडे बघत होता तेव्हा त्याच्या डोळ्यांतली लालभडक बाहुली लहानमोठी होताना दिसत होती.


फांदीच्या वरच्या बाजूला टपोऱ्या जांभळांचा मोठा घोस लटकलेला होता. पोपटाला वर जाऊन जांभळं खायची होती. मधलं अंतर भरारी घेण्याइतकं मोठं नसल्यानं शिडीवरून वर चढावं तसं एकेक पाऊल उचलत तो घोसापर्यंत पोचला. वर जाताना, तो आपली बाकदार चोच वरच्या फांदीत आधी अडकावायचा आणि मग सारं शरीर त्यावर तोलत एक पाऊल पुढे उचलायचा. त्याचं ते ठुमकत ठुमकत चालणं पाहून देहभान हरपून गेलं.

शेपटीतून बाहेर पडलेल्या, त्याच्या पिसांचा पोपटी रंग पाहून तर मी खुळावून गेलो! निसर्गाच्या कारखान्यात नुकताच तयार झाल्यासारखा तो ताजा रंग झाडाच्या फांदीलाही चिकटून राहील इतका ओला आहे असं वाटलं.

हिरवा रंग एकच पण निसर्गात त्याच्या छटा किती वेगवेगळ्या! झाडाचं पान हिरवं पण ते सकाळच्या उन्हात वेगळं दिसतं, दुपारच्या उन्हात वेगळं आणि संध्याकाळच्या सावलीत वेगळं दिसतं.

तांबटाचा रंग हिरवा आणि पोपटाचाही हिरवा, पण दोन्ही छटांमध्ये किती फरक! पोपटाच्या तुलनेत तांबटाचा रंग डावा असला तरी तांबटाच्या कपाळावरचा आणि मानेवरचा लाल ठिपका हे मात्र त्याचं वैभव!

पक्ष्यांच्या सौंदर्याबाबत त्यांची एक दुसऱ्याशी तुलना करणं अयोग्य. कारण, प्रत्येक पक्ष्याकडे त्याचं स्वत:चं असं काहींना काही वैशिष्ट्य असतंच. प्रत्येक पक्षी आपापल्या जागी तितकाच सुंदर!



पंख पसरून भरारी घेणाऱ्या साळुंकीच्या पंखांवरचे पांढरे ठिपके आणि शेपटीची पांढरी कड पाहत राहावी अशीच असते. एरवी, साळुंकीच्या पंखांवर किंवा शेपटीच्या टोकाला अशी काही पांढरी नक्षी असेल हे लक्षात येत नाही; पण एकदा का ती उडू लागली की ते रंगरहस्य आपोआप उघडं होतं. तिचे हळदुले पाय, पिवळी चोच, कोकमी रंगाची ताशीव अंगकांती पाहताना स्वत:ला विसरून जायला होतं.

फावल्या वेळात जागा मिळेल तिथं बसून चोचीनं अंग साफ करणं हा सगळ्या पक्ष्यांचा आवडता छंद. त्या वेळची त्यांची एकाग्रता प्रेक्षणीय असते. मूळ रंग कोणताही असो पण चोचीनं पिसं साफ करताना पिसांच्या मुळाशी असणारा मऊसूत पांढरा रंग उघडा पडतो. पाहणाऱ्याच्या नजरेत भरतो. अशा वेळचा साळुंकीचा नखरा तर अगदी अनुपम अशा स्वरूपाचा!

रानचिमण्या, दयाळ, नाचण, धोबी, बुलबुल, कोतवाल, राघू, कधी हळद्यासारखे पक्षीही वसाहतीच्या परिसरात यायचे. एकदा तर चक्क एक खंड्याच कॅशियाच्या झाडावर बसलेला दिसला. पांढरीशुभ्र छाती, लाल रंगाची जाड चोच, पंखांची निळी कड आणि चॉकलेटी रंग. आश्चर्य वाटलं. खंड्या दिसण्याचं मुख्य ठिकाण म्हणजे पाणथळ जागा, नद्या, नाले,

किनारे! आमच्या जवळपास अशी एकही पाणथळ जागा नाही, मग हा खंड्या आला कोठून? दूरध्वनी करून चितमपल्लींना विचारलं. ते म्हणाले,'मासे हे जरी खंड्यांचं खाद्य असलं तरी शहरी भागात काही ठिकाणी कीटक खाणारे खंड्येही आहेत!'

कॅशियावर बसलेल्या खंड्याच्या चोचीत असंच काहीतरी वळवळणारं खाद्य होतं. त्यानं ते मान वर करून गपकन गिळलं आणि तो भरारी घेत घेत पिंपळाच्या दिशेनं नाहीसा झाला.

अनुरागची दहावीची परीक्षा सुरू होती. त्याच्या अभ्यासासाठी रजा घेऊन घरी थांबलो होतो. आमचा बराचसा अभ्यास बाहेरच्या खोलीत व्हायचा. दुपारी ऊन तापलं की मग आमचा मुक्काम जांभळीकडच्या गॅलरीकडे हलायचा. तिथं छान, थंड वाटायचं. सायंकाळी पाच-साडेपाचच्या सुमारास पुन्हा आम्ही जागा बदलायचो आणि बाहेर कॅशियाकडच्या गॅलरीत येऊन बसायचो.

अभ्यास करता करता, पक्ष्यांच्या आवाजांकडे लक्ष ठेवणं आणि जवळपासच्या झाडावर एखादा पक्षी येऊन बसला की त्याचं निरीक्षण करणं हेही सुरू असायचं.

रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या अशोकाचा शेंडा स्वत:च्या वजनानं खाली झुकलेला होता. तो जिथून खाली वळतो तिथली वीतभर लांबीची उघडी पडलेली फांदी हाच त्या झाडाचा शेंडा झाला होता. त्या उघड्या फांदीवर एखादा पक्षी येऊन बसला की आमची चंगळ होत असे. कारण उंचावर, मोकळ्या जागी बसलेल्या पक्ष्याच्या सर्व हालचाली आम्हांला नीट टिपता येत असत.

कावळे, साळुंक्या, तांबट हे पक्षी तिथं अधूनमधून बसलेले दिसत. एखादा पक्षी आधीच येऊन बसलाय आणि दुसरा आला तर अशा वेळी पहिल्या पक्ष्याला हुसकावून लावण्यासाठी त्याच्या ज्या करामती चालायच्या त्या पाहून आमचं मनोरंजन व्हायचं. प्रत्येक पक्ष्याला त्या उघड्या फांदीवर बसायची इच्छा असायची. जणू काही त्याशिवाय त्याचं श्रेष्ठत्व सिद्ध होत नव्हतं!

सकाळी किंवा संध्याकाळी अंधूक प्रकाशात तिथं बसलेल्या पक्ष्यांच्या केवळ बाह्याकृती दिसत, पण त्या आकारावरूनही ते पक्षी कोणते हे आम्ही नेमकं ओळखत असू. पूर्ण वाढ झालेल्या तांबटाची बाह्याकृती साधारणपणे इंग्रजीतील 'झेड' या अक्षरासारखी दिसते हे याच नादात लक्षात आलं.



पहाटे एकदा एक लंगडा बगळा चरण्यासाठी बाहेर पडलेला मी पाहिला होता. त्याचा एक पाय हवेत असा लोंबकाळत होता, की जणू तो त्याच्या शरीराचा भाग नाहीच. मी तसं घरात सांगितलं तर माझ्या या बोलण्यावर कोणी विश्वास ठेवला नाही.

एकदा सुट्टीच्या दिवशी संध्याकाळी मी आणि सुरेखा पाहुण्यांना सोडण्यासाठी खाली गेलो होतो. वाहनतळावर वाहनाच्या प्रतीक्षेत उभं असताना अचानक आकाशात लोंबकाळणाऱ्या पायाचा तो बगळा दिसला. त्याची घरी परतण्याची वेळ झाली होती. मी ओरडून सुरेखाला बगळा दाखवला, मग तिचा विश्वास बसला.

एकदा कामावरून घरी परत आल्यावर अनुरागनं ''बाबा, तो लंगडा बगळा आज मलाही दिसला'' असं धावत येऊन सांगितलं. आम्ही दोघांनीही त्या वेळी एकमेकांना जे आनंदाचं स्मित दिलं त्याचं वर्णन शब्दांत करता येणं कठीणच!

''एखाद्याला जर पक्षिनिरीक्षणाचा छंद जडला तर तो केवळ त्याच्यापुरता मर्यादित राहत नाही तर त्याच्या मित्रपरिवारात आणि घरातही पिढ्या न् पिढ्या चालू राहतो'' असं चितमपल्लींनी एकदा बोलता बोलता सांगितलं होतं, त्याची आठवण झाली.

तांबटाची दोन्ही पिल्लं वाढीला लागली होती. चोचीपासून शेपटीपर्यंत नीट नजरेत भरत होती. दोघांच्या चोची भरीव आणि गडद काळपट होऊ लागल्या होत्या. मात्र डोक्यावर अद्याप लाल ठिपका उमटलेला नसल्यामुळे ती अजूनही पोरं वाटायची.

वसाहतीच्या मधोमध असणाऱ्या वडाच्या प्रचंड विस्तारात पिल्लं बऱ्याचदा लपाछपीचा खेळ खेळायची. त्याची लालचुटुक पिपरं खायची. पक्ष्यांना आवडणाऱ्या असंख्य कीटकांची वस्ती वडावर होती. फांदीवर कोणत्याही जागी एक टोच मारली तरी तेथील छिद्रातून दोनचार अळ्या सहज बाहेर पडायच्या. पोट भरलं की मग ती पांगाऱ्याकडील आपल्या ढोलीकडे आनंदानं परतायची.

वसाहतीतून फिरताना मी पायाखाली कमी आणि झाडांकडेच अधिक बघत असायचो. सायकलवरून फिरत असलो तरी जागोजागी थांबून झाडांचं, पाखरांचं आणि आकाशाचं माझं निरीक्षण सुरूच असायचं.

पिल्लांचे पंख मजबूत झाले होते. पाय लांब आणि नख्या टोकदार झाल्या होत्या. छातीचा घेर वाढला होता. मनात आलं की ती शेपटी तुर तूर हलवू शकत होती. पंखांची उघडझाप करू शकत होती. मान पूर्ण मागे वळवून चोचीनं पाठ खाजवू शकत होती. त्यांच्या गात्रागात्रात आत्मविश्वास निर्माण झालेला दिसत होता. आपल्या हालचालींवर त्यांना नियंत्रण ठेवता येऊ लागलं होतं.

उणीव फक्त दोन गोष्टींची होती. कपाळावरचा, मानेवरचा लालभडक रंग आणि 'टुक्... टुक्...' हा आवाज.

एका सुट्टीच्या दिवशी मी काहीतरी वाचन करत पडलो होतो. एकदम खोलीत धूर यायला लागला. क्षणभर काही कळेना. गॅलरीच्या समोरून धुराचा एक मोठा ढग निघून गेला. त्यातला काही धूर आत आला. नाकातोंडात गेला. गुदमरायला झालं. बाहेर आलो आणि खाली पाहिलं.

दुकानाच्या मागच्या बाजूला राहणाऱ्या कडक्या म्हाताऱ्यानं खालचा सगळा पालापाचोळा एकत्र करून शेकोटी केली होती. सुका पाचोळा तडातड जळत होता. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट वर चालले होते. म्हाताऱ्यानं शेकोटी दुकानाच्या भिंतीजवळ केल्यामुळे पांगाऱ्याच्या झाडाला त्याची धग पोचत नव्हती, हे त्यातल्या त्यात बरं होतं. भिंतीजवळून वर गेलेलं नारळाचं झाड मात्र चांगलंच भाजून निघत होतं. पांगाऱ्यातली ढोलीही धुरानं लपेटून टाकली होती.

बाजूचा ओला पांगारा, वड आणि जांभळीलाही धुरानं लपेटून टाकलं होतं.

तिथले कावळे ‘काऽऽऽव, काऽऽऽव’ करत इतरांना सावध करत इकडून तिकडे पळू लागले. साळुंक्या, चिमण्या छोट्या छोट्या भराऱ्या घेत सुरक्षित ठिकाणी पळाल्या. कबुतरं शेजारच्या इमारतीतील गॅलरीत घुसू लागली.

आगीच्या ज्वाळा लवलवत होत्या. पाचोळ्यातील कीटक जळून भस्म होत होते. तांबटाचं एक पिल्लू ढोलीतनं बाहेर आलं आणि जवळच्या गुलमोहोरावर जाऊन बसलं. काय चाललंय हे त्याच्या लक्षात येत नव्हतं. ते गुदमरलेलं, भेदरून गेलेलं दिसत होतं... छातीत गेलेला धूर त्याला बाहेर काढायचा होता. मान आणि शेपटी खाली दाबत त्यानं आपलं शरीर धनुकलीसारखं खाली वाकवलं...चोचीतून ‘फूऽऽऽस, फूऽऽऽस’ करत हवा बाहेर काढली. एकदा-दोनदा-तीनदा... शरीर धनुकलीसारखं वाकवत चोचीतून हवा बाहेर काढण्याचा ते प्रयत्न करू लागलं. पुन्हा... पुन्हा...जोरानं...अधिक जोरानं... आणि काय आश्चर्य!


‘फूस... फूस..., वॉक्... कॉक्...’ करता करता ‘टुक्... टुक्...’चा कोवळा आवाज त्याच्या गळ्यातून बाहेर येऊ लागला!
‘टुक्... टुक्...’
होय अगदी नक्की. ज्या आवाजाची इतक्या दिवसांपासून पिल्लू वाट पाहत होतं तोच होता तो आवाज!
‘टुक्... टुक्...’
तांबटाला कंठ फुटला होता. त्याला बोलता येऊ लागलं होतं. आनंदानं नाचावं, गावं, साऱ्या जगाला ओरडून सांगावं असं मला वाटू लागलं.

खात्री करून घ्यावी म्हणून मी पुन्हा नीट निरखून पाहिलं. पिल्लू आवाज काढत होतं, ‘टुक्... टुक्...’ आपली सर्व ताकद एकवटून शरीर धनुकलीसारखं वाकवत ते ‘टुक्... टुक्...’ करत होतं, जणू दाही दिशांना पुनःपुन्हा ओरडून सांगत होतं, ऐका... मी बोलू शकतो, गाऊ शकतो, ऐका...
‘टुक्... टुक्...’
‘टुक्... टुक्...’
त्या आनंदाच्या भरात पिल्लानं आकाशात उंच उसळी घेतली आणि वरच्या वर पंख मिटून डूब घेत स्वतःला खाली झोकून दिलं. त्याच्या शरीराचं मुटकुळं सोनमोहोराच्या

फुललेल्या शेंड्यावर पडलं. फुलांतील केसर भिरभिरत जमिनीवर पडू लागले. त्यांवर पडलेल्या प्रकाशाच्या कवडशांमुळं निसर्ग धरणीवर सोन्याची रिमझिम करत आहे असं वाटून गेलं...

मधे बरेच दिवस गेले.

एका सुट्टीच्या दिवशी मी बाहेरच्या खोलीत बसून काही काम करत होतो. अर्थात माझं लक्ष अधूनमधून बाहेरच्या झाडांवर जात होतंच! काही वेळानं एक कोकीळ आला आणि कॅशियावरच्या उघड्या फांदीवर बसला. तो बराच वेळ तिथं घुटमळतोय हे लक्षात आल्यावर मी गॅलरीत येऊन लक्ष देऊन पाहू लागलो.



मावळतीला निघालेल्या सूर्याचे सोनेरी किरण कोकिळाच्या अंगावर पडले होते. त्या प्रकाशात त्याची राखाडी चोच आणि कुंकवासारखे लाल डोळे उठून दिसत होते. बराच वेळ, तो तसाच नि:स्तब्ध बसून राहिला. मग त्यानं आपली मान डावीकडे वळवत चोच

मागे नेली, मागनं शेपटीचा पिसारा वळवत पुढे आणला आणि तिकडच्या पिसात चोच घालून, पिसं खाजवून, साफ करून घेतली. चोच उजवीकडे वळवून मागे नेत आणि त्याच वेळी शेपटीची उजव्या बाजूची पिसं पुढे आणत तीसुद्धा मनसोक्तपणे स्वच्छ करून घेतली आणि तो पुन्हा निवांत झाला.

त्यानंतर मान खाली झुकवत, उजव्या पायाचा पंजा वर नेत कोकिळानं आपलं डोकं दोनतीनदा खाजवलं आणि पुन्हा तो स्तब्ध झाला. काही क्षणांनी, त्यानं आपली चोच वासून चक्क जांभई दिली. त्याचा ओलसर गुलाबी जबडा पूर्णपणे उघडलेला मला दिसला. सायंकाळच्या सूर्याची सोनेरी किरणं त्यावर पडली होती आणि त्यामुळे ते दृश्य अधिक गहिरं वाटत होतं. त्याचा आनंद घेत असतानाच, क्षणार्धात सूर्य ढगाआड झाला आणि कोकिळावरचा प्रकाश अंधूक होऊन निसर्गाच्या अलौकिक चित्रपटातलं ते दृश्य धूसर होत बदलत गेलं.

कोकीळ बसला होता त्याच्या खालच्या फांदीवर काही दिवसांपूर्वी कावळ्याचं घरटं होतं. त्यात कोकिळेनं अंडी घातली होती. त्या अंड्यांतून बाहेर आलेल्या पिल्लांचं पितृत्व ह्या कोकिळाकडे असावं, असं मला जाणवलं. त्या फांदीवर बसून, स्वत:ला त्या जुन्या आठवणींशी जोडून तो कोकीळ अनोख्या तृप्तीनं उडून तर गेला नसेल?

पिल्लं मोठी झाली होती. स्वत:चं अन्न स्वत: मिळवू शकत होती. आवाज काढू शकत होती. पण अजूनही आई-बाबा तांबट त्यांना सोडून निघून गेले नव्हते. ते त्यांच्यावर लक्ष ठेवून असत. ढोलीतून बाहेर पडताना प्रत्येक वेळी आजूबाजूला आणि वर-खाली पाहणं आवश्यक आहे याची आठवण करून देत. पिल्लांच्या अवतीभोवती राहत. शिकारी पक्ष्यांपासून बचाव कसा करायचा हे शिकवत. त्यांना कधी एखादी मोठी अळी सापडली किंवा एखाद्या फळाचा गर मिळाला तर ते मुद्दाम तो ढोलीत आणून ठेवत.

छायाचित्रकार विजय होकर्णे यांचा एकदा नांदेडहून फोन आला. ते काही कामानिमित्त बाहेर पडले असताना, त्यांच्या समोरच एका घारीनं एका तांबटावर झडप घालून त्याला उचललं आणि घेऊन जाऊ लागली. सुदैवानं तो तिच्या पकडीतून सुटला आणि खाली पडून धडपडू लागला. घार पुन्हा त्याला उचलायला येणार तोवर धावत जाऊन विजयनी त्याला आपल्या ताब्यात घेतलं.

घारीच्या तीक्ष्ण नख्यांमुळे तांबटाच्या कुशीत आणि पोटावर जखमा झाल्या होत्या. डोकीवर चोच मारल्यामुळे तिथली पिसं निघाली होती आणि मांस बाहेर आलं होतं. काय करायचं असं विजय फोन करून विचारत होते. त्याला मध किंवा गुळाचं पाणी पाजण्याविषयी मी त्यांना सांगितलं आणि त्याची छायाचित्रंही घेऊन ठेवायला सांगितली. इतक्या जवळून पुन्हा कधी तांबटाची छायाचित्रं घेता येतील अशी शक्यता नव्हती.

सकाळी पुन्हा विजय यांचा फोन आला. रात्री तांबट मरण पावल्याची बातमी त्यांनी दिली.



गॅलरीत उभं राहून निरीक्षण करत असताना हे सारं आठवलं. आपल्या पिल्लांवर तशी वेळ येऊ नये अशी प्रार्थना मी मनोमन करू लागलो. आकाशात कुठं घारी तर फिरत नाहीत ना, आजूबाजूला एखादा शिक्रा दबा धरून बसलेला नाही ना हे पाहू लागलो.

एकदा एक कावळा चोचीत कसलीशी शिकार घेऊन आला आणि पांगाऱ्याच्या मधल्या फांदीवर, बेचकीत बसला. ती शिकार म्हणजे एक छोटी पाल होती. कावळ्यानं चोचीच्या मधोमध तिला चांगलीच दाबून धरली होती. दुरूनही तिची वळवळ मला स्पष्टपणे दिसत होती.

पाल चांगलीच वळवळत आहे हे पाहून कावळ्यानं तिला चोचीत तशीच धरून एकदा डाव्या आणि एकदा उजव्या बाजूला आपटणं सुरू केलं. ते झाल्यावर मग त्यानं तिला चोचीतून काढून पायाखाली धरली, उलटीपालटी करून पाहिली. ती अजूनही जिवंत आहे हे लक्षात आल्यावर त्यानं तिला मानेजवळ धरून उचललं आणि अधिक जोरानं फांदीवर आपटलं.

पाल गतप्राण झाल्याची खात्री होताच त्यानं तिला उताणी करून पायाखाली दाबून धरली. इकडे तिकडे पाहत धार लावत असल्याप्रमाणे चोच दोन्ही बाजूंनी फांदीवर परजली आणि तिच्या पोटात खुपसली. आतून चांगलं चोचभर मांस बाहेर काढून मान वर करून एक-दोन आवंढे घेत त्यानं ते गिळलं आणि मोठ्या तृप्तीनं डोळे मिटून घेतले.

काही क्षणांनी कावळ्यानं डोळे उघडून पुन्हा इकडे तिकडे पाहिलं. चोचीनं पाल उचलून एकेक पाय डावीकडे सरकवत तो फांदीच्या सांध्यापर्यंत पोचला. तिथं त्यानं एका ठिकाणी खोडापासून सुटून पोपड्यासारखी बाहेर आलेली साल हेरली आणि त्या पोकळीत ती पाल व्यवस्थित खोचून ठेवली. तशी खात्री करून घेतल्यावर मग तो 'जरा फिरून यावं' अशा थाटात दूर उडून गेला... भूक लागली, की तो पुन:पुन्हा तिथं येऊन त्या शिकारीचा आस्वाद घेणार होता.

हे पाहून होत नाही तोवर तांबटाचं पिल्लू भुर्रकन बाहेर पडलं आणि गुलमोहोराच्या एका फांदीला वळसा घालून पुन्हा डांबावर येऊन बसलं. त्याला आवाज काढून पाहण्याची लहर आली. चोच आणि शेपटी वाकवत अंगाची धनुकली करत ते आवाज काढण्याचा प्रयत्न करू लागलं. आधी दोन-तीनदा फक्त बिनआवाजाची पोकळ हालचाल झाली, मग 'फूस...फूस...' असा आवाज करत हवा बाहेर पडायला लागली, त्यामागून हळूहळू 'वॉक्...कॉक्...' आणि अखेर 'टुक्... टुक्...' असा आवाज बाहेर पडू लागला.
हा क्रमही माझ्या सवयीचा झाला होता. मोठे तांबट आवाज काढायला लागले, की सुरुवातीला नुसती पोकळ हालचाल व्हायची. नंतर 'फूस फूस' असा पुसटसा आवाज येऊ लागायचा. त्यानंतर मग 'वॉक्... कॉक्' असा आणि मग दणदणीत 'टुक्... टुक्...' असा आवाज निघणं सुरू होई.

दहा-वीस वेळा आवाज काढला की पिल्लं दमायची. त्यांच्या दोन आवाजांच्या मधलं अंतरदेखील कमीजास्त असायचं. मोठ्या तांबटांचा आवाज मात्र अगदी स्वच्छ आणि खणखणीत! दोन आवाजांतील अंतरसुद्धा मोजून घ्यावं इतकं समान. एक, दोन, तीन, चार, चाळीस, पासष्ट, शंभर... एकदा मी आकडे मोजले ते साडेचारशे भरले. एकदा पिल्लांच्या आवाजाचे आकडे मोजले ते चोवीस भरले.

आवाज काढताना मोठे तांबट डोकं केवळ खाली न झुकवता ते डावीकडे आणि उजवीकडेसुद्धा वळवू शकत. ती पुढची पायरी होती आणि अद्याप ती पिल्लांना गाठता आलेली नव्हती.

डावी-उजवीकडे चोच वळवून 'टुक्... टुक्...' असा आवाज केला की तांबट नेमका कुठे बसला आहे हे शत्रूच्या लक्षात येत नाही, त्याच्या मनात गोंधळ निर्माण होतो. तांबटांचं स्वसंरक्षणाचं ते एक मोठं शस्त्र आहे हे लक्षात आलं होतं.

कबुतरांचा घरातील वावर पहिल्या वर्षी आम्ही फार गंभीरपणे घेतला नाही. कारण त्यात थोडी नवलाई, थोडी उत्सुकता आणि थोडा भूतदयेचाही भाग होता. शिवाय, आम्ही काही ठरवायच्या आत त्यांनी अंडीही घातल्यामुळे त्यांना हुसकावून लावणं योग्य झालं नसतं. पिल्लं उडून जाईपर्यंत त्यांचा त्रास सोसणं भाग होतं. सगळ्यात त्रासदायक होता तो त्यांच्या शिटीचा वास! तो इतका उग्र आणि मनस्ताप देणारा होता की काहीही झालं तरी या पुढे कबुतरांना घरात थारा नाही, हा निर्णय आम्ही पक्का करून टाकला होता.

अखेर एक दिवस पहाटे पहाटे बाथरूमवरच्या मोकळ्या जागेतून 'चिंऽऽऽ, चिंऽऽऽ' असा आवाज येऊ लागला. पिल्लं अंड्यातून बाहेर आली होती. आम्ही जवळ जाऊन पाहिलं. दोन पिल्लं होती. बटबटीत बंद डोळे, बेढब चोची, नाकाजवळचे कोवळे मांसल ठिपके आणि उघडे अंग यांमुळे अगदी ओंगळवाणी दिसत होती ती. त्यांना नीट बसता येत नव्हतं की उभंही राहता येत नव्हतं. खाण्यासाठी सतत धडपड करणं एवढंच त्यांचं विश्व होतं. मोठी कबुतरं वारंवार फेऱ्या मारत त्यांना दाणापाणी आणून चारू लागली. आम्ही अधूनमधून त्यांच्या मागे लागत असल्यामुळे त्यांच्या या कामात अडथळे येत होते. पण प्रसंगी कमी अन्न मिळूनही कबुतरांच्या उबेवर पिल्लं भरभरा वाढू लागली. काही दिवसांतच त्यांच्या अंगावर पिसांचा 'दूधभुरा' धरला.

मोठी कबुतरं जे काही अन्न आणायची त्याचं चोचीतल्या चोचीत दूध तयार करून पिल्लांना पाजायची. त्यामुळे त्यांना गिळण्याचा किंवा पचनाचा त्रास होत नसे. महिनाभरातच पिल्लं स्वत:च्या पायावर उभी राहू लागली. दूधभुऱ्याची जागा निळसर पिसांनी घेतली. बेढब चोचींना नेटका आकार आला. नाकावरचे ठिपके ठळक झाले. डोळेही नीट उघडले. अंगातली ताकद आणि 'चिंऽऽऽ, चिंऽऽऽ' वाढली. ती चारापाण्यासाठी गडबड, रेटारेटी करू लागली.

पिल्लांच्या या लाडाकोडात कबुतरांच्या घरातील फेऱ्या वाढल्या. त्यांचा वाढता उपद्रव आम्ही निमूटपणे सहन करत होतो. पिल्लं कधी एकदा घराबाहेर पडणार याची वाट पाहत होतो. अशातच एक दिवस सकाळी सकाळी एक पिल्लू वरून उडालं आणि गॅलरीतून येणाऱ्या प्रकाशाच्या दिशेनं भरारत खाली उतरलं. माझ्या काळजाचा ठोका चुकला, कारण खोलीतला पंखा सुरू होता. त्याचं पातं पिल्लाला लागलं तर काय होईल याची कल्पनाच करवत नव्हती. मी झटकन पंखा बंद केला आणि पिल्लू पुढे काय करतं हे पाहू लागलो. पाठोपाठ, दुसरं पिल्लूही छोटी भरारी घेऊन गॅलरीत आलं. काही क्षणांनी, दोन्ही पिल्लं बाहेरील जाळीचा अंदाज घेत धडपडत-फडफडत बाहेर पडली आणि खिडकीचं तावदान, जांभळीची फांदी असं करत इमारतीच्या वरच्या भागात निघून गेली.

त्यांच्या बाळलीला कौतुकानं पाहत मोठी कबुतरं बाहेर तयारीतच बसली होती. पिल्लं बाहेर पडल्यावर त्यांच्या पाठोपाठ तीही उडाली आणि त्यांच्या मागे मागे फिरत त्यांना संरक्षण देऊ लागली.


दोन्ही पिल्लांचं प्रशिक्षण त्या बाहेर पडण्याच्या क्षणापासून सुरू झालेलं आहे हे माझ्या लक्षात आलं. खाणं-पिणं मिळवणं आणि स्वत:चा जीव जगवणं यासाठी आवश्यक असणारी सारी कौशल्यं त्यांना अल्पावधीत शिकून घ्यावी लागणार होती. शिकारी पक्ष्यांपासून क्षणोक्षणी सावधानता कशी बाळगायची याचं तंत्र आत्मसात करून घ्यावं लागणार होतं. 'बळी तो कान पिळी' हा निसर्गाचा नियम आहे, इथं दुबळेपणा काही कामाचा नाही हे समजून घ्यावं लागणार होतं.

पिल्लं उडून गेल्यानंतर, त्यांचं ते उग्र वासाचं घरटं आम्ही लगेच बाहेर काढून फेकून दिलं.

घरटं मजबूत होतं. सुबक विणलेल्या बांबूच्या टोपलीचा तळ असावा तसा त्याचा आकार होता. वीण घट्ट, आकारबद्ध आणि समतोल होती. दगड-गोटे, काड्या एकत्र चिकटून

राहाव्यात यासाठी कबुतरांनी शिटीचा वापर सिमेंटसारखा करून घेतला होता. त्यातूनच किडी-मुंग्या फिरत होत्या, घरट्याच्या आजूबाजूला चिकटलेली पिसं भुरभुरत होती.

घरटं फेकून देताना मनात किळस होती पण पिल्लांचा जन्म तिथंच झाला, तिथंच त्यांची वाढ झाली, तेच वातावरण त्यांच्यासाठी पोषक होतं हे वास्तवही विसरता येत नव्हतं.



सोनमोहोर, भेंडी, जांभूळ, वड या झाडांचा पाचोळा दुकानाच्या छपरावर साचून तिथं त्याचा जाड थर निर्माण झालेला असायचा. त्यातली बरीचशी पानं हवेनं खाली जमिनीवर पडायची, पण तोवर झाडावरून पुन्हा नव्या पानांची भर छपरावर पडलेली असायची. सोनमोहोराची फुलं जेव्हा गळायला लागली तेव्हा त्या भागातील छपरावर पिवळ्या रंगाचा गालिचा तयार झाला.

दुपारच्या वेळी एक पांढरी मांजर सावधपणे एकेक पाऊल उचलत यायची आणि छपराच्या मध्यभागी असलेल्या सिमेंटच्या पत्र्यावर आराम करत पडायची. तिथल्या पाचोळ्यात एखादा उंदीर किंवा सरडा दिसला की मग लगेच तरतरीत होऊन ती त्याचा पाठलाग करायची. अधूनमधून चिमण्यांचा किंवा साळुंक्यांचा थवा कलकलाट करत छपरावर खेळताना दिसायचा. त्यांच्या खेळात कधी मांजरीची झोपमोड झाली की ती त्यांच्यावर


गुरकवायची. एखाद्या साळुंकीवर किंवा चिमणीवर जेव्हा ती धावून जायची तेव्हा तिचं ते हवेतल्या हवेत पंजे मारणं मजेशीर दिसायचं. त्यांच्या मागे धावताना छपरावरून खाली पडू नये यासाठी तिला अधिक सावध राहावं लागायचं. त्या वेळी होणारी तिची कसरत पाहून चांगलंच मनोरंजन होई.

पांगाऱ्याचं झाड म्हणजे साऱ्या पक्ष्यांसाठी मोठा खजिनाच होता. अनेक प्रकारच्या कीटकांनी लहानमोठी बिळं पाडून त्यात आसरा घेतलेला होता. त्याच्या अंगाखांद्यावर आपले संसार थाटले होते. त्याची जांभळाच्या झाडात घुसलेली मधली फांदी तांबटांच्या आवडीची होती. पिल्लं छोटीशी भरारी घेऊन तिच्यावर जाऊन बसत आणि मधल्या छोट्या छोट्या फांद्यांवरून डावी-उजवी बाजू बदलत, एकेक पायरी वर चढत असल्याप्रमाणे शेंड्यापर्यंत आणि त्याच क्रमानं पुन्हा खाली येत. पुन्हा वर, पुन्हा खाली. जणू त्यांना एखादा खेळच सापडला होता!

एकदा त्यांपैकी एका पिल्लाचा खेळ पाहत असताना अचानक तिथं आलेल्या एका हळद्यानं माझं लक्ष वेधून घेतलं. गुलाबी चोचीचा, काळ्या पंखांचा, हळदिव्या पायांचा आणि डोळ्यांवर काळी पट्टी बांधलेली असावी असा दिसणारा पिवळा धम्मक पक्षी. त्याच्या काळ्याशार पंखांवरचे सोनेरी ठिपके नुकती रांगोळी काढावी तसे सुंदर दिसत होते. नुसता स्पर्श केला तरी रांगोळीतील रंग एकमेकांत मिसळून जातील असं वाटत होतं. वडाच्या एका बाजूनं तो तीरासारखा आला आणि मागे लागलेल्या कावळ्यांना गुंगारा देत जांभळाच्या उंच फांदीवर पानांच्या आडोशाला येऊन बसला.

हळद्याच्या दर्शनानं माझ्याबरोबरच ते पिल्लूही झपाटून गेलं. इतकंच काय पण आमच्याप्रमाणे त्या फांदीवरील जांभळांचे घोस आणि पानांची गर्दीही त्याच्या आगमनामुळे आनंदल्यासारखी दिसली. त्याच्या आगमनामुळे जणू त्या तेवढ्या भागामध्ये नवंच चैतन्य निर्माण झालं!

संमोहित झाल्याप्रमाणे मी एकटक हळद्याकडे पाहू लागलो. त्याच्यावरची नजर ढळू नये म्हणून धडपडू लागलो. हळद्या म्हणजे जणू परीस आहे आणि त्याला स्पर्श करून आपल्या आयुष्याचं आपल्याला सोनं करून घ्यायचं आहे असे भाव माझ्या मनात निर्माण झाले. तो जांभळीवरून गुलमोहोरावर, तिथून भेंडीवर, तिथून कॅशियावर आणि तिथून लांबलचक भरारी घेऊन पिंपळावर जाऊन बसला.



पिंपळाच्या पानांआडून त्यानं हलकीशी शीळ घालायला सुरुवात केली. ओलीशार, हळवी, प्रेमळ शीळ! शीळ घालताना त्याचा कंठ फुगून वर येत होता. शीळ संपली की पूर्ववत होत होता. शीळ ऐकून पिल्लू अधिकच खुळावलं आणि त्यानं आवेगानं पिंपळावर भरारी घेतली; पण तिथं पोचायच्या आत उंच भरारी घेऊन हळद्या पुढे निघाला होता. पिल्लानंही त्याची पाठ धरून उडायला सुरुवात केली.

...आणि पिल्लांच्या पाठोपाठ मनानं माझ्याही भराऱ्या सुरू झाल्या.

पुढचं झाड किती अंतरावर आहे, किती उंच आहे याचा अंदाज घेत आणि त्यावर थांबत थांबत हळद्याचं आणि त्या पाठोपाठ पिल्लाचं उडणं सुरू होतं.

थोडं अंतर पार केल्यावर पिल्लांनं एका उंच झाडावरून खाली पाहिलं. सर्वत्र रस्ते, गाड्या, इमारती आणि माणसांची गर्दी दिसत होती. वाहनांची गर्दी इतकी होती, की रस्त्यावर त्यांची अखंड रेषाच तयार झालेली असून ती जागच्या जागी थांबलेली आहे असा भास होत होता.

आणखी थोडं पुढे गेल्यावर एक मोठा पूल लागला. पुलाच्या बाजूला छोटी खाडी आणि खाडीच्या मधोमध तिवरांची गर्दी दिसली. हळद्या जात होता त्या दिशेला नजर ठेवून पिल्लू एका बदामाच्या झाडावर उतरलं. तिथं क्षणभर उसंत घेऊन पुन्हा एक भरारी घेऊन त्यानं हळद्याचा पाठलाग सुरू ठेवला. आपल्याला फार मोठी भरारी घेता येत नाही, थांबत थांबत उडावं लागतं हे या वेळी त्याच्या लक्षात आलं.

कोणत्याही परिस्थितीत पिल्लाला हळद्याची पाठ सोडायची नव्हती. त्याला त्याच्याशी बोलायचं होतं. त्याच्या रंगरूपाविषयी, तो इतकी सुंदर शीळ कशी घालू शकतो यांविषयी पुसायचं होतं. तो कुठं राहतो, त्याचे आई-बाबा-भावंडं कुठं राहतात हे समजून घ्यायचं होतं. पण या धावपळीत आणि विचारांच्या गर्दीत हळद्यानं त्याला कधी गुंगारा दिला आणि वाट कधी चुकली हे त्याच्या लक्षातच आलं नाही.

हळद्या नेमका कोठे गेला हे समजून घ्यायचं तर पिल्लाला आणखी उंचावर जावं लागणार होतं. त्यानं नकळत मान वर केली आणि अधिक जोरानं पंख हलवत हवेतल्या हवेत वरच्या थरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. बगळे किंवा घारी जितक्या उंचावरून जातात तितक्या उंचावर आपल्यालाही जाता येईल असं त्याला वाटलं. पण हवेची एक मोठी लाट आली आणि ते वरच्यावर कोलमडायला लागलं. आकाशात उंचावर हवेच्या उलटसुलट लाटांचे प्रवाह कमीजास्त गतीनं सुरू असतात हे त्याला माहीत नव्हतं. ते सावध झालं. हवेची दुसरी लाट आली. तिचा प्रतिकार करण्यासाठी भीत भीत त्यानं पंख पसरले, पण घडलं भलतंच. त्या हवेनं त्याला गर्रकन फिरवलं.

त्याला काय करावं ते समजेना. हवेची आणखी एक लाट अंगावर आली तसं घाबरून त्यानं आपले पंख आणखी ताणले आणि काय आश्चर्य! पिसांच्या मध्ये फट निर्माण झाल्यामुळे त्यातून हवा मागे निघून जाऊ लागली. आधी पिसं एकमेकांना घट्ट चिकटलेली असल्यामुळे हवेचा प्रतिकार होत होता आणि त्यामुळे पिल्लाला गरगर फिरावं लागत होतं. मात्र पिसांच्या मधल्या फटीतून हवा मागे जाऊ लागल्यामुळे हवेच्या लाटेवर तरंगणं त्याला शक्य झालं. हळुहळू त्याचा आत्मविश्वास वाढत गेला. मजाही वाटू लागली. ते हवेच्या लाटेवर क्षणभर स्वार झालं आणि छान तरंगायला लागलं.

डावीकडच्या पंखाची टोकाची पिसं तिरकी करत त्यानं सारं शरीर एका लयीत वळवलं आणि अर्धवर्तुळाकार वळण घेतलं. हीच कसरत त्यानं उजव्या बाजूनं करून बघितली.

फारशी शक्ती खर्च न करता, केवळ छोटी तांत्रिक करामत करत आपण सफाईदारपणे आणि आनंद घेत उडू शकतो हे त्याच्या लक्षात आलं.

आपण हळद्याचा पाठलाग करत आहोत हे पिल्लू क्षणभर विसरून गेलं होतं. पण पुन्हा भानावर येऊन ते जमिनीच्या दिशेनं उतरू लागलं.

प्रदेश नवखा असल्यामुळे त्याला पावलोपावली सावधगिरी बाळगावी लागत होती. दिसेल ते झाड आणि दिसेल त्या फांदीवरून छोट्या छोट्या भराऱ्या घेत त्याला हळद्याचा शोध घ्यावा लागत होता. जरा कुठे एखाद्या झाडावर उतरू पाहावं तर तिथले कावळे, साळुंक्या, कबुतरं त्याला हाकलून देण्यासाठी टपलेली असायची. झाडाझाडांवर पक्ष्यांची जणू मालकी ठरलेली असावी असं पिल्लाला वाटलं.

उडता उडता, ते एका प्रचंड मोठ्या गोलाकार उद्यानात आलं. तिथल्या सर्वांत उंच अशा झाडावर मधल्या एका फांदीवर येऊन बसलं. संध्याकाळ व्हायला आली होती. पिल्लू दमून गेलं होतं.

प्रदेश नवखा असल्यामुळे त्याला अधिकच असुरक्षित वाटू लागलं. आई-बाबांची, ताईची आठवण येऊ लागली; एकाकी, पोरकं, उदास वाटू लागलं.

उद्यानात लहान मुलं, म्हातारी माणसं, तरणी जोडपी यांची गर्दी झाली होती. एखादा टारगट मुलगा दगड उचलून मारून टाकील अशीही भीती त्याला चाटून गेली.

अंधार होऊ लागला तसतसं ते अधिक अस्वस्थ, भयभीत दिसू लागलं. कोणीतरी मदतीसाठी धावून यावं, ढोलीपर्यंत नेऊन पोहोचवावं असं त्याला वाटलं... पण मदतीला तिथं कोणीच नव्हतं!

मान वर करून पिल्लू असाहाय्यपणे आकाशाकडे पाहू लागलं. आकाशातून बगळ्यांची रांग उडत जाताना त्याला दिसली. शिस्तीनं लांब केलेल्या बगळ्यांच्या पायांच्या फटीतून वरचं सुंदर आकाश दिसत होतं. तो सकाळी पांगाऱ्यावर बसलेला असताना, बगळे असेच उडत जाताना दिसत असत, त्याची त्याला आठवण झाली. त्या आठवणीनं त्याच्या मनाला थोडा दिलासा मिळाला.

पिल्लानं डोळे मिटले. वसाहतीच्या परिसराचा नकाशा त्याच्या अंतर्मनात हळूवारपणे उलगडला. उंचावरून दिसणारी हमरस्त्याची रेघ, पाण्याची उंच टाकी, बांधकाम

विभागाच्या चौकीजवळची झाडांची गर्दी असा तपशील त्याच्या नजरेसमोर येऊ लागला.

वड, पिंपळ, जांभूळ, गुलमोहोर, सोनमोहोर या झाडांची पालवी लवलवत त्याला साद घालू लागली, परत बोलावू लागली. त्याच्या शरीरात काहीतरी विलक्षण रसायन उकळू लागलं. वसाहतीच्या परिसरातील माती आपल्याला तिच्याकडं खेचून घेत आहे, आपल्याला छातीशी धरायला उत्सुक झाली आहे असं त्याला वाटू लागलं...

पिल्लानं डोळे उघडून आकाशाकडं पाहिलं. बगळ्यांची दुसरी माळ शिस्तीनं निघालेली दिसली. त्याचं निराश झालेलं मन एका कल्पनेनं एकदम उजळून निघालं. सायंकाळी बगळे आपल्या घराकडे परत निघालेले असणार. म्हणजे ते पांगाऱ्याच्या झाडावरून जातील हे उघड होतं. त्यांच्या पाठोपाठ आपणही गेले तर आपल्याला घर सापडणार हे त्याच्या लक्षात आलं.

त्यानं मोठा श्वास छातीत भरून घेतला, गुडघे दुमडून शरीर पायांवर तोलत अलगद फांदी मागे रेटली, पंखात हवा भरून घेतली आणि बगळ्यांच्या खालून नेमकी तीच दिशा पकडून ते उडू लागलं.

काही वेळाने खाडी, तिवराची  झाडं, पूल, हमरस्ता, मशिदीचे घुमट, क्रमाक्रमानं साऱ्या ओळखीच्या खुणा त्याला दिसू लागल्या. त्याच्या जीवात जीव आला आणि अखेर, ते वसाहतीतील पिंपळाच्या झाडावर येऊन धडकलं.

पिल्लू दमलं होतं, त्याला धाप लागली होती, त्याचा जीव घाबराघुबरा झालेला होता. त्याचं सारं अंग थरथरत होतं. एका मोठ्या संकटातून आपण वाचलो, सुखरूप पुन्हा आपल्या घरी परतलो यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. त्या आवेगात नकळत त्याच्या शरीराची धनुकली झाली. चोच आणि शेपटी वाकवत त्यानं आवाज काढायला सुरुवात केली...


'टुक्... टुक्...'
'टुक्... टुक्...'
काही क्षणांतच त्याच्या आवाजाला प्रतिसाद मिळू लागला.

'टुक्... टुक्...'
'टुक्... टुक्...'

आवाज ऐकून पिल्लाला धीर मिळाला, अंगात पुन्हा बळ आलं. हा आवाज तर त्याच्या जन्मापासून त्याला ओळखीचा होता. आईचा, बाबांचा आवाज!







वसाहतीत कबुतरांच्या 'गुटुर्रऽऽऽ, गुटुर्रऽऽऽ' प्रमाणे साळुंक्यांचा कलकलाट आणि चिमण्यांचा चिवचिवाट दिवसभर सुरू असायचा.

साळुंकीसारखा दुसरा बोलघेवडा पक्षी आढळून यायचा नाही. दिवसभर त्यांचं कुलुकुलु सुरू असायचं. 'चिर्रऽऽऽ च्रॅप ऽऽऽ,  चिर्रऽऽऽ च्रॅपऽऽऽ' करत सतत त्या पाठशिवणीचा खेळ खेळत असायच्या. त्यांच्या मारामाऱ्या आणि भांडणं दिवसभर सुरू असायची.

सुट्टीच्या दिवशी, दुपारच्या निवांत वेळी चिमण्यांचा चिवचिवाट अधिकच जाणवायचा. कधी कधी तर त्या बाहेरच्या गॅलरीतून सरळ आत येत आणि तिथं आम्ही वाढवलेल्या बागेतील झाडांवर बसून दंगामस्ती करत घर डोक्यावर घेत. कधी कधी चिडायला व्हायचं, पण त्यांना कधी हाकलून लावावं असं मनात आलं नाही.

एकदा एका तांबटानं एका चिमणीचा पाठलाग करत तिला आपल्या हद्दीतून हुसकावून लावल्याचं अनोखं दृश्य मला पाहायला मिळालं होतं.

वेळ संध्याकाळची होती. एकीकडून एक चिमणी भुर्रकन आली आणि जांभळीच्या फांदीवर बसली. तिच्या पाठोपाठ एक तांबट वेगानं आला आणि तिच्या अंगावर धावून जात नेमका तिच्या जागी बसला. त्यानं चिमणीला हुसकल्यावर ती उडाली आणि संतापानंच 'चिऽऽऽव, चिऽऽऽव' करत दुसऱ्या फांदीवर जाऊन बसली. तिच्या पाठोपाठ, तांबट पुन्हा

त्याच आक्रमक पद्धतीनं उडाला आणि त्या चिमणीला हुसकावून लावत तिच्या जागी जाऊन बसला. असं चार-पाच वेळा घडलं. चिमणी ज्या जागी बसलेली आहे, नेमक्या त्याच जागी  एका तसूचाही फरक न करता बसण्याचा तांबटाचा निर्धार असायचा. अखेर, चिमणीनं माघार घेतली आणि ती पळून गेली.

आपल्या हद्दीत घुसखोरी करणाऱ्या पक्ष्यांना हाकलून लावण्याचा आणि आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा पक्ष्यांचा हा नेहमीचा मार्ग असतो हे हळुहळू लक्षात आलं. कारण अशाच पद्धतीनं इतर पक्ष्यांनी एकमेकांचा पाठलाग करत एकमेकांना हाकलून लावताना नंतर मला पाहायला मिळालं.

तांबट कधी थव्यानं उडताना दिसायचे नाहीत. झाडावरसुद्धा कधी त्यांचा थवा बसलाय असं दिसून यायचं नाही. एकावेळी पाच-सहा तांबट एकत्र दिसले तर तेही अप्रूप वाटायचं.

एकदा एक तांबट कॅशियाच्या फांदीवरच झोपी गेल्याचं मी पाहिलं होतं. वेळ संध्याकाळची होती. अंधारून यायला लागलं होतं. मी बाहेरच्या गॅलरीत उभा होतो. एकीकडून तांबट आला आणि कॅशियाच्या उंच फांदीवर टोकाला बसला. थोड्या वेळानं तो आपल्या ढोलीत जाईल असं मला वाटलं म्हणून मी तिथंच थांबून प्रतीक्षा करू लागलो, पण तांबट जागचा हलेना. हळुहळू जोराची हवा सुटली. तांबट बसला होता ती फांदी मोठ्यानं वर-खाली, आडवी-तिडवी हलायला लागली. अंधार वाढू लागला, सोसाट्याच्या हवेनं फांदी गदागदा हलायला लागली पण तांबट मात्र झोक्यातल्या बाळासारखा निवांत होता. काही क्षणांनी त्यानं डोळे मिटून घेतले आणि तो गाढ झोपी गेला.

पक्षी घरटी बांधतात किंवा ढोल्या कोरतात त्या प्रामुख्यानं पिलांसाठी, हे नंतर लक्षात आलं. कावळे तर पिल्लं उडून गेल्यावर घरटी मोडूनच टाकतात. मोठे पक्षी झाडावर बसून रात्र काढणं पसंत करतात. रात्रीच्या मुक्कामापूर्वी फांदीभोवती नख्यांची घट्ट पकड घालतात. ही पकड अगदी कुलूप घातल्यासारखी पक्की असते, त्यामुळे ते खाली पडत नाहीत. सकाळ झाली की ती पकड आधी मोकळी करतात आणि मग ते उडून जातात.

पहाटे फिरायला निघाल्यावर बेस्टच्या वाहनतळाकडून 'जॉगर्स पार्क'कडे वळताना एका ठिकाणी चिमण्यांचा प्रचंड चिवचिवाट कानी पडायचा. दिशा उजळू लागलेल्या असायच्या आणि चिमण्या जाग्या होऊन चिवचिवाट करायला लागलेल्या असायच्या.

तो आवाज पाच-दहा वेळा अनुभवल्यावर मी आणि सुरेखा 'जॉगर्स पार्क' ऐवजी एकदा त्या आवाजाच्या दिशेनं वळलो. वाहनतळाजवळ रस्त्याच्या कोपऱ्याला बोरीची आठ-दहा झाडं ओळीनं उभी होती. चिमण्यांनी आपल्या रात्रीच्या निवाऱ्यासाठी या झाडांचा आसरा घेतला होता.

पूर्वी घरांच्या कौलारात किंवा घरातील तसबिरींच्या मागे चिमण्या घरटी करत असत. आता कौलारू घरं राहिली नाहीत आणि घरात तसबिरी लावण्याची पद्धतही राहिली नाही. मग शहरातल्या चिमण्यांनी जायचं कुठं? चिमण्यांनीच या प्रश्नाचं उत्तर शोधून काढलं होतं आणि त्यांनी रात्री झाडांवर राहण्याचा मार्ग चोखाळला होता.

आम्ही थेट बोरीच्या झाडांखाली जाऊन उभं राहिलो. शेकडो चिमण्या फांदीफांदीवर आणि पानोपानी लगबग करत चिवचिवत होत्या. क्षणभर, डोळे मिटून घेतले. फक्त चिवचिव, बाकी काहीच ऐकू येत नव्हतं. पहाटवेळेचा तो तेवढा तुकडा केवळ चिवचिवाटाचं अस्तित्व घेऊन विश्वरूप झाला आहे असं मनात आलं... चिवचिवाटानं लदबदलेली झाडं पंख पसरून भरारी घेण्याच्या तयारीत आहेत असं वाटलं. विलक्षण अशी अनुभूती होती ती!



मग सकाळ-संध्याकाळ, जेव्हा वेळ मिळेल आणि संधी मिळेल तेव्हा मी त्या बोरींच्या झाडाखाली उभा राहून त्या अनुभवात चिंब होऊ लागलो.

एकदा असाच घरात काही काम करत बसलो होतो. बाहेरून पक्ष्याची शीळ ऐकू आली.

ही शीळ, मी प्रथमच ऐकत होतो. ‘विटूटी...विट्ऽऽऽ विट्ऽऽऽ टिटू...विट्...विट्...!’ काहीशी लांबलचक, अतिशय गोड, आनंददायी आणि चैतन्यानं भारलेली शीळ!

एखाद्या पक्ष्याची एवढी लांबलचक शीळ मी पूर्वी कधी ऐकली नव्हती. सुरावट छेडावी तशी वाटत होती! माझी उत्सुकता चाळवली गेली. बाहेर जाऊन शोध घेऊ लागलो पण पक्षी काही दिसेना. आवाजही बंद झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी, आधीपासून तयारीत राहिलो. तो पक्षी ठरल्या वेळी पुन्हा त्या झाडावर येईल अशी मनोमन खात्री होती आणि झालं तसंच. पुन्हा ती शीळ कानी आली. धावत बाहेर आलो आणि पाहू लागलो, पण जांभळीच्या गर्द पर्णसंभारात तो पक्षी कुठं नजरेस पडेना. आठ-दहा दिवस असंच चाललं होतं. शीळ कोणाची या प्रश्नानं मला पूर्ण अस्वस्थ करून टाकलं.

‘जॉगर्स पार्क’कडे फिरायला जाताना आधी विद्यालयासमोरचं सार्वजनिक बांधकाम विभागाचं कार्यालय लागायचं. कार्यालयाजवळ नारळ, फणस, आंबा, वड, शिरीष, पिंपळ, बदाम अशा झाडांची मोठी गर्दी होती. तिथून जात असताना अचानक तीच शीळ ऐकू आली. ‘विटूटी... विट्ऽऽऽ विट्ऽऽऽ टिटू... विट्... विट्...!’ पाय आपोआप थबकले. शोधाशोध सुरू केली. तीच सुरावट, तेच चैतन्य. नीट पाहू लागलो पण तो पक्षी सापडेना. झाडाझुडुपांच्या एवढ्या गर्दीत एखादा छोटासा पक्षी नेमका शोधून काढायचा ही अवघड गोष्ट होती. माझी अस्वस्थता वाढत गेली.

रोज पहाटे त्या ठिकाणावरून जाताना ती शीळ ऐकू येऊ लागली. जणू काही तो पक्षी आमची वाट पाहतोय, आम्हांला काही सांगू पाहतोय. पाय आपोआप थबकायचे. थोडा वेळ थांबून शोध घेण्याचा प्रयत्न करायचो आणि पुढं चालायला लागायचो पण पक्ष्याचा शोध काही लागत नव्हता. फिरून झाल्यावर परत येताना त्या ठिकाणी पोहचलं की पुन्हा तोच अनुभव यायचा. त्या पक्ष्यानं आम्हांला खुळं करायचं ठरवलं होतं.

‘जॉगर्स पार्क’मध्ये फेऱ्या मारताना माझं लक्ष जमिनीपेक्षा झाडांवरच अधिक असायचं. तिथल्या पांगाऱ्याला नुकतीच फुलं येऊ लागली होती. त्या फुलांतील मकरंद पिण्यासाठी साळुंक्या आणि कावळे सकाळी न चुकता हजेरी लावत असत.

कावळे फुलातील मकरंद पीत आहेत ही खरं तर प्रथमदर्शनी अतर्क्य वाटावी अशी गोष्ट, पण मी तिचा अनेकदा साक्षीदार ठरलो आहे. पांगाऱ्याच्या फुलात अल्लद चोच खुपसून ते इतक्या एकाग्रपणे मकरंद पीत असत की तेच त्यांचं प्रमुख अन्न आहे असं वाटावं!

त्या वेळी फुलांना धक्का लागू नये यासाठी ते इतकी काळजी घेत की त्या फुलांवर जणू त्यांचं प्रेमच असावं!

एकदा पहाटे पहाटे 'जॉगर्स पार्क'मध्ये फिरत असताना पांगाऱ्याजवळ 'ती' शीळ पुन्हा ऐकू आली. मी आनंदानं मोहरून गेलो कारण पांगाऱ्याच्या उघड्या अंगावर बसलेला पक्षी आता मला नक्की दिसणार होता. मी एकदम सावध होऊन पांगाऱ्यावर नजर रोखली. खालच्या फांदीवर तो पक्षी शीळ घालत, शेपटीचा पिसारा फुलवून नाचत, पळापळ करत होता. त्याचं दर्शन झालं आणि क्षणात लक्षात आलं की हा तर नर्तक! 'पॅराडाइज फ्लाय-कॅचर.' पाच-दहा वेळा शेपटीचा पिसारा फुलवून 'विट्...विट्...च्यक्...च्यक्...' आवाज करत तो भुर्रकन उडून गेला. अखेर एकदाचा 'चोर' सापडला होता. शीळ कोणाची हे लक्षात आलं. एखादं अवघड कोडं सुटावं तसं झालं. आनंदानं भान हरावं तसं झालं. नर्तक उडून गेला पण जाण्यापूर्वी लाख मोलाचं दर्शन देऊन गेला. आता जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात ती शीळ कानी आली तरी मी डोळे मिटून ओळखू शकणार होतो की ही शीळ नर्तकाची!

जांभळीकडच्या गॅलरीतून ऐकू आलेली 'ती' शीळ कोणाची हे आता लक्षात आलं.

बांधकाम विभागाच्या कार्यालयाजवळून परतताना, तिथं थांबून नीट शोध घेतला. ओळखीची शीळ घालत, शेपटीचा पिसारा फुलवून नाचत नाचत नर्तकाचं गायन सुरू होतं. फणसाच्या, खाली झुकलेल्या आणि जांभळीत शिरलेल्या फांदीवर, त्याची पळापळ सुरू होती. काही क्षणांतच, तो जांभळीच्या गर्द पर्णसंभारात लुप्त झाला.



एरवी तो दिसायचा नाही, परंतु त्या वेळी मात्र नीट दिसला. याचं कारण काय, तर उत्तर आधीच माहीत असलेलं गणित सोडवायला आलं होतं!

त्याचं घरटं तिथंच होतं. त्यानं घरट्यात अंडी घातली होती आणि त्याचं आनंदगान पिल्लांच्या स्वागतासाठी सुरू होतं... हे अनुमान माझं मलाच काढता आलं, याचा आनंद अवर्णनीय होता.

जांभळं आकारानं मोठी, रसाळ आणि चवीला गोड होती. ती खाण्यासाठी अनेक पक्ष्यांची गर्दी होऊ लागली. जांभळीखालून ये-जा करणारी माणसं थोडं थांबून, पडलेली जांभळं वेचून पुढे निघू लागली. आजूबाजूची मुलं सकाळ-संध्याकाळ जांभळांसाठी फेऱ्या मारू लागली. झाडावर दगड, काठ्या मारू लागली.

पांगारा जांभळीच्या मधोमध असल्यानं ढोलीचं आणि तांबटाचं अस्तित्वही काहीजणांच्या लक्षात आलं. जांभळांवर नेम धरता धरता त्यांचे दगड, काठ्या पांगाऱ्यावरही पडू लागल्या.

एक पिल्लू एकदा आपल्याच तंद्रीत ढोलीसमोरच्या डांबावर बसलं होतं. एका मुलानं छोटं दांडकं उचललं आणि थेट जांभळीवर भिरकावलं. पिल्लानं त्याच वेळी ढोलीत शिरण्यासाठी छोटी भरारी घेतली. दांडकं मधल्या फांदीला आपटून, ढोलीच्या तोंडाला लागून जमिनीवर पडलं. त्या दांडक्यानं पिल्लाचा बळी घेतला असता तर?

मुलगा दांडकं फेकतोय हे लक्षात येताच, मी वरून त्याच्यावर ओरडलो. मुलगा पळून गेला. पिल्लू थोडक्यात वाचलं. पण माझ्या काळजाचा ठोका चुकला!

दुसऱ्या एका पोरानं मारलेल्या दांडक्याचा जोरदार फटका पांगाऱ्याच्या एका हलक्या फांदीला बसल्यामुळे ती शेंड्याजवळून तुटली आणि ढोलीच्या वरच्या फांदीवर येऊन अडकली. मला संध्याकाळी कामावरून घरी आल्यावर हे समजलं. ती फांदी नंतर अनेक दिवस तिथंच लटकत होती. तिथून ती कोणत्याही क्षणी खाली येईल आणि ढोलीच्या तोंडावर अडकून पिल्लांचा आत जाण्याचा रस्ता बंद होईल अशी भीती मला सारखी वाटायची.

एकदा एक पिल्लू ओल्या पांगाऱ्यावर समोरच येऊन बसलं. निरखून पाहिलं. त्याच्या कपाळावर आणि मानेवर लाल पिवळसर झाक आता स्पष्टपणे उमटलेली दिसत होती. मोठ्या तांबटाच्या कपाळावर जसा टिळा होता तसाच टिळा त्या पिल्लाच्या

कपाळावरही उमलू लागला होता. कंठाजवळ रक्तवर्णी आडवी चिरी आणि चोचीच्या बुडापाशी गोलाकार कुंपण घातल्यासारखे केसही वाढीला लागलेले दिसत होते.

थोड्या वेळानं दुसरं पिल्लू आलं. पहिल्या पिल्लाच्या मानानं अधिक तरतरीत आणि रंगाच्या छटा अधिक भडक असलेलं. लक्षात आलं की हे दादा पिल्लू!

दोघं वाढीला लागली आहेत आणि लवकरच त्यांचं तरुण तांबटांत रूपांतर होणार हे मी ओळखलं. अचानक, दोघांचं भांडण सुरू झालं. दादा ताईच्या मागे लागला. त्याची भांडणाची पद्धत अनोखी होती. ताई जिथं जाऊन बसायची त्याच जागी तो जाऊन बसायचा. ती उठायची आणि दुसऱ्या जागी जाऊन बसायची. मग पुन्हा तो भरारी घ्यायचा, तिला तिच्या जागेवरून हुसकावून लावायचा आणि स्वत: तिथं बसायचा! तिच्या जागी म्हणजे कुठं, तर ज्या ठिकाणी ती बसली आहे अगदी त्याच ठिकाणी, एका तसूचाही फरक न करता!

आधी तिला गंमत वाटली. रोजच्या खेळाचा एक भाग आहे असंही वाटलं पण नंतर त्याचा संताप तिच्या लक्षात आला. तीही हट्टाला पेटली. त्यानं तिच्या जागी जाऊन तिला ढकलायचा प्रयत्न केला. पण ती ढिम्म! मग त्यानं तिला चोच मारली. तिनंही त्याला चोच मारली. संतापून त्यानं चोचीचा आणखी एक घाव तिच्या डोक्यावर घालण्याचा प्रयत्न केला, पण तिनं त्याची चोच घट्ट पकडून प्रतिकार केला. त्यानं जोर लावला, दोघं उलटपालट झाले. त्याच्या पायाखालची फांदी सुटली. मात्र तिनं त्याची चोच अशी पकडली होती की तो खाली न पडता हवेतल्या हवेत लोंबकाळायला लागला. असाहाय्यपणे फडफड करू लागला.

काही क्षणांनी पुन्हा स्वत:ला सावरत, फांदीवर पकड घेत तो वर आला आणि त्यानं पुन्हा ताईवर हल्ला केला. तिची चोच आपल्या चोचीनं घट्ट पकडून त्यानं तिला फांदीवरून खाली लोटलं. तीही हवेतल्या हवेत लोंबकाळायला लागली. त्यानं मात्र दुष्टपणा दाखवत तिची चोच सोडली. ती खाली कोसळणार असं वाटलं पण तिनं हवेतल्या हवेत स्वत:ला सावरून छोटी भरारी घेतली आणि ती भेंडीच्या झाडात लुप्त झाली.

दादा पिल्लानं आपली चोच झाडाच्या फांदीवर घासून साफ केली. जिथून अंगाची पिसं निघाली होती तिथून तो चोच फिरवू लागला. त्यानं विस्कटलेली सारी पिसं हळुवारपणे ठाकठीक केली.

एवढा का रागावला असेल तो ताईवर? मस्ती करण्यासाठी एवढी ताकद कोठून आली असेल त्याच्यात?

कुठूनतरी 'टुक्... टुक्...' असा आवाज येऊ लागला. हा आवाज वेगळाच वाटत होता. तो नेहमीच्या तांबटांचा नव्हता! कान देऊन पुन्हा नीट ऐकलं तर तो अधिकच जोरात ऐकू येऊ लागला. त्या पाठोपाठ दुसरा तसाच आवाज, नंतर तिसरा, नंतर चौथा... चार-पाचजणांचे आवाज होते ते. आव्हान देणारे, खिजवणारे, दादागिरी करणारे! मी आजूबाजूला पाहिलं. नेहमीच्या ओळखीचे तांबट किंवा त्यांची पिल्लं जवळपास दिसत नव्हती. काही क्षणांनी, आवाजाचं आक्रमण वाढू लागलं आणि मग मात्र त्या आवाजाला आव्हान देणारा वसाहतीमधील तांबटांचा आवाज ऐकू येऊ लागला.

चार ते पाच पक्ष्यांची एक टोळी आक्रमणाच्या इराद्यानं आवाज काढत होती. ती टोळी बदामाचं झाड ओलांडून वडाच्या झाडावर आली. या परिसरावर हल्ला करून तो तिला ताब्यात घ्यायचा होता. म्हणजे त्यांना इथली झाडं, फळं, फुलं, समृद्ध कीटक विश्व यावर आपलं वर्चस्व प्रस्थापित करायचं होतं. इथल्या तांबटांना हाकलून लावण्याचा टोळीचा इरादा स्पष्ट दिसत होता.

त्यांच्या एकसंघ आवाजासमोर वसाहतीमधील तांबटांचा आवाज सौम्य आणि दुबळा वाटू लागला. दोन्ही पिल्लं जीवाच्या आकांतानं 'टुक्... टुक्...' करत होती. प्रतिस्पर्धीही वाढत्या जोरानं आवाज काढत होते. या लढाईत आपले तांबट हरणार असं वाटू लागलं. पण पुढच्या क्षणी वसाहतीतून आणखी दोन आवाज वाढले. अधिक स्वच्छ, भरीव, आक्रमक, शत्रूच्या जीवाचा थरकाप उडवणारे.

आई-बाबा पिल्लांच्या मदतीला धावून आले होते. एक पिल्लू पांगाऱ्यावर, दुसरं जांभळीवर, तर आई-बाबा गुलमोहोर आणि सोनमोहोरावर बसून 'टुक्... टुक्...' आवाजाचं तुफान आक्रमण करू लागले. चार जण चार वेगवेगळ्या झाडांवर बसल्यामुळे टोळीत खूप पक्षी आहेत असा भास निर्माण होत होता. या व्यूहरचनेमुळे प्रतिस्पर्धी टोळी विचलित झाली आणि थोड्या वेळानं माघार घेऊन पळून गेली.

हे अनपेक्षित 'टोळीयुद्ध' संपल्यावर चारही तांबट जांभळीवर जमले. प्रेमानं आणि अभिमानानं परस्परांकडे पाहू लागले. बाबांनी अधिक ठाम आणि निर्णायक स्वरूपात

आणखी एकदा 'टुक्... टुक्...' केलं. जणू ते बाहेरच्या तांबटांना ऐकवत होते, ''खबरदार. ही जागा आमची आहे. पुन्हा या क्षेत्रात आलात तर तुमची गय नाही''.

आईच्या डोळ्यांतले भाव पिल्लांना सांगत होते,''शाब्बास बाळांनो! स्वत:कडे नीट निरखून पाहिलंत का? आता मोठे झालात तुम्ही. आपलं स्वत:चं, आपल्या परिसराचं रक्षण करण्याइतकी ताकद आली तुमच्या अंगात. आणि तुमच्याही कपाळावर आता तो लाल रंगाचा टिळा, मानेखाली लालभडक चिरी आणि डोळ्यांच्या भोवती पिवळा रंग खुलायला लागलाय बरं का!''

दादाकडे वळून ती म्हणाली,''बाळा, तुला ताईचा मत्सर वाटत होता, तिच्या कपाळावरचा आणि मानेवरचा रंग पाहून अस्वस्थ झाला होतास तू, पण आपल्यात मादीपेक्षा नराचे रंग अधिक उजळ, आकर्षक असतात हे लक्षात घे. तुझे रंग ताईच्या रंगांपेक्षाही छान दिसताहेत, ते अजून उजळणार आहेत, गडद होत जाणार आहेत, थोडा धीर धर म्हणजे झालं!''

एक मोठा धडा देऊन, आई भुर्रकन उडून गेली. बाबा आधीच निघून गेले होते. दादानं ताईकडे पाहिलं. कोणतीही प्रतिक्रिया न देता तिनं निर्विकारपणे छोटी भरारी घेतली आणि ती अशोकाच्या दिशेनं निघून गेली. ती उडून गेल्यानंतर, हलकी झालेली जांभळीची फांदी बराच वेळ वर खाली झुलत राहिली. दादा त्या झुलणाऱ्या फांदीकडे पाहत निमूटपणे बसून राहिला.

तांबटांच्या नादात इतर पक्षी, झाडं, पानं, फुलं आणि वातावरणातील अनेक बदल नजरेस पडत. अनेकदा चकित करून टाकणाऱ्या, आनंद देणाऱ्या घटना अनुभवायला मिळत. निसर्ग हळूहळू आपल्याला त्याच्याकडे ओढत आहे असं वाटत राही.

एकदा असाच सायंकाळी गॅलरीत उभा होतो. वर पाहिलं तर बगळे आणि त्यांच्या पाठोपाठ पाणकावळ्यांच्या रांगा मुक्कामासाठी परत निघाल्या होत्या. ही गोष्ट तशी नेहमीची होती. नीट निरखून पाहिलं तर विश्वास बसेना. खात्री करून घ्यावी म्हणून बारकाईनं पाहिलं. बगळे आणि पाणकावळे गोल गोल फेऱ्या मारत वसाहतीच्या आवारातच खाली उतरत आहेत हे लक्षात आलं.

पण नेमके कुठे उतरत होते ते?

बांधकाम विभागाच्या कार्यालयाजवळ पाण्याची मोठी टाकी होती. तिथं असणाऱ्या

वडा-पिंपळाच्या उंच झाडांवर पक्षी उतरत असावेत. माझ्याच्यानं घरात थांबवेना. मी पळत पळत खाली आलो आणि टाकीजवळ जाऊन पाहिलं. होय, खात्रीच पटली! वडाच्या, शिरीषाच्या आणि पिंपळाच्या उंच शेंड्यांवर पाणकावळे आणि बगळे उतरत होते.

कोणीतरी लाखमोलाचा पाहुणा घरी यावा तसं वाटलं. माझ्या लक्षात आलं होतं, की आता यांचा मुक्काम एवढ्यात येथून हलणार नाही. बरेच दिवस ते आपल्या परिसरात राहतील. आपल्याला त्यांचा सहवास लाभेल...

माणसांच्या सोबतीनं राहणं बगळ्यांना नेहमीच आवडतं. पण मानवी वसाहतीत मुक्कामाला येणारे पाणकावळे हे  स्वप्नच वाटत होतं. अनोख्या धुंदीत मी घराकडे वळलो. रस्त्यावर गाड्या, रिक्षा, स्कूटर, माणसं यांची गर्दी आणि गोंगाट नेहमीप्रमाणे सुरू होता. आपल्या डोक्यावर, फक्त मान वर करून पाहिलं तरी एक अत्यंत दुर्मीळ असं दृश्य आपल्याला पाहायला मिळू शकतं याची तिथं कुणालाही कल्पना नव्हती.

घरी आलो आणि सर्वांना ही बातमी सांगितली. मनात एकच उत्सुकता होती, की कधी एकदा उजाडतंय आणि त्या पाहुण्यांच्या निरीक्षणासाठी बाहेर पडतोय!

पहाटे लवकर उठून फटफटण्याच्या सुमारास मी आणि सुरेखा, दोघंही पाण्याच्या टाकीजवळ येऊन पोचलो. मान वर करून पाहिलं तर जांभूळ, पिंपळ, वड, बदाम, शिरीष अशा झाडांवर बगळे आणि पाणकावळे एकत्र बसलेले दिसले. एखादा बगळा मधूनच वर उडायचा आणि छोटीशी गिरकी घेऊन पुन्हा खाली येऊन बसायचा. चरण्यासाठी बाहेर पडायची वेळ झाली की नाही याची तो खात्री करून घेत असायचा.

पाणकावळेही पूर्ण उजाडण्याची वाट पाहत बसले होते. त्यांच्यापैकी एखादा आपली मान वेळावत, पंख पसरत, हलकीशी झेप घेत मधूनच वर उडायचा आणि पुन्हा खाली येऊन बसायचा. फांदीच्या टोकावर तोल सावरताना त्याची चांगलीच कसरत व्हायची. कुळकुळीत काळा रंग, गळ्यावरचा छोटा पांढरा ठिपका, लांब भरदार शेपटी आणि टोकाला अणकुचीदार बाक असणारी चोच हे त्याचं वैशिष्ट्य.

मी पहिल्यांदा पाणकावळा पाहिला तो विदर्भातील नवेगावबांध येथील विस्तीर्ण जलाशयाजवळ. तो 'च्यॅऽऽऽक, च्यॅऽऽऽक' असा आवाज काढतो आणि त्याच्या पायांच्या नख्यांमध्ये पडदा असतो याची मला तोवर कल्पना नव्हती. पाण्याच्या आत बुडी मारून

माशांचा पाठलाग करत त्यांची शिकार करणारे पाणकावळे नंतर चिपळूणच्या वाशिष्ठी नदीपासून अमरावतीच्या मालखेडी तलावापर्यंत अनेक ठिकाणी पाहायला मिळाले. पोटभर मासे खाऊन झाल्यावर उन्हात मनसोक्तपणे पंख वाळवत बसणारे पाणकावळेही अनेक ठिकाणी पाहिले. पण रात्रीच्या मुक्कामासाठी शहरी वस्तीत येऊन बगळ्यांच्या सोबतीनं वडा-पिंपळावर राहणारे पाणकावळे प्रथमच पाहत होतो.



बगळे आणि पाणकावळे हे दोघंही माशांवर गुजराण करणारे पक्षी. म्हणजे तसे एकमेकांचे स्पर्धक! पण सकाळी ते चरण्यासाठी सोबत निघून जात आणि सायंकाळी मुक्कामासाठी सोबतच परत येत. त्यांच्यातलं हे साहचर्य थक्क करून टाकणारं होतं.

उजाडू लागलं. नीट निरखून पाहिल्यावर झाडांवर पानोपानी बगळे आणि पाणकावळे दिसू लागले. सुरेखाही 'इकडे बघा, तिकडे बघा' करत पक्षी दाखवू लागली. आकाशाच्या दुधी रंगात बगळे इतके मिसळून गेलेले होते की नजर तयार असल्याशिवाय त्यांचं अस्तित्व नजरेत भरणं अवघड होतं.

बाजूला विद्यालयाच्या भिंतीला लागून बदामाचं मोठं झाड होतं. त्यावर बसलेल्या बगळ्यांकडे सुरेखानं माझं लक्ष वेधलं. बदामाच्या झाडाची पानगळ सुरू होती. खाली फिकट शेंदरी रंगाच्या पानांचा ढीग साचला होता. पण अजूनही त्याच्या अंगावर काही पानं शिल्लक होती. ती शेंदरी पानं आणि त्यांच्या बाजूबाजूनं बसलेले दुधी रंगाचे, नि:स्तब्ध पण

तितकेच सावध बगळे पाहून मन तृप्त झालं. सोन्याच्या झाडाला मोत्याची फळं लगडलेली असावीत, तसं वाटलं!

प्रकाश वाढू लागला तसा बगळ्यांचा आणि पाणकावळ्यांचा एकेक थवा भरारी घेत चरण्यासाठी खाडीच्या दिशेनं निघू लागला.

संध्याकाळच्या संधिप्रकाशात हे पक्षी मुक्कामासाठी येत आणि पहाटे पहाटे चरण्यासाठी निघून जात. पहाटे माणसं साखरझोपेत तर सायंकाळी घरी पोहोचण्याच्या गडबडीत असतात. त्यामुळे पक्ष्यांचं हे संमोहन त्यांच्यापर्यंत पोचण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. पक्षी माणसाच्या नजरेस पडू नयेत आणि त्यांचं रक्षण व्हावं यासाठी निसर्गानं केलेलं हे नियोजनच आहे, असं वाटलं.

एकदा बांधकाम विभागाच्या कार्यालयात जाऊन परवानगी घेतली आणि संध्याकाळी, पक्षी परतण्याच्या सुमारास टाकीवर जाऊन पोचलो. इतक्या उंचावरून मी वसाहतीचं दृश्य प्रथमच पाहत होतो. पाहावं तिकडे इमारती, कार्यालयं, दुकानं, रस्ते आणि माणसं! मधोमध मोठं पटांगण होतं आणि तिथं मुलं खेळत होती. पटांगणात लवकरच जत्रा भरणार होती. त्यासाठी आकाशपाळणा लावण्याचं कामही तिथं सुरू होतं.

सूर्य अस्ताला गेला होता. पश्चिमेच्या क्षितिजावर निळ्या पांढऱ्या ढगांची गर्दी झाली होती. हा संधिप्रकाश सुमारे अर्धा तास टिकून राहणार होता. तेवढ्या वेळात सारे पक्षी परतणार हे माझ्या लक्षात आलं होतं. कधी एकदा पक्षी परतताहेत असं झालं होतं. प्रथम आला तो पाणकावळ्यांचा थवा. मी अधीर झालो. जागच्या जागी चुळबूळ करू लागलो. पाय उंचावून, टाकीच्या कठड्यावर रेलून पाहू लागलो. पाणकावळे संथपणे तरंगत अगदी जवळ आले, पण खाली न उतरताच टाकीच्या डोक्यावरून एक फेरी मारून पुन्हा खाडीच्या दिशेनं निघून गेले. काळजात धस्स झालं. वाटलं, आपण इथं येऊन थांबलोय म्हणूनच ते परत निघून गेले! पक्षी इतके संवेदनशील असतात, की सूक्ष्मसा मानवी उपद्रवही त्यांना त्रासदायक ठरू शकतो याची मला कल्पना होती.

काय करावं काही सुचेना. सुदैवानं, थोड्या वेळातच पुन्हा एकदा तो थवा वसाहतीकडे परतताना दिसला. जीव भांड्यात पडला. झाडावर उतरण्याइतपत अंधार झाला नव्हता आणि म्हणून ते पक्षी खाली उतरत नव्हते. मग कधी पाणकावळे तर कधी बगळे असे

थव्याथव्यानं येऊन जांभूळ, वड, शिरीष, पिंपळाच्या उंच शेंड्यांवर उतरू लागले. उंच आकाशातून येताना ते कधी पंखांची फडफड करत वरखाली होत, कधी वळण घेत तर कधी नुसतेच पंख पसरून हवेच्या लाटेवर स्वार होऊन तरंगत राहत. हवेच्या लाटांवरचं त्यांचं ते तरंगणं आणि वाहत जाणं पाहताना अधूनमधून भोवळ आल्यासारखं वाटायचं आणि मी कठडा घट्ट पकडून ठेवायचो.

मी उंच टाकीवरून पाहत असल्यामुळे शेंड्यावर बसणारे पाणकावळे आणि बगळे सहजगत्या आणि जवळून दृष्टीच्या टप्प्यात येत होते.

एखाद्या फांदीवर बगळ्यांचा गट, एखाद्या फांदीवर पाणकावळ्यांचा गट, तर एखाद्या फांदीवर बगळे आणि पाणकावळ्यांचा संमिश्र गट बसलेला दिसत होता. एका मागोमाग एक येणारे बगळे आणि पाणकावळे पंख पसरून, पाय पुढे सोडत अलगद फांद्यांवर उतरत होते. लवचीक डहाळ्यांवर तोल सावरण्यासाठी कसरत करत होते. ढकलाढकली करत आपली जागा पक्की करून घेत होते. आपापला गोतावळा पाहून आनंदानं चित्कारत होते.

एखादा पाणकावळा आपली लांबलचक मान वेळावत दुसऱ्या पाणकावळ्याला कुरवाळत होता तर बगळा आपल्या सखीसोबत लाडीक लगट करत तिच्या अवतीभवती घोटाळत होता.

नेहमीचे कावळेही या पक्ष्यांमध्ये बिनधास्त वावरत होते. त्यांच्यात कोणताही भेदभाव दिसत नव्हता. सारे गुण्यागोविंदानं रात्रीच्या निवाऱ्यासाठी एकत्र आले होते. आनंदानं चित्कारत होते, कलकलाट करत होते. जणू आयुष्यातला एक सोनेरी दिवस पार पडला आहे, उद्या पुन्हा तसाच सोन्याचा दिवस उजाडणार आहे आणि त्याला आनंदानं सामोरे जाण्यासाठी आतापासूनच तयारीत राहायचं आहे!

**मो**ठ्या तांबटांचं ढोलीत परतणं जवळजवळ थांबलं होतं. पण मी सतत त्यांच्यावर लक्ष ठेवून असायचो, शोध घेत असायचो, त्यांच्या मागावर असायचो.

वडाच्या बाजूला असणाऱ्या पांगाऱ्याच्या एका सुक्या झाडात नवी ढोली कोरण्याचं त्यांचं काम सुरू झालं होतं! ते वसाहतीच्या परिसरात राहत असल्यामुळे अधूनमधून आपल्याला दिसत राहतील याचा आनंद मनात होता.

त्यांची जोडी छान जमलेली. ती बाहेर पडायची जोडीनंच, ढोलीकडे परतायची ती जोडीनंच!

एकमेकांपासून दूर राहणं त्यांना जणू सहन व्हायचं नाही. दोघांपैकी एखाद्याला जर एखादा कीटक, अळी किंवा एखाद्या फळाचा गर मिळाला तर दोघंही तो वाटून घ्यायची. जांभळीवर किंवा भेंडीवर, त्यांनी एकमेकांना घास देताना मी अनेकदा पाहिलं होतं. दुपारच्या निवांत वेळी कॅशियावर किंवा गुलमोहोराच्या लवचीक डहाळ्यांवर बसून एकमेकांशी दंगामस्ती करताना, खेळतानाही त्यांना मी अनेकदा पाहिलं होतं.

पिल्लं तरुण झाली होती. त्यांनी आपलं स्वतंत्र जीवन सुरू केलं होतं. ती स्वत:चं अन्न स्वत: मिळवू शकत होती. आपलं संरक्षण आपण करू शकत होती. नवनवे अनुभव गाठीशी बांधत स्वत:च्या पायावर उभं राहायला शिकत होती.

ढोलीच्या साफसफाईचं दादा पिल्लाचं काम सदैव सुरू असायचं. ढोलीच्या छोट्याशा दारातून आत जाताना आणि बाहेर पडताना तिच्या कडेला घासल्यामुळे त्याची पाठ खाजवली जायची. तो चांगलाच विरंगुळा त्याला मिळाला होता. म्हणूनच की काय पण रिकामा वेळ मिळाला की ढोलीतून आत-बाहेर करत, तो आपली पाठ खाजवत राहायचा.

एके दिवशी अचानक आकाश भरून आलं. ढग गडगडायला लागले. विजा चमकायला लागल्या. त्यांच्या कडकडाटानं पावसाची ललकारी दिली. रात्रीच्या नीरव शांततेत सोसाट्याचा वारा सुटला. त्यानं सोबत मातीचा सुगंध आणला होता. माझी झोप चाळवली गेली. वसाहतीत पावसाची छानशी सर येऊन गेली. पहिलीवहिली सर! मनाला उभारी देणारी, निसर्गचक्राच्या सातत्याचा संदेश देणारी! तिचे थेंब झाडांच्या पानांवरून एकापाठोपाठ एक चालत येताना कोणीतरी एखादी सरगम वाजवत आहे असं वाटून गेलं. 'सर' या शब्दाचा जन्म कसा झाला हे लक्षात आलं.

ताडोबाच्या घनदाट जंगलात रस्ता ओलांडून जाणारा हरणांचा कळप एकदा पाहिला होता. उन्हाळ्याचे दिवस होते. जंगलात नीरव शांतता होती. हरणं एका पाठोपाठ एक झेपावत रस्ता ओलांडून एकीकडून दुसरीकडे निघून गेली. त्या वेळी त्यांच्या खुरांमुळे खालच्या पाचोळ्याचा जो 'सर्रऽऽऽ' असा आवाज झाला होता तो कायमचा मनात भरून राहिला आहे. सरीच्या आवाजानं ती जुनी आठवण जागी झाली. सारं अंग शहारून गेलं.

ढोलीत पाणी शिरलं तर तांबटांचं काय होईल अशी भीती मनात होती, पण ढोली पोखरण्याचं तांबटांचं कसब सकाळी उठल्यावर नेमकं लक्षात आलं.

तिरक्या फांदीवर खालच्या बाजूनं छेद घेतल्यामुळे पावसाचं पाणी आत येऊ शकत नव्हतं. ढोलीची बाहेरची कड उतरती असल्यानं जे पाणी पडायचं ते बाहेरच्या बाहेर निघून जायचं. थोडं पाणी आत आलंच तर पांगाऱ्याचा आतील मऊ भाग ते शोषून घ्यायचा आणि आतली जागा पुन्हा कोरडी व्हायची. हे लक्षात आल्यावर मी निश्चिंत झालो, तांबटांच्या बुद्धिमत्तेचं नवलही वाटलं.

मग रोजच पाऊस सुरू झाला. एकदा त्यानं रौद्ररूप धारण केलं. ढगांचा गडगडाट, विजांचा लखलखाट आणि मुसळधार पाऊस अखंडितपणे सुरू राहिला. दोन दिवस झाले, तीन झाले तरी तो थांबण्याची चिन्हं दिसेनात. वसाहतीत पाणी साठू लागलं. हळुहळू त्याची पातळी वाढत गेली. साऱ्या इमारतींमध्ये आणि उभ्या असलेल्या साऱ्या गाड्यांमध्ये पाणी शिरलं. पाण्याची पातळी वाढत वाढत पहिल्या मजल्यापर्यंत पोचली. पाणी तुंबल्यामुळे गटारातली घाण, कचरा वर तरंगू लागला. दुर्गंधी सुटली. सर्वत्र अवकळा पसरली.

हमरस्त्यावरच्या गाड्या जागेवरच बंद पडून त्यांची भलीमोठी रांग तयार झाली. रहदारी पूर्णपणे ठप्प झाली. वाहनतळावरच्या गाड्या हलेनात. शाळा बंद झाल्या. मुलं खेळायला बाहेर येईनात. मी कार्यालयात गेलो तो तिकडेच अडकून पडलो.

तिसऱ्या-चौथ्या दिवशी पाऊस थांबला. पाणी ओसरलं. घरी परतलो आणि आधी वसाहतीत फेरफटका मारला. सर्वत्र उदासीनता भरून राहिली होती. वडाचं एक झाड उन्मळून पडलेलं होतं. त्याचा वर आलेला बुंधा मदतीसाठी पसरलेल्या एखाद्या हतबल माणसाच्या हातासारखा दिसत होता. वडाची ती अवस्था पाहून धक्का बसला.

हेच का ते झाड, जे विविध पक्ष्यांच्या वास्तव्यानं सदैव बहरलेलं असायचं, ज्याच्यावरची लालचुटुक पिपरं खात पक्षी गात असायचे, ज्याच्या कोवळ्या फांद्यांवर बसून झोके घेत राहायचे, ज्याच्या फांद्याफांद्यांतून लपाछपी खेळत असायचे, ज्याच्या सावलीत मुलं खेळत असायची?

काही कळेनासं झालं!

तांबटाच्या पिल्लांना उडता येऊ लागलं तेव्हा त्यांचे आई-बाबा त्यांना या वडावर घेऊन येत असत. त्या पिल्लांना इथं अनेकदा दंगामस्ती करत असताना मी पाहिलं होतं. वडाचा विस्तार इतका होता, की त्यावर पक्ष्यांना भरपूर कीटक-अळ्या मिळत. पोपट, साळुंक्या, चिमण्या, बुलबुल, दयाळ, कोतवाल, नर्तक, सूर्यपक्षी यांनी ते सदैव गजबजलेलं असे.

वडावर अनेक पक्ष्यांची घरटी होती. पोपटांच्या ढोल्या होत्या. ते पक्षी कुठं जातील? कुठे राहतील? अनेक प्रश्न मनात निर्माण झाले. जीव चुटपुटला. खूप हळहळ वाटली. काही खाऊ नये, पिऊ नये, गप्प पडून राहावंसं वाटू लागलं.

एक-दोन दिवसांनी महानगरपालिकेची गाडी आली. गाडीतून काही कामगार कोयते, कुऱ्हाडी, करवती घेऊन खाली उतरले. त्यांनी वडाचं झाड छाटलं. पानं, कचरा एकत्र केला. छोट्या छोट्या फांद्या, पारंब्या कापून गाडीत भरल्या. गाडी निघून गेली. बुंधा मात्र तिथं तसाच पडून राहिला.

दोन-चार दिवसांनी, महानगरपालिकेच्या गाडीतून कामगार पुन्हा आले. त्यांनी एक मोठी यारी सोबत आणली होती. कामगार पटापटा खाली उतरले. वडाचं झाड जिथून उन्मळून पडलं होतं तिथं बुंध्यापाशी त्यांनी मोठा गोलाकार खड्डा तयार केला. मग त्यांनी वडाच्या बुंध्याला साखळ्या बांधल्या आणि ट्रकातली यारी सुरू करून हळूहळू तो उचलायला सुरुवात केली. पाहता पाहता, तो अवाढव्य बुंधा उभा झाला.

वसाहतीतील मुलं, रहिवासी आणि आजूबाजूच्या बघ्यांची तिथं खूप गर्दी झाली होती. साऱ्यांना या प्रकाराचं कौतुक आणि आश्चर्यही वाटत होतं. झाडं तोडून नेणारे कामगार अनेकदा पाहायला मिळतात. पण उन्मळून पडलेलं झाड पुन्हा त्याच जागी लावण्यासाठी कामगार झटत आहेत ही घटना आगळीच होती.

कामगारांनी यारीच्या साह्यानं हळुहळू बुंधा पूर्णपणे वर उचलला. सारे खड्ड्याच्या भोवती उभे राहिले. बुंध्याला आधार देत हळुहळू त्यांनी तो खड्ड्यात नीट बसवला. यारीच्या साखळ्या काढून घेतल्या. सोबत आणलेलं खत मातीत मिसळलं, ढिगाऱ्यातली माती खड्ड्यात लोटली. त्या ओल्या भुसभुशीत मातीत उभं राहून हातांनी, पायांनी ती घट्ट दाबत बुंधा भक्कमपणे उभा केला आणि कर्तव्यपूर्तीच्या समाधानानं ते निघून गेले.

वडाचं झाड पुन्हा एकदा उभं राहिलं होतं. त्याला जीवनदान मिळालं होतं! हळुहळू त्याला त्याच्या फांद्या परत मिळतील, त्या फांद्यांमधून कोवळ्या, पोपटी रंगाची पानं पुन्हा बाहेर डोकावतील, झाड हिरवंकंच होईल, शीतल सावली द्यायला लागेल, त्याच्या फांदी फांदीवर लालचुटूक पिपरांचे घोस पुन्हा लगडतील, पक्षी पुन्हा त्याच्या अंगाखांद्यावर खेळू लागतील आणि त्यांच्या चित्कारांनी झाड पुन्हा गजबजून जाईल असा विश्वास मनात निर्माण झाला.

दुपारी, पुन्हा एकदा मी काळजीपोटी वडाच्या भुंड्या बुंध्याजवळ जाऊन, त्याला हात

लावून पाहिलं. बुंध्यातून बाहेर आलेल्या पानाला एका अनामिक ओढीनं स्पर्श केला. वाऱ्याच्या झुळुकीसरशी ते पान थरथरू लागलं. मला ते सांगत होतं,'मित्रा, वडाचं पिपर आणि त्याचं बी किती छोटंसं असतं हे तुला माहीत आहे. त्या इवल्याशा बी-मधून किती मोठा वृक्ष तयार होतो हेही माहीत आहे ना? मग आता हा एवढा मोठा बुंधा अस्तित्वात असताना आणि पुन्हा एकदा त्याला जीवनदान मिळालेलं असताना काळजी कशाला करतोस? झाड पुन्हा एकदा झपाट्यानं वाढीला लागणार आहे याची खात्री बाळग!'

मला हायसं वाटलं. इवल्याशा पानाच्या त्या इवल्याशा हालचालीतून प्रकट होणारा विश्वास पाहून स्फूर्ती मिळाल्यासारखं झालं.

मी पांगाऱ्याच्या दिशेनं वळलो. छान ऊन पडलं होतं. वसाहतीतील रहिवाशांनी टेबलं-खुर्च्यांपासून चादरी-गाद्यांपर्यंत सर्वच सामान बाहेर काढून वाळत घातलं होतं. अनेक जण आपल्या सामानाची साफसफाई करण्यात गढून गेले होते. काही आपल्या वाहनांची साफसफाई करत होते. मुलं पुन्हा एकदा नव्या उत्साहानं खेळण्यात आणि दंगामस्ती करण्यात रमून गेली होती.

कोणत्याही संकटाला न घाबरता, जीवनाला सतत भिडत राहण्याच्या माणसाच्या स्वभावाचं कौतुक वाटलं. जगायला बळ मिळाल्यासारखं झालं. उत्साहाचं वारं अंगात संचारल्याप्रमाणे झाडा-झाडाला हात लावत मी वसाहतीतून फिरत राहिलो!

झाडं नव्या उत्साहानं सळसळत होती. ती सतत वर जाण्याचा प्रयत्न करणारी. ऊन, वारा, थंडी, पाऊस यांच्या परिणामांचा विचार न करता नियमितपणे वाढत राहणारी. सातत्यानं फळत राहणं, फुलत राहणं, एवढंच त्यांना माहीत असतं... सतत वाढत राहण्याचा, फळण्याचा-फुलण्याचा गुणधर्म माणसांनी या झाडांकडूनच घेतला आहे. माणूस हा या निसर्गाचा एक भाग आहे, त्याचा निर्माता नाही हे लक्षात आलं. या जाणिवेनं अधिक प्रोत्साहित झाल्यासारखं वाटलं; अधिकच आनंदी झाल्यासारखं वाटलं.

फिरता फिरता, पांगाऱ्याजवळ आलो आणि जवळून त्याच्याकडे पाहू लागलो. त्याच्या खोडावर जिथं जिथं साल शिल्लक होती तिथून काही पांढरेशुभ्र कोंभ बाहेर येऊन वाढत चाललेले दिसले. दोनचार दिवसांतच ते चांगले लांबलचक झाले होते आणि त्यांच्या डोक्यावरच्या टोप्याही सैलावल्या होत्या. पक्ष्यांच्या विष्ठेमधून पडलेलं किंवा वाऱ्याबरोबर वाहून आलेलं कसलंबसलं बी तिथं वाढीला लागलं होतं. रस्त्याला समांतर गेलेल्या

फांदीच्या टोकाशी लालसर कोकमी रंगाची आळिंबी फुटून वाढीला लागली होती. त्यांची रोज होणारी वाढही नजरेत भरत होती.

वठलेलं झाड. पण ते किती जीवांना आसरा देत होतं, किती संसार त्यात फुलत होते, किती स्वप्नं त्यात अंकुरत होती! अशा या पांगाऱ्याच्या ढोलीत आपल्या लाडक्या तांबटाची पिल्लं राहतात याचा अभिमान वाटला. विचारांच्या धुंदीतच मी घरी आलो. जेवण करून आडवा झालो. चहूबाजूंनी अंधार दाटून येऊ लागला. डोळे मिटून घेतले आणि ढोलीतील निवांत तांबटाची स्वप्नं पाहत झोपेच्या अधीन झालो.

रात्री पुन्हा मुसळधार पाऊस सुरू झाला. सोसाट्याचा वारा वाहू लागला. पांगाऱ्याचं झाड गदगदा हलू लागलं.

झाडांच्या पानांवर, चाळीच्या छपरावर आणि जमिनीवरून वाहणाऱ्या पाण्यावर पाऊस कोसळत असताना त्याचा भीतिदायक आवाज निर्माण होत होता. त्यातच वाऱ्याचा आवाज मिसळत असल्यामुळे निसर्गाचं रौद्रभीषण संगीत निर्माण झालं होतं. पावसाळा सुरू झाला तेव्हा कानी पडलेलं पहिल्या सरीचं सुरम्य संगीत ऐकून मी पुलकित झालो होतो, पण जीवाचा थरकाप उडवणारं हे प्रलयंकारी संगीत ऐकून भयभीत व्हायला झालं. ही दोन्ही रूपं एकाच निसर्गाची असावीत याचं आश्चर्यही वाटत होतं.

ढोलीतल्या तांबटाचं काय झालं असेल या विचारानं मी अस्वस्थ झालो. बाहेर येऊन गॅलरीत उभा राहिलो. पाऊस अखंडितपणे कोसळत होता. मधूनच विजांचा लखलखाट आणि ढगांचा गडगडाट होई. विजा चमकत तेव्हा ढोलीच्या तोंडाशी क्षणभर प्रकाश उजळे. क्षण-दोन क्षण तो तिथंच थांबून राहिला की ढोलीचा आतला भाग काही प्रमाणात प्रकाशमान होई आणि पुन्हा गुडूप अंधार होई. अंधार-प्रकाशाच्या त्या भयप्रद नाटकानं जणू साऱ्या जगाचा ताबा घेतला होता.

वाटेला समांतर गेलेली पांगाऱ्याची फांदी वाऱ्याच्या आणि पावसाच्या माऱ्यानं जमिनीला टेकायला आली होती. कोणत्याही क्षणी ती तुटून पडेल असं वाटत होतं. इतका वेळ ती टिकून कशी राहिली याचं नवलही वाटत होतं.

पुन्हा आत येऊन डोळे मिटून निमूटपणे पडून राहिलो. झोप येत नव्हती. मधेच डोळा लागल्यासारखं  झालं तर उन्मळून पडलेलं वडाचं झाड नजरेसमोर आलं. मदतीसाठी

पसरलेल्या हातासारखा त्याचा तो बुंधा समोर आला. भीतीची शिरशिरी अंगातून निघून गेली. एवढं मोठं वडाचं झाड उन्मळून पडलं, त्या समोर हा वठलेला पांगारा म्हणजे काहीच नाही! 'पांगारा उन्मळून पडलाय आणि तांबटाची पिल्लं बेघर झालीयत' असा अशुभ विचार मनात आला. 'टुक्... टुक्...'चा आवाज डोकं पोखरू लागला. हा केवळ तांबटाचा आवाज नसून जीवनाच्या भांड्यावर पडणाऱ्या नियतीच्या कठोर हातोड्याचा आहे असं वाटलं आणि  झोपच उडाली. मी तळमळू लागलो. एवढासा तांबट पण त्यानं माझ्यावर गारूड केलं होतं. जणू तोच माझं सर्वस्व झाला होता, मला नाचवत होता, लोळवत होता, आधार देत होता, बळ देत होता, माझ्या जगण्याची प्रेरणा झाला होता.

विचार करता करता, रात्र कधी संपली ते कळलंच नाही. पहाटेची बांग आणि नंतर देवळातल्या घंटांचा आवाज ऐकू आला. दूध घालणाऱ्या, पेपर टाकणाऱ्या मुलांची चाहूल लागली नाही. वॉचमनची पहाटेची शिट्टी आणि दंडुक्याचा आवाजही आला नाही. मुसळधार पावसानं त्यांच्या नित्यक्रमात व्यत्यय आणला होता.

मधूनच एखाद्या कावळ्याचा 'क्रऽऽऽ, क्रॉऽऽऽ' असा आवाज यायचा, पण त्यात नेहमीचा जोष असल्याचं जाणवत नव्हतं.

झुंजुमुंजू होताच उठून बाहेर गॅलरीत आलो. आकाशात ढग इतके दाटून आले होते की उजाडलंय ह्यावर विश्वास बसणं कठीण होतं. ह्या वेळेस आकाशात नेहमी बगळ्यांच्या रांगा दिसायच्या.पण तिथं चिटपाखरूही दिसत नव्हतं. खाली सर्वत्र पाण्याचं तळं साचलेलं होतं. गढूळ, मातकट पाणी. त्यावर पावसाच्या सरी उभी-आडवी नक्षी काढत कोसळतच होत्या. हमरस्त्यावर वाहनांची नेहमीची वर्दळ नव्हती. फिरायला येणारी माणसं, शाळेत जाणारी मुलं, कोणीही दिसत नव्हतं. वाहनतळावर शुकशुकाट होता. ढगांच्या गर्दीआड सूर्य झाकोळला होता. फिकट, उदासवाणा प्रकाश सर्वत्र भरून राहिला होता.

अंगात उत्साह नव्हता. चहा घेऊन रोजच्या कामकाजाला लागण्याची सवय. पण बराच वेळ तशाच स्थितीत बसून होतो. संततधार पावसामुळे सारं विश्व जणू निपचित होऊन पडलं होतं. मग तसाच बाहेरच्या गॅलरीत आलो. आकाश आणखी थोडं उजळलं होतं. कॅशियाच्या पानांवरून थेंब थेंब पाऊस खाली ओघळत होता. मधूनच वारा सुटला की त्याच्या फांद्या उलटसुलट दिशेनं डोलू लागायच्या. ओघळणाऱ्या पारदर्शक थेंबांतून एखाद्या पाठमोऱ्या पानाची चंदेरी पाठ भासमान व्हायची, तेवढंच मनाला बरं वाटायचं.

इतक्यात, एक साळुंकी आली आणि समोरच्या फांदीवर बसून चोचीनं पंख साफसूफ करू लागली. आधी, तिनं आपला डावा पंख पूर्णपणे ताणून लांब केला. त्यातील प्रत्येक पिसातून आपली चोच काळजीपूर्वक आडवी फिरवत सारा पंख साफ केला. मग उजवा पंख पसरून क्रमानं त्यातील एकेका पिसातून चोच फिरवत तोही तिनं साफ केला. त्या लालसर तपकिरी पिसांच्या आतील मुलायम पांढरी रंगछटा एखाद्या रहस्याप्रमाणे माझ्यासमोर उघड झाली.

अंग कोरडं झालं म्हणून साळुंकी खूष झाली. इतक्यात, वरची फांदी हवेनं हलली आणि तिच्यावरील पाण्याचे थेंब पुन्हा साळुंकीच्या अंगावर पडले. त्यावर चिडून 'चिर्रऽऽऽ, च्रॅप, च्रॅपऽऽऽ'अशी प्रतिक्रिया व्यक्त करत, पुन्हा तिनं पहिल्यापासून पंख साफ करायला घेतले.

साळुंकीची सफाई मोहीम सुरू असतानाच एकदम मोठा कडकडाट झाला. काळजाचा ठोका चुकला. धावत जांभळीकडच्या गॅलरीत गेलो. पांगाऱ्याचं झाड उन्मळून रस्त्यावर आडवं झालं होतं. काय करावं ते कळेना. सैरभैर झालो.

उतरून खाली आलो. भेंडी, ओला पांगारा, नारळ, गुलमोहोर या झाडांच्या दिशेनं पळापळ करत करत सर्व बाजूंनी पांगाऱ्याकडे पाहत राहिलो. तो पडलाय यावर विश्वासच बसत नव्हता. पण पांगारा खरोखरच उन्मळून पडला होता. त्याचे तुकडे तुकडे झाले होते. शेंड्याकडचे तुकडे रस्त्याला समांतर तर मुख्य खोड मधोमध आडवं पडून रस्ता बंद झाला होता.

जिथं तांबटांचा जन्म झाला, जिथं ती लहानाची मोठी झाली, जिथं त्यांना आपल्या आई-बाबांच्या मायेची ऊब मिळाली तो निवारा उन्मळून पडला होता. पूर्णपणे उद्ध्वस्त झाला होता.

ज्या फांदीवर तांबटाची ढोली होती ती फांदी तुकडे तुकडे होऊन खाली पडली होती. त्यातला एक तुकडा मी उचलला. ढोलीत हात घालून चाचपून पाहिलं. एखादं पीस, गवताची एखादी काडी या व्यतिरिक्त आत काहीही नव्हतं. तो तुकडा तसाच हातात घेऊन तांबटांना शोधण्याचा प्रयत्न करू लागलो. वसाहतीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरून आलो. प्रत्येक झाडावर शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा कुठेही मागमूस नव्हता.


थोड्या वेळानं बांधकाम विभागाचे कामगार हातात करवती, कुऱ्हाडी घेऊन आले. त्यांनी रस्त्यावर आडवं पडलेलं खोड एका बाजूला सारून रस्ता मोकळा केला. बाकीचे छोटेमोठे ओंडके आणि फांद्या कापून रस्त्याच्या बाजूला नीट रचून ठेवून, ते निघून गेले. मी पुन्हा

खाली गेलो आणि ओळीनं मांडून ठेवलेले पांगाऱ्याचे ओंडके पुन:पुन्हा निरखून पाहत नजरेत साठवून घेऊ लागलो. पांगाऱ्याची उरलीसुरली साल वाऱ्या-पावसानं सोलून काढली होती आणि त्याची हाडं जणू ओंडक्यांच्या रूपात खिळखिळी करून टाकली होती...

पांगाऱ्याचं मुख्य खोड जिथून तुटलेलं होतं त्या जागी नीट निरखून पाहिलं. बुंध्याच्या आत वाळवीची सुंदर नक्षी तयार झालेली होती. काही भागांत मुंग्यांची घरं, काही भागांत वाळवी आणि बाहेरच्या अंगाला अन्य कीटकांची सुंदर बिळं दिसून येत होती. कुशल वास्तुविशारदानं शहराचा आखीव रेखीव नकाशा तयार करावा तसं दिसत होतं ते चित्र!

एक वठलेलं सामान्य झाड, पण त्याच्या आत केवढं सुंदर विश्व वसलेलं होतं!

ते सारं विश्व निसर्गानं आपल्या एका तडाख्यानं भुईसपाट करून टाकलं होतं. निर्मिती, स्थिती आणि विध्वंस हा निसर्गाचा लाडका खेळ. माणूस काय किंवा पशुपक्षी काय, सारे त्याच्यासमोर हतबल असतात... त्याला शरण जातात... त्याच्या अफाट सामर्थ्यासमोर नांगी टाकतात...



सकाळी सकाळी, फणसाच्या झाडावरून 'टुक्... टुक्...' आवाज येऊ लागला. आवाज चिथावणी देणारा नव्हता, आव्हान देणारा नव्हता, आक्रमण करणारा नव्हता. उलट काहीतरी सांगू पाहणारा, दोस्तीचा हात देऊ पाहणारा होता. त्या आवाजाला गुलमोहोराच्या झाडावरून प्रतिसाद मिळू लागला. 'टुक्... टुक्...' तसाच शांत, निर्मळ, संवाद साधू पाहणारा! एक आवाज थांबला की दुसरा आवाजही थांबत असे. पुन्हा आवाज आला की पुन्हा त्याला उत्तर मिळत असे. उत्सुकता निर्माण झालीच, पण आवाजातलं वेगळेपणही लक्षात आलं म्हणून गॅलरीत येऊन कुतूहलानं पाहू लागलो.

गुलमोहोरावर तरुण तांबट बसला होता. त्यानं बसली जागा सोडत, पाय दुमडून फांदी मागे रेटत भरारी घेतली आणि तो नारळाच्या एका पानावर येऊन बसला. त्याच्या ओझ्यानं ते पान खाली गेलं. तीच लय पकडून त्यानं दुसरी भरारी घेतली आणि तो थेट फणसाच्या झाडावर जाऊन बसला.

फणसाच्या मधल्या फांदीवर एक नवीन तांबट आधीच येऊन बसलेला दिसत होता. कपाळावर आणि मानेवर फिकट लाल रंगाचा ठिपका, डोळ्यांभोवती पिवळी अर्धवर्तुळं आणि पोटाकडे पसरलेला हिरवा पिवळा रंग पाहून ती मादी असणार असा तर्क माझ्या मनानं केला.

तरुण तांबट आणखी एक छोटी भरारी घेऊन वरच्या फांदीवर गेला. ते पाहून तिनंही भरारी घेतली. तो उठला आणि त्यानं आपण बसलेली जागा तिला मोकळी करून दिली. ती त्या जागेवर येऊन बसली. त्यानं पुन्हा आपली जागा सोडली आणि तो नारळाच्या झाडावर आला. तीसुद्धा जांभळीच्या झाडावरून उठली आणि त्याच्या मागोमाग नारळाच्या झाडावर आली. तिथंही त्यानं स्वत:ची जागा तिला मोकळी करून दिली. त्याच जागी ती पुन्हा येऊन बसली. अगदी आरामात, जणू तिचा तो हक्क आहे!

आता परीक्षा घेण्याची पाळी तिची होती. ती उडाली आणि कॅशियावर बसून 'टुक्... टुक्...' करत त्याला बोलावू लागली. तोही लगेच भरारत कॅशियावर पोचला. त्याला जागा करून देत ती उडाली आणि गुलमोहोरावर जाऊन बसली. तिथून तो भेंडीच्या आणि मग सोनमोहोराच्या झाडावर जाऊन पोचला. त्याच्या पाठोपाठ ती होतीच!

दुसरा पक्षी ज्या जागी बसला आहे नेमक्या त्याच जागी जाऊन बसणं हा पक्ष्यांचा श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा मार्ग असतो हे माझ्या लक्षात आलं होतं. पण त्याच पद्धतीनं एका पक्ष्याला दुसऱ्या पक्ष्यावरचं प्रेमही व्यक्त करता येतं हेही आता लक्षात येत होतं.

दोन्ही तांबटांनी एकमेकांची मैत्री मनापासून स्वीकारली आहे हे लक्षात आलं. पण त्यानंतर ती दोघं नाहीशी झाली ती झालीच! पाठलाग करून त्यांचा शोध घेणं अशक्यच होतं. कुठे गेली असतील ती?

काही दिवसांनी सारा प्रकार लक्षात आला.

वसाहतीच्या दुसऱ्या बाजूला म्हणजे हमरस्त्याच्या दिशेनं समांतर बांधलेल्या कुंपणाजवळ पांगाऱ्याचं दुसरं एक वठलेलं झाड उभं होतं. त्या झाडाची मधली फांदी हेरून तांबटांनी त्या ठिकाणी नवी ढोली कोरायला घेतली होती. मैत्रिणीला स्वतंत्र ढोली तयार करायची होती आणि त्या कामात त्याची मदत हवी होती. त्यानंही तिच्या मैत्रीचं निमंत्रण स्वीकारून तिला त्या कामात मदत करायला सुरुवात केली.

मग सवड होईल त्याप्रमाणं तिकडे फेऱ्या मारत मी ढोलीच्या प्रगतीवर लक्ष ठेवायला लागलो.

ढोली पोखरण्याच्या कामातील सर्वांत कठीण टप्पा म्हणजे प्रथम बाहेरची वर्तुळाकार कड तयार करून घेणं. उभ्या खोडावर हे काम करायचं होतं. तिथं बसायला किंवा उभं राहायला जागा नसल्यामुळे तांबटांना हवेतल्या हवेत तरंगत खोडावर चोचीचे घाव घालावे लागत. नेम चुकणं, कोलमडणं, नख्यांची पकड चुकून पडायला होणं असे धोके त्यात असत.

दोन्ही तरुण तांबटांनी ढोलीचं नेमकं चित्र मनाशी पक्कं करून आधी बाहेरची वर्तुळाकार कड तयार करायला घेतली. चोची मारताना अवसान सुटून खाली कोसळण्याचा क्षण आला की हवेतल्या हवेत ती स्वत:ला सावरत, एकाच ठिकाणी स्थिर राहून पंख मारत, पुन्हा ताकद साठवून घेत, पुन्हा नव्या आवेशानं वर्तुळावर चोचीचे घाव घालणं सुरू करत. एक जण दमला आणि वरच्या फांदीवर जाऊन बसला की दुसरा तिथून खाली यायचा आणि उरलेलं काम पुढे सुरू करायचा.

असं करता करता कड आखून घेण्याचं काम पूर्ण झालं. ती आतल्या बाजूनं थोडी खोलगट झाल्यानं तिथं तांबटांना नख्या नीट रोवून बसायला मिळू लागलं. खोडावरचा पहिला थर टोकरून झाल्यामुळे आतलं पांढरंशुभ्र, मऊसर लाकूड दिसू लागलं. तो शुभ्र रंग तांबटांना खुणावत होता, साद घालत होता.

बाहेरची कड कोरून झाल्यावर तांबटांनी साताठ दिवसांचा वेळ जाऊ दिला. तोवर उन्हामुळे लाकडाचा दमटपणा नाहीसा होऊन ढोलीची जागा टणक झाली. त्यांनी आतलं

काम सुरू केलं. लाकडाचा पोत लक्षात घेऊन, मन लावून त्यांनी ढोली पोखरायला सुरुवात केली. मान वाकडी करून आडवी चोच मारली की फांदीचं बरंचसं भुस्कट त्यांच्या चोचीत यायचं. तांबट ते उच्छ्वासाबरोबर बाहेर ढकलत. तो कचरा हवेत तरंगत खाली येताना पाहून गंमत वाटायची...

बाहेरचं काम पूर्ण झाल्यावर तांबटांनी आतल्या बाजूला खालच्या दिशेनं लाकूड पोखरणं सुरू केलं. ढोलीचं तोंड लहान असावं, त्यात शिकारी पक्ष्यांना शिरता येऊ नये, तिची खोली इतकी असावी की आत मान घालून किंवा पाय घालून अंडी किंवा पिल्लं शत्रूला बाहेर काढता येऊ नयेत याची ती काळजी घेत होती. एखादी बाटली तोंडाशी लहान आणि आत मोठी होत जावी तसा आकार ढोलीला येऊ लागला. ढोलीची रचना जन्मजात तोंडपाठ असल्याप्रमाणे दोघंही सहजगत्या काम करत होती. एकमेकांना विश्रांती देत, एकमेकांच्या सोयीप्रमाणं, आनंदानं, उत्साहानं त्यांचं काम अनेक दिवस सुरू होतं. ते सुरू असताना त्यांनी नकळतपणे त्या ढोलीत राहायला सुरुवातही केली होती.

दिवस झपाट्यानं चालले होते. कधीतरी पावसाची सर यायची आणि सारा आसमंत भिजवून निघून जायची. जागोजागी साठलेल्या नितळ पाण्याच्या डबक्यांत चिमण्या यथेच्छ डुंबायच्या, खेळायच्या. कधी कावळे, कधी साळुंक्या, कधी बुलबुल यांसारखे पक्षी आजुबाजूला कोणी नाही असं पाहून पाण्याला चोच लावून चोचीत पाणी भरून घ्यायचे, मान वर करून प्यायचे आणि तृप्तीनं भरारत निघून जायचे.

उन्हानं हातपाय पसरायला सुरुवात केली. लख्ख निळ्या आकाशातली घारींची मंडलं आणि सकाळ-संध्याकाळ रांगेनं झेपावत जाणाऱ्या बगळ्यांच्या रांगा नेमकेपणानं नजरेच्या टप्प्यात येऊ लागल्या. झाडाझाडांवर, पानापानांवर नवा तजेला झळाळताना दिसू लागला.

तरुण तांबट आणि त्याची मैत्रीण जास्तीत जास्त वेळ परस्परांच्या सहवासात राहू लागली होती. दोघंही अन्नाच्या शोधात बरोबर फिरायची. ढोलीतली विश्रांतीही बरोबरच घ्यायची. जे मिळेल ते दोघंही वाटून खायची आणि वेळ मिळाला की सतत 'टुक्... टुक्...'चं गाणं गात बसायची. ताई पिल्लू मात्र अलीकडे कुठे दिसत नव्हतं. तिलाही एखादा मित्र मिळाला असेल आणि आपल्या नव्या संसारात ती रमून गेली असेल असं मनानं घेतलं.

थंडी वाढत चालली. पहाटेच्या साखरझोपेत मशिदीतली बांग, देवळातल्या घंटांचा नाद

लख्ख ऐकू येऊ लागले. इतकंच काय पण थोडं लक्ष देऊन ऐकल्यास दूर वांद्रे आणि कुर्ला रेल्वे स्थानकांतून जाणाऱ्या गाड्यांचा आवाज आणि त्यांच्या शिट्ट्याही कानी येऊ लागल्या.

पिंपळ, गुलमोहोर, बदाम अशा झाडांची रया गेली. पिंपळाची सारी पानं गळून त्याच्या झिंज्या झाल्या. करंजाचं झाड तर नसल्यातच जमा. आधीच ते ओबडधोबड, काळ्यासावळ्या कांतीचं. त्यात त्याची पानं सुकून गळून गेल्यामुळं ते अधिकच भुंडं, रखरखीत आणि आजारी दिसू लागलं.

गुलमोहोराच्या झाडाची कोवळीक आणि मन लुभावणारी पालवी पूर्णपणे गायब झाली. त्याच्याकडे पाहताना हेच का ते फुलांनी, पानांनी, शेंगांनी बहरलेलं झाड असा प्रश्न पडू लागला. कधी वाऱ्याची एखादी झुळूक आली की त्यामुळं गुलमोहराच्या वाळलेल्या शेंगा हलायला लागत आणि आतील बियांचा खुळ् खुळ् असा आवाज येऊ लागे. तो आवाजही करुणगंभीर वाटायचा. असं वाटायचं, की झाड आता मरणार आहे आणि आपल्याशी निरोपाची बोलणी करत आहे.

बदामाच्या झाडाची जाड पानंही आधी पिवळी, नंतर लाल आणि अखेरीस अंजिरी रंग धारण करून गळून गेली. शेंदरी रंगाच्या पानांनी लगडलेलं आख्खं झाड पाहताना आणि त्याच्या पाचोळ्यावरून फिरताना आपण एखाद्या परक्या भागात तर आलो नाही ना, अशी शंका मनात यायची. भेंडीच्या झाडाला लागलेली पिवळी फुलंही स्वत:त आक्रसून गळून गेली. त्यांच्या पोटातली हिरवीगार बोंडं उघडी पडली. ही बोंडं फोडली की त्यांतून चिकट पिवळ्या रंगाची मळी बाहेर पडते हे मला माहीत होतं. लहानपणी तो रंग आम्ही एकमेकांच्या अंगाला फासत बसायचो.

काही दिवसांनी, पुन्हा झाडांनी आपलं रूप पालटायला सुरुवात केली. करंजाच्या काही फांद्यांवरची जुनी पानं तशीच राहून गेलेली होती. काही फांद्यांवर पोपटी पालवी फुटलेली तर काही फांद्यांवर निबर हिरवी पानं तशीच राहिलेली. एकाच झाडावर हिरव्या रंगाच्या अशा दोन छटा पाहताना सुख वाटायचं. सूर्यकिरण या पानांतून फाकायला लागले की त्या दोन छटा अवर्णनीय दृष्टिसुख देऊन जायच्या.

गुलमोहोराकडे दररोज एकदा तरी नजर टाकण्याची माझी सवय. मी त्या झाडात होणारे सूक्ष्म बदल टिपत राहायचो. त्याची पानं जिथून गळून पडली होती तिथून हळूहळू हिरवे अंकुर

बाहेर पडत आहेत असं लक्षात येऊ लागलं. आधी खात्री पटत नव्हती, म्हणून रोज चक्कर मारून अधिक बारकाईनं पाहू लागलो. झाडाच्या साऱ्या अंगाला हळू हळू हिरव्या रंगाची लव फुटू लागली आहे हे लक्षात आलं. ते मरणार नाही असा विश्वास मनात निर्माण झाला.

बदामाला शेंड्याच्या बाजूनं तुरे फुटायला सुरुवात झाली. वडाच्या फांद्यांतून लालचुटुक पिपरांनी डोळे उघडायला सुरुवात केली. चकचकीत पोपटी पानं आणि लालचुटूक पिपरं यामुळं वडाचं एक नवंच रूप समोर आलं. नाना प्रकारचे पक्षी पुन्हा वडावर गोळा होऊ लागले. दिवेलागणीलाच वटवाघळं त्याच्याकडे झेपावू लागली. पिपरं खाण्यासाठी रात्रभर त्यांची दंगामस्ती आणि चित्कार सुरू झाले. रात्री झोप चाळवली की त्यांच्या चित्कारांचा आवाज कानात भरे. त्यात अवर्णनीय असा लाडिकपणा आणि गोडवा असे.

मी बाहेर येऊन पाही. वटवाघळांचे आवाज, वडाचं झाड आणि त्यामागचं अनंत आकाश अनुभवताना समाधी लागल्यागत होई. निसर्ग नकळत आपल्यात शक्ती भरत आहे आणि आपण निर्मळ होत चाललो आहोत असं वाटू लागे. काही कारणानं कधी मन अस्वस्थ असेल, कार्यालयात किंवा घरात काही अडचण निर्माण झालेली असेल तर वेळ मिळताच मी गॅलरीत येऊन उभा राही. तेवढ्यानंही बरं वाटून मी नव्या उत्साहानं कामाला लागत असे.

तरुण तांबटांची 'टुक् टुक्' आता कमालीची वाढली होती. जेव्हा पाहावं तेव्हा उंच फांदीवर बसून ते 'टुक् टुक्'चं गाणं गात असायचे. अगदी एकाग्रपणे, तल्लीन होऊन, देहभान हरपून. त्यांचा आवाज दणदणीत झाला होता. दोन आवाजांतलं अंतरही नेमकं झालं होतं. न दमता, न कंटाळता कितीतरी वेळ ते 'टुक्... टुक्...' करत राहायचे...

एकदा गॅलरीत उभं राहून पाहत होतो. तरुण तांबट देहभान हरपून गात होते. जीव ओतून 'टुक्... टुक्...' करत होते. एक, दोन, तीन, चार... मी सवयीनं आकडे मोजू लागलो. त्यांचं ते गाणं नितळ आणि प्राणाला स्पर्श करणारं वाटत होतं. हे गाणं आपण कधीतरी ऐकलं आहे, त्याच्याशी असणारं नातं समजून घेतलं आहे, त्याचा आनंद घेतला आहे; असं स्मरू लागलं. कधी बरं? कधी? कधी?

डोक्याला ताण दिला आणि त्यांच्या त्या बेभान होऊन गाण्याचं कारण लक्षात आलं! तांबटांचा विणीचा हंगाम सुरू झाला होता. त्यांनी ढोलीत अंडी घातली आहेत आणि पिल्लांच्या स्वागतासाठी त्यांचं 'टुक्... टुक्...' सुरू आहे हे उमगलं... लक्ष ठेवून खात्री

करून घेतली. एक तांबट ढोलीत अंडी उबवत बसला की दुसरा बाहेरून 'टुक्... टुक्...' सुरू करायचा. तो बाहेर आला की बाहेरचा तांबट आत जाऊन अंडी उबवत बसायचा, असं सुरू झालं होतं.

काही दिवसांतच गुलमोहोराच्या शेंड्यांवरून लाल हळदुल्या रंगाच्या एका कळीनं डोकं वर काढलं. कळी पाहून मन प्रसन्न झालं. लवकरच ती फुलेल, साऱ्या जगाला आनंद देईल, तिच्यातला मकरंद पिण्यासाठी नाना प्रकारचे पक्षी येतील, भुंगे आणि फुलपाखरं तिच्याकडे आकर्षित होतील, सारा आसमंत प्रसन्न होऊन जाईल हे लक्षात आलं.

कळीच्या दर्शनानं छान वाटलं. नाचावं-गावं असं वाटू लागलं. त्याच आनंदात असताना तरुण तांबट आला आणि गुलमोहोराच्या एका फांदीवर बसून 'टुक्... टुक्...' करू लागला. त्याच्या आवाजात कमालीचा गोडवा होता. आवाहन होतं, अधीरता होती. जगाला तो जणू काहीतरी सांगू पाहत होता, साऱ्यांचं लक्ष वेधून घेऊ पाहत होता. काय सांगायचं असेल बरं त्याला?

'टुक्... टुक्...'चं एक आवर्तन पूर्ण झाल्यानंतर, तो आवेगानं फांदी पायांनी मागे रेटत वर उडाला. दोनचार भराऱ्या मारून पुन्हा तिथंच येऊन बसला आणि अधिक जोरानं 'टुक्... टुक्...' करू लागला. त्याचा आवाज इतका वाढला की धातूची तार ताकदीनिशी छेडली जात आहे असं वाटू लागलं. एवढा कसला आनंद झाला होता त्याला?

एकीकडून त्याची मैत्रीण आली आणि त्याच्याजवळ बसून 'टुक्... टुक्...' करत आपलाही आनंद व्यक्त करू लागली... तिच्याही आवाजाला वेगळीच धार चढली होती.
'टुक्... टुक्...'
'टुक्... टुक्...'


एक अवर्णनीय स्वरूपाचा आनंद सर्वत्र भरून राहिला होता. 'टुक्... टुक्...' हे जणू त्या आनंदाचं स्पंदन बनून राहिलं होतं. तो ठेका पकडून सारं विश्वच जणू गात आहे असं भासू लागलं.

पिंपळाच्या शेंड्यावरून कोकिळाचं 'कुहूऽऽऽ, कुहूऽऽऽ' सुरू झालं होतं. जांभळीच्या शेंड्यापाशी साळुंक्यांचा कलकलाट सुरू होता. वडावर, फणसावर आणि बदामाच्या झाडांवर बसलेले कावळे मधून मधून आपला 'काऽऽऽव, काऽऽऽव'चा जरतारी सूर


छेडत होते. सोनमोहोर, भेंडीच्या भरगच्च हिरव्या पानांत लुप्त झालेले राघू मधूनच 'चिर्रऽऽऽ, चिर्रऽऽऽ' करत मस्तीत गात होते. बुलबुल 'ए टिटूऽऽऽ' अशी गोड शीळ घालत या झाडावरून त्या झाडावर नाचत-बागडत फिरत होते. नर्तक शेपटीचा पिसारा फुलवून 'विटू टीऽऽ विट्ऽऽ विट्ऽऽ' करत नाचत होते.

वेगवेगळ्या झाडांवर, वेगवेगळ्या ठिकाणी बसून गाणारे हे पक्षी, परस्परांच्या नात्यांचं, परस्परांना जोडणारं आनंदाचं मखमली वस्त्र विणत आहेत हे लक्षात आलं. त्या वस्त्राची भेट पांगाऱ्याच्या ढोलीत जन्माला येणाऱ्या नव्या जीवांना त्यांना द्यायची असावी आणि त्या छोट्या जीवांना आपल्याशी जोडून घ्यायचं असावं; याविषयी माझ्या मनात काहीही शंका राहिली नाही.

तांबट पुन्हा जीव ओतून 'टुक्... टुक्...' करू लागला. त्याची मैत्रीणही त्याला त्याच आवेगानं प्रतिसाद देऊ लागली.
'टुक्... टुक्...'
'टुक्... टुक्...'



■■■





# तांबट : एक शोध

तांबट पक्षी जगभर सगळीकडे आढळून येतो. प्रांता-प्रांतात त्याच्या रंगरूपात आणि नावात थोडेफार बदल होतात, पण त्याचं Barbet हे इंग्रजी नाव जगभर प्रचलित आहे. या पुस्तकातला तांबट Crimsonbreasted Barbet म्हणून ओळखला जातो. शास्त्रीय भाषेत बोलायचं तर तो 'Megalaima haemacephala' या कुलातला आहे.

पक्ष्यांसंबंधी मराठीत फार कमी लिहिलं गेलंय, मग ते शास्त्रीय असो वा ललित! या तांबटाविषयी तर 'विश्वकोशा'तली नोंद आणि मारुती चितमपल्ली ह्यांच्या 'पक्षिकोशा'तील अल्पशी माहिती सोडल्यास फार काही हाती लागत नव्हतं.

इंटरनेटवरून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला पण तिथंही केवळ शास्त्रीय स्वरूपाची माहिती मिळत होती. किती प्रकारचे तांबट अस्तित्वात आहेत, ते कुठं राहतात, त्यांची लांबी किती, ते किती अंडी घालतात-काय खातात यासारखी माहिती आणि छायाचित्रं पाहायला मिळायची. पण या माहितीविषयी खात्री वाटत नव्हती, समाधान होत नव्हतं. उपलब्ध होणारी माहिती आणि तांबटांच्या प्रत्यक्ष निरीक्षणातले माझे अनुभव यांतही फरक पडत होता.

'Bombay Natural History Society' चे संचालक डॉ.असद रहेमानी यांची एकदा भेट घेतली. त्यांनी मला त्यांच्या ग्रंथालयात नेऊन 'Biology of Indian Barbets' हे प्रो.एच.एस.ए.याह्या ह्यांचं पुस्तक दाखवलं. प्रो.याह्या ह्यांनी त्यांच्या पीएच.डी.साठी ‘तांबट’ हा विषय निवडला होता, पण त्यांचं संशोधन 'Small Green Barbet' अर्थात ‘छोट्या हिरव्या तांबटा’वर आणि 'Crimsonthroated Barbet' अर्थात ‘मलबारी तांबटा’वर होतं. 'Crimsonbreasted Barbet' संबंधी त्यात काही महत्त्वाच्या नोंदी आढळल्या, माहिती मिळाली पण त्यामुळे माझं समाधान होत नव्हतं, अनेक प्रश्नांची उत्तरं मिळत नव्हती.

कावळा ‘काऽऽऽव, काऽऽऽव’ करतो, चिमणी ‘चिऽऽऽव, चिऽऽऽव’ करते, त्या धर्तीवर तांबटाचा आवाज कसा असतो असा साधा प्रश्न होता. त्याच्या आवाजाचा उच्चार मराठी ‘विश्वकोशा’त ‘टोंक... टोंक...’ असा दिला आहे. ‘पक्षिकोशा’त ‘टोक... टोक...’ आणि ‘टुक्... टुक्...’ असे दोन उच्चार दिले आहेत. प्रो.याह्या यांनी आपल्या ग्रंथात ‘टुक्... टुक्...’ असा तर डॉ.सतीश पांडे यांनी आपल्या 'Birds of Western Ghats' या ग्रंथात ‘पुक्... पुक्...’ असा उच्चार दिला आहे.

विदर्भात या तांबटाचा आवाज ‘पुक्...पुक्...’ असा मानतात, म्हणून त्याला तिकडे पुक्पुक्या’ असं नाव पडलं आहे. ‘सखा नागझिरा’चे लेखक, प्रसिद्ध पक्षिनिरीक्षक किरण पुरंदरे यांनी हा आवाज ‘पुक्... पुक्...’ असा लिहावा असं चर्चेत म्हटलं पण त्यांच्या ‘कापशीची डायरी’ या पुस्तकात तो ‘टक् टक् टक्’ असा आणि ‘उक्-उक्-उक्’ असाही दिला आहे.

डॉ.सलीम अली यांचं 'Handbook of the Birds of India and Pakistan' हे दहा खंडांचं संशोधन प्रसिद्ध आहे. त्यातील चौथ्या खंडात त्यांनी या तांबटाचा आवाज ‘टुक्... टुक्...’ किंवा ‘टुंक्... (Tunk)’ असा दिला आहे. त्यांच्याच 'Common Birds' या पुस्तकात मात्र त्यांनी याच तांबटाचा आवाज फक्त ‘टुक्... टुक्...’ असा नमूद केला आहे.

दुर्गा भागवतांनी नाशिकचे तत्कालीन कलेक्टर जॅक्सन यांच्या ग्रंथसंग्रहावर आधारित ‘टोक...टोक...टोक...’ या मथळ्याचा एक लेख लिहिला आहे. (त्यांच्या ‘भावमुद्रा’ या पुस्तकात तो समाविष्ट आहे.) हा आवाज अर्थातच तांबटाचा आहे, पण त्यांनी ‘टो’वर अनुस्वार दिलेला नाही की ‘क’चा पाय मोडलेला नाही. त्याचं काहीतरी कारण असेल पण ते कळायला मार्ग नाही. सोलापूरचे पक्षिनिरीक्षक बी.एस.कुलकर्णी यांनी आपल्या

‘पक्षीनिरीक्षण’ या पुस्तकात तोच आवाज ‘ट्रॉंग ट्रॉंग’ असा दिला आहे. Internet वरील माहितीत बऱ्याचदा, Tonk, Tonk असा शब्द आढळतो. त्याला Tonk Notes असंही म्हणतात.

तांबट हा त्याच्या आवाजाच्या पार्श्वभूमीवर भारतातील सर्वाधिक ज्ञात पक्षी. त्याचा आवाज Most Familiar bird voices of the countryside म्हणून ओळखला जातो. पण त्या आवाजाचा उच्चार नेमका कसा करायचा याचं एक उत्तर सापडत नाही, हे वास्तव आहे. पक्ष्यांचे आवाज नेमके कसे ऐकू येतात आणि त्यांचे उच्चार कसे करायचे, हे त्या त्या प्रांताशी आणि भाषेशी संबंधित असतं असं असद रहेमानी यांनी सांगितलं. ते म्हणाले, ‘‘टिटवीच्या आवाजाचा इंग्लिशमधील उच्चार आणि जपानीमधील उच्चार वेगवेगळा राहील हे स्पष्टच आहे.’’

सलीम अलींनी 'The Book of Indian Birds' मध्ये तांबटाला विविध राज्यांत काय म्हटलं जातं ते नमूद केलं आहे. त्यांनी मराठीतील Juktuk, Sonar आणि Tambat या नावांचा उल्लेख केला आहे. हिंदीतील नावात Tambayat, गुजरातीमधील Tuktukiyo आणि तेलुगुमधील Tokoji या नावांचा उल्लेख आहे. ही नावं ‘प’ पेक्षा ‘ट’ कडे आणि ‘टुक्... टुक्...’ या उच्चाराकडे अधिक झुकतात असं लक्षात येतं.

‘टुक्... टुक्...’ असा आवाज काढताना तांबटाची चोच बंद असते आणि गळा फुगत असतो असं सलीम अली यांनी नमूद केलं आहे. ‘ट’ हा कंठ्यवर्ण आहे तर ‘प’ हा ओष्ट्यवर्ण आहे. ‘पुक्...पुक्...’ असा उच्चार करताना तांबटाला चोच उघडावी लागेल, तर ‘टुक्... टुक्’ असा आवाज करताना ती उघडावी लागणार नाही, असा तर्क करून मी ‘टुक्... टुक्...’ हा उच्चार स्वीकारायचं ठरवलं.

माणसाचे नियम पक्ष्यांना लावणं प्रथमदर्शनी अयोग्य वाटेल, पण त्याचं समर्थनही करता येतं. चितमपल्ली म्हणतात, की माणसाची आवाज काढण्याची यंत्रणा आणि पक्ष्यांची यंत्रणा यांत साम्य आहे. तसं नसतं तर मैना किंवा पोपट यांनी माणसाच्या बोलण्याची नक्कल कशी केली असती? त्यांचा हा सवाल बिनतोड आहे. त्याहीपुढे जाऊन ते म्हणतात, की संगीतातील सात स्वर माणसानं पशुपक्ष्यांकडून घेतले आहेत ते असे-
मोराकडून सा (षड्ज), चातकाकडून रे (ऋषभ), शेळीच्या कंठातून ग (गांधार), क्रौंचाकडून म (मध्यम), कोकिळाकडून प (पंचम), बेडकाकडून ध (धैवत) आणि

हत्तीकडून नि (निषाद).

माणसाप्रमाणे पक्ष्यांनाही दोन फुफ्फुसं असतात. फुफ्फुसांकडे जाणाऱ्या मुख्य श्वासनलिकेची जिथं विभागणी होते तिथं पक्ष्यांचं Syrinx असतं. त्याला आपण 'स्वरयंत्र' म्हणू या. या यंत्रणेतील स्नायूंचं नियंत्रित आकुंचन म्हणजे आवाज. 'A controlled sequence of muscle contraction is perceived as a sound'. प्रो.याह्या यांनी ही व्याख्या दिली आहे. हवा आत घेताना किंवा बाहेर सोडताना त्या स्नायूंवरचा ताण कमी-जास्त करून, आतील हवा हवी त्या प्रमाणात दाबून पक्षी विविध प्रकारचे सूर काढतात, आवाजातील चढउतार नियंत्रित करू शकतात.

चितमपल्लींनी 'पक्षिकोशात' तांबटाची जी नावं दिली आहेत त्यात तांबट, पुकपुके, पोकळी, पोपळी, पुकपुको, कोकरूस, तिरघा, पुकळी, जुकतुक, सोनार, छोटा तांबट आणि पुकपुक्या अशा नावांचा समावेश आहे. गुजराती-मधील 'टुकटुकियो' हे नावही त्यांनी नमूद केलं आहे. सतीश पांडे यांनी आपल्या पुस्तकात, संस्कृत साहित्याच्या आधारे या तांबटाची Hemak, Manjulitak आणि Vataha अशी तीन नावं दिली आहेत. सोनाराच्या हातोडीच्या ठोक्याशी असलेलं साम्य लक्षात घेऊन त्याला Hemak, वडाच्या झाडाशी असणारा संदर्भ लक्षात घेऊन Vataha तर मंजुळ आवाजामुळे 'मंजुलितक' असं म्हटलं आहे.

आवाज हे पक्ष्यांचं एक मोठं शस्त्र असतं. जगण्यासाठी पदोपदी त्यांना या शस्त्राचा उपयोग होत असतो आणि म्हणून 'आवाजाशिवाय पक्षी' अशी आपण कल्पनाही करू शकत नाही. छोटा आवाज (Call) आणि 'गाणं'(Song) या अंगानं पक्षी आवाजाचा वापर करतात. त्या त्या वेळेच्या मूडवरही त्यांचा आवाज अवलंबून असतो. भूक लागलेली असताना, मीलनोत्सुक असताना, भीती वाटत असताना एकाच पक्ष्याच्या आवाजाला वेगवेगळ्या छटा असल्याचं लक्षात येतं. कावळा नुसता 'काऽऽऽव, काऽऽऽव' करत नाही तर खुशीत असल्यावर 'क्रऽऽऽ' असा गोड आवाजही काढतो हे अनेकांनी अनुभवलं असेल.

स्वच्छ, सुस्पष्ट आवाज हे त्या त्या पक्ष्याच्या सुदृढ प्रकृतीचंही लक्षण मानलं जातं. सतीश पांडे म्हणाले, की ''तांबट शत्रूला घाबरवण्यासाठी 'हिस्सऽऽऽ' असा सापासारखा आवाजही काढू शकतो.''

तांबटाचा रंग झाडाझुडुपांशी, पाना-फुलांशी मिळताजुळता असल्यानं त्याचं अस्तित्व

निरीक्षकांच्या सहजासहजी लक्षात येत नाही. मात्र त्याचा आवाज ऐकून ‘इथं तांबट आहे’ असं लगेच ओळखता येतं. तो कुठे बसलाय, काय करतोय, त्याचा मूड कसा आहे याचा अंदाज त्याच्या आवाजावरून येऊ शकतो.

पक्षीजगतातील विविध प्रकारच्या माहितीचं आदानप्रदान त्यांच्या आवाजांच्या साह्यानं होत असतं. आपल्या परिसराची ओळख, हद्दींची निश्चिती, संकटकाळातील समन्वय यांसारखी कामं पक्षी आवाजाच्या साह्यानं करतात. फळांच्या किंवा कीटकांच्या मेजवानीचं निमंत्रण असो की शत्रूच्या आगमनाची सूचना, अशी माहिती ते आवाजांच्या साह्यानं एकमेकांना देत असतात. इतरांना सावधगिरीची सूचना देण्याच्या कामात मोर, ढोकरी, टिटवी, सातभाई, भेरा हे पक्षी आघाडीवर असतात.

परस्परांना समजावून घेण्यासाठी, प्रेम व्यक्त करण्यासाठी आणि आपल्या अस्तित्वाची जाणीव परस्परांना करून देण्यासाठी माध्यम म्हणूनही पक्षी आवाजाचा वापर करतात. नर आणि मादी परस्परांकडे आकर्षित होण्यामागे आणि नराचे मीलन त्याच वर्गातील मादीशी होण्यामागे आवाजाचा मोठा वाटा असतो. आवाज अस्तित्वात नसता तर तांबट आणि त्यांसारखे अन्य पक्षी, त्यांच्या प्रजननकार्यात व्यत्यय येऊन नष्टच झाले असते.

सहचराची निवड, ढोलीची-घरट्याची जागा निश्चित करणं, अंडी घालण्यापूर्वी आणि नंतर त्याबाबत आनंद व्यक्त करणं, अंडी उबवण्यासाठी नर-मादी यांच्यातील कामाची पाळी ठरवून घेणं अशी कामं तांबट आणि अन्य पक्षी आवाजाच्या आधारानं करतात. पिल्लांच्या संगोपनातील अनेक टप्प्यांवर सुसंवादासाठी केवळ आवाज हे त्यांचं प्रमुख साधन असतं.

प्रो.याह्या यांच्या पुस्तकात भारतीय उपखंडातील पुढील दहा तांबटांची माहिती आली आहे.
१. Green Barbet, २. Large Green Barbet, ३. Lineated Barbet,
४. Small Green Barbet, ५.Yellow-fronted Barbet, ६. Golden-throated Barbet,
७. Blue-throated Barbet, ८. Blue-eared Barbet, ९. Crimson-throated Barbet,
आणि १०. Crimson-breasted Barbet.
ही यादी देण्याचं कारण असं, की तांबटा-तांबटांतील सूक्ष्म भेद त्यांच्या रंगांवरून निश्चित केले जातात हे लक्षात यावं!

'Green Barbet' ला ‘हिरवा तांबट’, 'Small Green Barbet' ला ‘लहान हिरवा तांबट’, 'Western Green Barbet' ला ‘गोदावरी तांबट’ 'Crimson-throated Barbet' ला

'मलबारी तांबट' अशी नावं 'पक्षिकोशा'त दिलेली आहेत. मात्र 'Crimson-breasted Barbet' ला फक्त 'तांबट' असं म्हटलं आहे. Crimson या शब्दाचा मराठी अनुवाद त्याच्या नावामागे जोडलेला नाही.

Crimson म्हणजे नेमका कोणता रंग हे अनेकांना सांगता येत नाही. Wikipaedia ज्ञानकोशात 'Crimson is a strong bright, deep red colour combined with some blue, resulting in a tiny degree of purple' अशी व्याख्या दिली आहे. पण ती अधिक गुंतागुंतीची वाटते.

Crimson चा समानार्थी शब्द Deep Red असा आहे, पण याच ज्ञानकोशात Red च्या तेहेतीस छटा देण्यात आल्या असून त्यांपैकी नेमक्या छटेचा निर्देश करणं आणि त्याची खात्री बाळगणं ही एक अवघड गोष्ट वाटते. Crimson ला पक्षिकोशात 'गुलाबी' तर मराठी विश्वकोशात 'किरमिजी' असं म्हटलं आहे. किरमिजी ही छटा Crimson च्या अधिक जवळ जाणारी आहे हे खरे, पण ती नेमकी कशी आहे हे मराठीतही अनेकजणांना समजावून सांगता येत नाही.

'किरमिजी' रंगाचं स्वतंत्र महत्त्व अमान्य करण्याचं कारण नाही, पण त्यामुळे नेमका आशय व्यक्त होतो का हे पाहणं तितकंच महत्त्वाचं! अनेक मित्रांशी बोललो. लालभडक, लालबुंद, लालजर्द, कुंकवासारखा लाल असे अनेक पर्याय पुढे येऊ लागले. चित्रकार अरुण कालवणकर म्हणाले, की 'कुंकवासारखा लाल' असा शब्द वापरता येईल. प्रभादेवी येथील सिद्धिविनायकाची मूर्ती Crimson आहे असं ते म्हणाले. चित्रकार मनोज आचार्य म्हणाले, की 'किरमिजी-लाल' असा शब्द वापरायला हरकत नाही. त्यांनी गुलबक्षीची फुलं Crimson रंगाची असतात असं सांगितलं. गोपी कुकडे यांनी, 'लाल गुलाबाची फुलं Crimson असतात' असं मत मांडलं.

Megalaima haemacephala असं या तांबटाचं कुल आहे. Megalaima म्हणजे फुगणाऱ्या, रुंद कंठाचा, आणि Haemacephala म्हणजे लाल डोक्याचा. डोकं, छातीवरील रंगीत ठिपके आणि आवाज काढताना फुगणारा गळा लक्षात घेऊन तांबटाची कुलनिश्चिती करण्यात आली आहे. Haemacephala मधील 'Haema' म्हणजे रक्त, हा अर्थ लक्षात घेऊन आणि तांबटाचे छायाचित्रातील रंग पुन:पुन्हा पाहून मी Crimson साठी 'रक्तवर्ण' हा शब्द वापरण्याचं निश्चित केलं.

तांबटांमध्ये Crimson breasted आणि Crimson throated असे भेद आहेत हे आपण पाहिलं. एकाचा 'गळा' रक्तवर्ण तर दुसऱ्याची 'छाती' रक्तवर्ण असते. हा फरक जर पक्षिनिरीक्षकांना कळला नाही आणि त्यांनी तो नीट टिपून लोकांसमोर आणला नाही तर त्यांच्या निरीक्षणाच्या आणि संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट होतील हे उघड आहे.

Coppersmith चा अर्थ 'तांबट' असा होतो. तांबट म्हटलं की आपल्याला भांडी घडवणारे तांबट आठवतात. भांडी घडवताना होणारा ठोक्यांचा आवाज या पक्ष्याच्या आवाजाशी साधर्म्य दर्शवणारा आहे. त्यावरून तांबट असं नाव त्याला दिलेलं आहे. पण तांबटाला 'हेमक' (संस्कृत) आणि 'सोनार' (मराठी) अशी नावंही आहेत. सोन्याचे दागिने घडवताना सोनार जी छोटी हातोडी वापरतात तिच्या ठोक्याशी त्याच्या आवाजाचं साधर्म्य दर्शवलं आहे. 'सोनार' आणि 'तांबट' यांच्या ठोक्यांत मोठा फरक आहे. एकाचा ठोका दणदणीत तर दुसऱ्याचा नाजूक. मग ही दोन टोकांची नावं एकाच आवाजाला का दिली गेली? त्याचा आवाज मंजुळ कसा, हे एक कोडंच वाटतं.

प्रो.याह्या यांनी नमूद केल्यानुसार Barbet हा शब्द Barbu या फ्रेंच शब्दापासून आला आहे. The name Barbet has been derived from French Barbu (bearded) which is suggested by the presence of nasal and rictal bristles. Barbu म्हणजे 'मिशिवाला'. तांबटाला मिशाही असतात. याचा अर्थ हा शब्द त्याच्या आवाजावरून न येता रूपावरून आलेला आहे. मग त्याला 'तांबट' किंवा 'सोनार' अशी जातीवाचक नावं का पडली असतील, असे अनेक प्रश्न पडत होते आणि त्यांची समाधानकारक उत्तरं मिळत नव्हती.

एक तांबट हुबेहूब दुसऱ्या तांबटासारखा दिसतो. त्यामुळे त्यांच्यात 'आई-बाबा' किंवा 'ताई-दादा' असे भेद करणं धाष्टर्याचं ठरतं. इतर पक्ष्यांमध्ये नरांचे रंग माद्यांपेक्षा उजळ असतात. त्यामुळे त्यांच्यातील नर-मादी ओळखणं सोपं जातं. तांबट नर आणि तांबट मादी यांचा आवाजही समसमान असतो. इतर पक्ष्यांमध्ये नर हे माद्यांपेक्षा अधिक बोलके असतात. त्यामुळे आवाजावरून नर-मादीतील फरक ओळखण्याची संधी असते. मात्र तांबटातील नर-मादी कशी ओळखायची हा प्रश्न होता.

प्रो.याह्या यांनी याला अपवाद नमूद केला आहे. ते म्हणतात,'The females are slightly larger than the males. However, in the field it is almost impossible to differentiate the Indian male and female barbets except at some occasions by

their calls and behaviour'. 'नर आणि मादी यांतील फरक अपवादात्मक स्थितीत त्यांच्या वर्तनावरून आणि आवाजावरून करता येऊ शकतो' हे त्यांनी मान्य केलं आहे.

'कापशीची डायरी' या पुस्तकात नर आणि मादी यांच्यातील फरक दर्शविणारी नोंद किरण पुरंदरे यांनी केली आहे. नर कापशी घरट्यापासून नेहमी दूर तर मादी कापशी घरट्याच्या जवळपास बसते. पिल्लांच्या संगोपनात अधिक रस घेणारी मादीच असू शकते असं त्यांनी स्वानुभावानं म्हटलं आहे. घरटं बांधणाऱ्या मादीला नजराणा म्हणून नर खाद्यपदार्थ आणून देतो असाही उल्लेख त्यांनी केला आहे.

प्रो.याह्या यांनी आपल्या पुस्तकात 'लहान हिरव्या तांबटा'बाबत एक नोंद केली आहे. तो एका मादी तांबटाचा अनुनय करत होता, पण ती त्याला दाद देत नव्हती. मग तो एक भरारी घेऊन दूर गेला आणि दोन मिनिटांत परत आला. त्याच्या तोंडात एक किडा होता. किडा पाहून मादी खूष झाली! विशेष म्हणजे त्यांचं मीलन घडल्यानंतर नरानं तो किडा मादीला चारला!

मोठे तांबट आणि पिल्लं यांच्यातील फरक त्यांचा आवाज आणि रंग यांवरून ओळखता येतो. पिल्लं जसजशी मोठी होत जातात तसतसा त्यांचा आवाज अधिकाधिक मोकळा आणि रंग अधिकाधिक उजळ होत जातात.

पक्ष्यांमध्ये आई-बाबा, ताई-दादा, पती-पत्नी अशी नाती सांभाळली जातात का? त्यांच्या पायात कडी अडकवून अभ्यास (Ringing) केल्याशिवाय असा फरक दाखवून देणं अशक्य असल्याचं असद रहेमानी यांनी सांगितलं. पशु-पक्ष्यांमध्ये पिल्लं मोठी होताच अन्यत्र निघून जाण्याची वृत्ती असल्यामुळे त्यांच्यात कुल-व्यभिचाराची शक्यता कमी होते.

तांबटांमध्ये नर आणि मादी यांच्या जोड्या ठरलेल्या असतात आणि त्यांच्यात निष्ठापूर्ण संबंध असतात असं अनेकांनी म्हटलं आहे.

सारस, चक्रवाक, हंस यांसारखे अनेक पक्षी 'पती-पत्नीचं', नातं इतक्या निष्ठेनं पाळतात की त्यांपैकी एखादा मरण पावला तर दुसरा झुरायला लागतो. त्या जोडीतील दुसरा पक्षी उर्वरित आयुष्य एकट्यानं काढतो. त्याच्या विमनस्क स्थितीमुळे एखाद्या प्राण्याकडून किंवा माणसाकडून पुढं त्याची सहज शिकार होऊ शकते, असं चितमपल्ली यांनी सांगितलं.

'रक्तवर्णी छातीच्या तांबटा'चं वर्णन करताना, तो आकारानं चिमणीपेक्षा मोठा असतो असं

सलीम अली यांनी म्हटलं आहे. (निरीक्षक त्याची लांबी अंदाजे १७ सें.मी. किंवा १७० मि.मी.असल्याचं नमूद करतात.) हा तांबट भारताबरोबर बांगला देश, पाकिस्तान, श्रीलंका आणि मॅनमार येथे आढळतो. मोर हा जसा भारताचा राजपक्षी आहे त्याप्रमाणे तांबट हा पाकिस्तानचा राजपक्षी आहे, हे सांगितलं तर अनेकांना आश्चर्य वाटेल. इस्लामच्या हिरव्या रंगानं तांबटाच्या हिरव्या रंगाचा केलेला हा अनोखा सन्मान आहे.

प्रामुख्यानं फळांवर जगणारा तांबट, पंखांची वाळवीही खाताना दिसतो असं अली यांनी म्हटलं आहे. (फळांवर गुजराण करणारे पक्षी आपल्या पिल्लांना कीटक-अळ्या यांसारखा प्रथिनयुक्त चारा चारताना दिसतात. पिल्लं भराभर मोठी व्हावी हा त्यामागचा उद्देश असतो.) जमिनीला समांतर असणाऱ्या फांदीवर खालच्या बाजूनं तो ढोली कोरतो. तीन अंडी घालतो. एक किंवा दोन सेकंदांच्या अंतरानं 'टुक्... टुक्...' असा आवाज काढतो. तो जमिनीवर कधीही उतरत नाही. फळांच्या हंगामात फळं खाण्यासाठी साळुंक्या, बुलबुल, कबुतरं, हळद्या यांसारख्या पक्ष्यांनाही तो बोलावतो. नर-मादी दोघंही मिळून प्रापंचिक जबाबदाऱ्या पार पाडतात असं अलींनी आपल्या नोंदीत म्हटलं आहे.

अंडी घातल्यानंतर पिल्लं बाहेर येईपर्यंतचा कालावधी साधारणपणे ३० ते ४० दिवसांचा असतो. रक्तवर्ण छातीच्या तांबटांमध्ये तो ४० दिवसांचा असतो असं प्रो.याह्या यांनी नमूद केलं आहे.

या पुस्तकातील तांबटाची कहाणी म्हणजे त्याचा एका वर्षाचा जीवनपट आहे असं म्हणता येईल. साधारणपणे वर्षभरात तांबटाची पिल्लं प्रजननक्षम होतात. पण त्यासंबंधी छातीठोकपणे सांगता येईल अशी स्थिती नाही. विविध पक्ष्यांचा वयात येण्याचा किमान आणि कमाल कालावधी पाच आठवडे ते दहा वर्षे असा असल्याचं 'पक्षिकोशा'त म्हटलं आहे. ''जपानी लावा पक्षी सहा आठवड्यांनी, Albatross आठ वर्षांनी तर बहुसंख्य पक्षी अकरा महिन्यांत वयात येतात'' असं सतीश पांडे यांनी आपल्या पुस्तकात म्हटलं आहे.

तांबट तीन अंडी घालतो असं सलीम अलींनी म्हटलं असलं तरी ती संख्या दोन ते सहापर्यंत असल्याचं विविध निरीक्षकांचं मत आहे. अंडी पांढऱ्या रंगाची असतात. त्यात एखादं अंडं पोयंडंही निघू शकतं. असं पोयंडं अंडं पक्षी फेकून देतात. अंडी घालण्यामध्ये, म्हणजे दोन अंड्यांमध्ये एक किंवा दोन दिवसांचं अंतर असतं. पिल्लं जन्मताना मात्र एकदम जन्मतात, म्हणजे एक मोठं पिल्लू आणि दुसरं लहान असा भेद करता येत नाही.

माझ्या लेखनात मी दोन पिल्लं दाखवली आहेत. त्यांत लहान-मोठा असा भेद केला आहे.

आई-बाबा, ताई-भाऊ अशी नातीही दाखवली आहेत. याला आधार काय, असा प्रश्न जिज्ञासूंना पडू शकतो. अचूक माहिती देण्यावर माझा भर होता, पण माझ्या मर्यादाही खूप होत्या हे मी स्पष्ट करत आहे.

पक्ष्यांचे आवाज, त्यांची भाषा, त्यांची गाणी यांविषयी जगभरचे पक्षीशास्त्रज्ञ सतत अभ्यास करत असतात. Sound Spectrograph, Oscilometer, Spotting Scope यांसारख्या साधनांच्या साह्यानं आणि Moleculer Biology सारख्या विकसित शास्त्रामुळे अधिकाधिक अचूक निरीक्षणं नोंदवणं अनेकांना शक्य झालं आहे. पण मी निरीक्षणासाठी साधी दुर्बीणही वापरलेली नाही. डोळ्यांनी दिसणारी तांबटाची ढोली ही माझी सर्वांत जमेची बाजू होती. निरीक्षणातील नोंदी, विविध ठिकाणांहून हाती येणारी माहिती आणि माझी 'आंतरिक प्रेरणा' या आधारे मी लिहीत गेलो. पिल्लानं केलेला हळद्याचा पाठलाग हा भाग वगळता बाकी सारी कहाणी माझ्या नजरेसमोर घडलेली आहे.

सलीम अलींनी आपल्या 'Common Birds' या पुस्तकात म्हटलंय की, 'The discovery of a nest where it can be watched fairly easily is of course a great boon, and it provides a wonderful chance to become familiar with the bird in question.'

पक्षिनिरीक्षण ही कुणाची मक्तेदारी नाही. ते कुणालाही, कोणत्याही ऋतूत, कोणत्याही ठिकाणी करता येतं. त्यासाठी मुद्दाम दूर जाण्याची, विशिष्ट Qualification ची किंवा साधनसुविधांची गरज नसते. पक्षिनिरीक्षण हा सर्वांना उच्च कोटीचा आनंद मिळवून देणारा साधा सोपा छंद आहे, त्याची गोडी लागली तर स्वर्गप्राप्तीची आस धरण्याची गरज नाही; अशा आशयाचं प्रसिद्ध कवयित्री एमिली डिकिन्सन यांचं वचन मी आरंभीच दिलं आहे.

सलीम अली म्हणतात, की 'जगाच्या पाठीवर एक चौरस किलोमीटर क्षेत्रही असं आढळणार नाही की जिथं पक्षी नाहीत'. त्यामुळे मनात आणलं तर एखादा माणूस घरबसल्याही पक्षिनिरीक्षण करून आनंद मिळवू शकतो. इतकंच काय पण पक्षिजगतातील एखादी अपूर्व घटना-प्रसंग जगासमोर आणण्याचं श्रेयही मिळवू शकतो. 'हौशी निरीक्षकांची निरीक्षणं तज्ज्ञ निरीक्षकांच्या अभ्यासासाठी पोषक ठरतात' असं सलीम अली आग्रहानं सांगायचे.त्यांनी नवशिक्या निरीक्षकांना नेहमी प्रोत्साहन दिलेलं आहे, हे या ठिकाणी आवर्जून सांगण्यासारखं आहे.

पक्ष्यांची गाणी, त्यांचा विहार, त्यांचं रूप, त्याचं जीवनचक्र, त्यांचं असणं-नसणं हे

जसं शास्त्रज्ञांना आव्हान देतं तसंच कलावंताच्या प्रतिभेलाही चालना देतं. जो पक्षी ॲरिस्टॉटलला पक्षिशास्त्राच्या निर्मितीची प्रेरणा देतो तोच पक्षी वाल्मिकीसाठी 'रामायणा'सारख्या महाकाव्याच्या निर्मितीचं निमित्त ठरतो हे विसरता येत नाही. पक्षी पहाटे लवकर जागे होतात हे शास्त्रज्ञ जरूर सांगतील पण त्यामुळे

'उठा उठा चिऊ ताई
सारीकडे उजाडले
डोळे तरी मिटलेले अजूनही'

या कुसुमाग्रजांच्या कवितेचं मोल कमी होत नाही हेही लक्षात घेतलं पाहिजे.

हेन्री डेव्हीड थोरो असो की दुर्गा भागवत असोत त्यांनी प्राणी, पक्षी, निसर्ग यांविषयी इतकं नेटकं लिहून ठेवलंय, की अभिजात वाङ्मयाबरोबरच त्याचं शास्त्रीय मूल्यही वादातीत ठरलं आहे. ललित लेखक अनेकदा शास्त्रज्ञांवर कुरघोडी करताना दिसतो तो त्याच्या या सृजनशीलतेमुळे!

जगातील पक्ष्यांची वर्गवारी सत्तावीस गटांत करण्यात आली आहे. त्यांपैकी वीस गटांतील म्हणजे ८६५० पैकी १२२२ प्रकारचे पक्षी भारतात दिसतात. त्यांत नऊशेहून अधिक स्थानिक तर तीनशे स्थलांतरित जातींचा समावेश आहे. महाराष्ट्रात त्यांपैकी ५२० जातींचे पक्षी आढळतात. महाराष्ट्रातील पक्ष्यांच्या उपजाती आणि प्रांतिक वंश लक्षात घेतले तर ती संख्या २०६० वर जाते, असं मोहन पै यांनी आपल्या The Western Ghats या पुस्तकात म्हटलं आहे. मूळ जातींमध्ये उपजाती मिळवायच्या म्हटलं तर भारतातील पक्ष्यांच्या जातींची संख्या दहा हजारांवर आणि जागतिक संख्या पंचवीस हजारांवर जाईल असं असद रहेमानी म्हणाले.

बीज-प्रसारामध्ये (Seed Dispersal) तांबट मोलाची भूमिका बजावतो असं सारे पक्षिनिरीक्षक म्हणतात. दक्षिण भारतात चंदनाच्या झाडांचं बी पसरवण्यामध्ये तांबटांचा मोठा वाटा आहे, त्यामुळे त्या भागात लोकांना तांबटांविषयी प्रेम वाटतं, असं सलीम अली यांनी 'The Book of Indian Birds' या पुस्तकात नमूद केलं आहे. माणसाला अज्ञात असणाऱ्या अनेक वनस्पतींचं बी पक्ष्यांच्या विष्ठेतून जगभर पसरतं आणि त्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदे माणसाला होत राहतात. पक्ष्यांच्या आतड्यातून बाहेर पडणारं बी झपाट्यानं अंकुरतं आणि ते अधिक सकस असतं असंही सिद्ध झालं आहे.

तांबट फुलातील मकरंद (Nectar) पितात असं निरीक्षण प्रो.याह्या यांनी नोंदवलं आहे. याचा अर्थ परागीभवनासाठी त्यांचा उपयोग होतो हे उघड आहे. माणसाच्या दृष्टीनं उपद्रवी ठरणाऱ्या अनेक कीटकांचा पक्षी नाश करत असतात. सागाची पानं कुरतडणाऱ्या हानिकारक अळ्या फस्त करण्याचं तांबट काम करतात, असं प्रो.याह्या यांनी म्हटलेलं आहे. यामुळे जैवविविधतेमधील या पक्ष्याचं स्थान किती महत्त्वाचं आहे हे स्पष्ट होतं.

पक्ष्यांचं स्थलांतर हा अनेकांच्या जिव्हाळ्याचा विषय! तज्ज्ञांनी त्याविषयी लिहिताना आपल्या मर्यादाही मान्य केलेल्या आहेत. स्थलांतर करताना पक्षी सूर्याच्या स्थितीचा अभ्यास करून आपली दिशा निश्चित करतात, पण हा अभ्यास ते नेमका कसा करतात या प्रश्नाच्या उत्तरात सलीम अलींनी Instinct तर सतीश पांडे यांनी Genetic knowledge या मुद्यांचा समावेश केला आहे.

पक्ष्यांचं स्थलांतर अतिशय वक्तशीर आणि त्यांचा प्रवास अतिशय अचूक असतो. रेड इंडियन लोकांच्या कॅलेंडरमधील महिन्यांची नावं पक्ष्यांच्या आगमन-प्रयाणाशी निगडित असायची असं सलीम अलींनी म्हटलंय.

चिमणीएवढ्या आकाराचा करडा धोबी (Grey Wagtail) हिमालयातून किमान दोन हजार किलोमीटर प्रवास करून न चुकता मुंबईतील एका ठरावीक मैदानात ठरावीक दिवशी नेमका पोचतो असं त्यांनी नोंदवून ठेवलंय. पाणलावा (Snipe) हा पक्षी स्थलांतरासाठी जपान, ऑस्ट्रेलिया आणि टास्मानिया असा चार हजार आठशे किलोमीटरचा प्रवास तर सोनटिटवी (Golden Plover) तीन हजार दोनशे किलोमीटरचा प्रवास एका दमात, कुठेही न थांबता करते. ध्रुवीय कुररी (Arctic Tern) उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत स्थलांतर करून पस्तीस हजार किलोमीटर म्हणजे पृथ्वी प्रदक्षिणेइतका प्रवास दरवर्षी नियमितपणे करते असं अली यांनी नमूद केलं आहे.

वंशसातत्याची प्रेरणा आणि अन्नाचा शोध ही पक्ष्यांच्या स्थलांतराची महत्त्वाची कारणं आहेत. सतीश पांडे यांनी म्हटलं आहे, की Food compulsion, duration of sunlight and breeding instincts initiates migration. स्थलांतराच्या वेळी पक्षी अचूक दिशा कशी पकडतात याविषयी लिहिताना ते म्हणतात, Visual landmarks, position of the sun, moon and stars, magnetic field, gravitational pull, earth's spin and inclination, sound of waves, interflock communication and genetic

knowledge are their navigational tools.
दिवसा सूर्याच्या आणि रात्री ग्रहताऱ्यांच्या अनुरोधानं हजारो किलोमीटरचा प्रवास करून ठरावीक ठिकाणी न चुकता पोचणारे पक्षी पाहिले की घराबाहेरची कबुतरं नेमकी घरात येणं किंवा वाट चुकलेलं तांबटाचं पिल्लू नेमकं वसाहतीत येऊन पोचणं या अगदी किरकोळ घटना वाटतात, पण त्या छोट्याशा प्रवासातही त्यांची 'आंतरिक प्रेरणा' (Instinct) हीच सर्वांत महत्त्वाची बाब ठरते, हे लक्षात घेतलं पाहिजे.

पक्ष्यांना उडण्यासाठी आणि शरीराचं तापमान राखण्यासाठी पिसांचा उपयोग होतो. पंखांचा उपयोग उडण्यासाठी तर शेपटीचा उपयोग डावी-उजवीकडे वळण्यासाठी, वर-खाली जाण्यासाठी आणि गती कमी-जास्त करण्यासाठी होतो. नीट पाहिलं तर वर झेप घेताना त्यांची शेपटी खालून वरच्या दिशेला वळलेली तर खाली उतरताना आणि वेग कमी करताना ती वरून खाली झुकलेली स्पष्ट दिसते. तांबटाची शेपटी भुंडी असल्यामुळे त्याला फार उंचावरून उडता येत नाही. मात्र झाडात ढोली कोरताना जोर लावण्यासाठी तीच शेपटी त्याला उपयोगी पडते.

पक्षी अधूनमधून पंख साफ करताना दिसतात. कारण उड्डाणाच्या क्षमतेवर त्यांचं जीवन अवलंबून असतं. ते वेळ मिळताच एकेक पंख आणि त्यातील एकेक पीस साफ करून आपलं हे शस्त्र परजून ठेवत असतात. खराब झालेली पिसं ते उपटून टाकतात. त्यांच्या जागी यथावकाश नवीन पिसं येतात. पिसांमध्ये उवा किंवा लिखा होऊ नयेत हे कारणही त्यामागे असतं. उवा आणि लिखांपासून पक्ष्यांना संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता असते.

रिचर्ड डॉकिन्स यांनी 'The Selfish Gene' या आपल्या पुस्तकात एका ठिकाणी म्हटलंय की, ''पक्षी चोचीनं आपलं संपूर्ण अंग स्वच्छ करू शकतो पण चोच डोक्यावर पोचणं अशक्य असल्यामुळं स्वतःचं डोकं त्याला साफ करता येत नाही. ते काम दुसऱ्या पक्ष्याला करावं लागतं.'' एक पक्षी दुसऱ्या पक्ष्याचं डोकं साफ करताना दिसतो ते यामुळेच. गाईची पाठ खाजवणारा बगळा किंवा मोठ्या माशांचे दात साफ करणारे छोटे मासे हे याच साहचर्याचं सुंदर उदाहरण आहे.

पक्ष्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात किती अडचणींना तोंड द्यावं लागतं याची कल्पना माणसाला सहजासहजी येणार नाही.

सुरक्षित जागा शोधून घरटी बांधणं, कुणाच्या लक्षात येऊ न देता अंडी घालणं,

घुबडांपासून-सापांपासून त्यांचा सांभाळ करणं, पिल्लं जन्माला आली की शत्रूंपासून सांभाळ करत त्यांना वाढवणं यांसारखी जिकिरीची कामं त्यांना करावी लागतात. घरट्यातून किंवा ढोलीतून पिल्लं खाली पडण्याचा धोकाही असतो. वादळात-पावसात झाडं उन्मळून पडतात, वणव्यात झाडं जळून खाक होतात, त्यांवरील पक्ष्यांचे संसार नष्ट होतात. प्रत्येक वेळी जीवनाचा डाव त्यांना नव्यानं सुरू करावा लागतो. इतकंच काय पण उच्च रक्तदाब, मधुमेह, Atherosclerosis (रक्तवाहिन्या आकुंचित झाल्यामुळे हृदयावर ताण येऊन मृत्युमुखी पडणं किंवा लकवा मारणं) यांसारख्या अनेक आजारांना पक्ष्यांना सामोरं जावं लागतं. पक्ष्यांचे आजार हा विस्तृत विवेचनाचा विषय असून त्यावर संशोधनही विपुल सुरू आहे, असं सतीश पांडे यांनी सांगितलं.

डी.डी.टी.सारख्या कीटकनाशकांच्या वापरामुळे पक्ष्यांची अंडी ठिसूळ होतात. अंडी उबवायला बसलेल्या पक्ष्याच्या वजनामुळे ती फुटून आतील जीव जन्माला येण्यापूर्वीच मरण पावत असल्याचं निरीक्षण मोहन पै यांनी नोंदवलं आहे.

वठलेल्या झाडांमध्ये तांबटांसारखे पक्षी ढोल्या कोरतात. आपल्याकडे अशी झाडं जळणासाठी वापरण्याची पद्धत आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर लाकूडतोड होत असते. त्यातून पक्ष्यांच्या निवासाचे प्रश्न निर्माण होत आहेत. माणसानं चालवलेला निसर्गाचा विध्वंस, जैव विविधतेच्या संवर्धनाचं चुकीचं व्यवस्थापन, मांसासाठी-पिसांसाठी केली जाणारी पक्ष्यांची शिकार, कीटकनाशकांचा बेसुमार वापर, प्रदूषण निर्माण करणारे वायू , माणसाच्या अतिक्रमणामुळे कमी होत चाललेला त्यांचा निवारा, या साऱ्यांमुळे पक्षी आणि प्राणी मोठ्या संकटात सापडले आहेत.

पिल्लं जन्माला आल्यानंतर त्यांना सतत चारावं लागतं. आरंभीचे काही दिवस त्यांना त्यांच्या वजनाच्या दुप्पट खायला द्यावं लागतं असं सलीम अलींनी 'Common Birds' या पुस्तकात म्हटलंय. नर आणि मादी पिल्लांना चारण्यासाठी सतत फेऱ्या मारत असतात. या फेऱ्या मारताना आपलं, आपल्या घरट्यांचं आणि पिल्लांचं अस्तित्व शत्रूच्या नजरेस येऊ नये यांसाठी त्यांना काळजी घ्यावी लागते. प्रत्येक पावलावर, प्रत्येक क्षणी सावध राहावं लागतं.

कोणत्या परिसरात किती खाद्य उपलब्ध आहे, कीटक किती आहेत, फळं किती आहेत याचा पक्ष्यांना आधीच विचार करावा लागतो. एखाद्या परिसरात जर पुरेसं अन्न नसेल,

फळझाडं नसतील तर तिथं घरटी न बांधता, अंडी न घालता तो परिसर सोडून ते निघून जातात. ज्या भागात पिल्लांना अन्न मिळू शकेल अशाच भागात ते घरटी बांधतात, अंडी घालतात. झाडांना फळं धरण्याच्या हंगामात अनेक पक्ष्यांच्या विणीचा हंगाम का येतो ते यामुळे लक्षात यावं.

झाडांवर राहणाऱ्या पक्ष्यांच्या विकासक्रमात सर्वांत वरच्या स्थानी कोण, कावळे की गाणारे छोटे पक्षी (Finch), यावरून आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या संशोधकांत मतभेद आहेत. पक्ष्यांची वर्गवारी आणि गटनिश्चिती करण्याच्या कामी स्वीडीश पक्षीशास्त्रज्ञ Linnaeus यानं Genus हा घटक अविभाज्य मानला, पण आजच्या शास्त्रज्ञांना तो तितकासा महत्त्वाचा वाटत नाही.

माणसाला ज्ञात असणाऱ्या विश्वाबाहेर कितीतरी प्राणी, पक्षी, कीटक, वनस्पती अस्तित्वात असल्याचं मानलं जातं. परिस्थिती सतत बदलत असते. कुठे काहीतरी नष्ट होत असतं तर कुठे काहीतरी नव्यानं जन्माला येत असतं. अशा परिस्थितीत आपल्याला काहीतरी नवीन सापडलं असा दावा करणं, एखादा निष्कर्ष काढणं किंवा 'जितं मया'चा आविर्भाव आणणं हे शहाणपणाचं नाही. 'जेरडॉन कोर्सर' हा पक्षी १८४८ साली टी.सी. जेरडॉन यांना अखेरचा दिसला. त्यानंतर तो अस्तंगत झाला असं मानलं गेलं. पण १९८६ साली तो पुन्हा आंध्र प्रदेशात सापडला. भारत भूषण ह्या मुंबईच्या पक्षिशास्त्रज्ञानं त्याचा नव्यानं शोध लावला. गुलाबी डोक्याचं बदक आणि हिमालयातील लावा हे पक्षी कायमचे नाहीसे झाले असं काहीजण मानतात तर ते अजूनही अस्तित्वात आहेत असं काहीजणांचं मत आहे.

विषय मिळाला आणि पुस्तक लिहायचं ठरवलं तेव्हा खूप 'एक्साईट' झालो होतो. पुस्तकाची निर्मिती, खप, अनुवाद, मानधन, पारितोषिकं... अशा स्वप्नांत मश्गुल होतो. पण विषयात गुंतत गेलो तसतशा त्या गोष्टी कमी महत्त्वाच्या वाटू लागल्या. खोलात जाऊ लागलो तसतसं आपलं अज्ञान किती मोठं आहे हे लक्षात येऊ लागलं. ॲरिस्टॉटलपासून सलीम अलींपर्यंत अनेक दिग्गजांनी पक्षिशास्त्राच्या क्षेत्रात इतकं प्रचंड काम करून ठेवलंय की त्यामुळे छाती दडपून गेली. न्यूनगंड निर्माण होतो की काय अशी भीती निर्माण झाली. कधी निराशही झालो. मनात विचार आला, की अशी पुस्तकं लिहून काय साध्य होणार आहे? निसर्गाचा संहार, प्राणीहत्या, पक्ष्यांचे बाजार, पृथ्वीचं वाढतं तापमान आपण रोखू शकणार आहोत का?

गेल्या तीनशे वर्षांत भारतातून एकशेवीस सस्तन प्राणी आणि दीडशे पक्षी नामशेष झाले. गेल्या शतकात चित्ता आणि एकशिंगी गेंडा नाहीसा झाला. जवळपास ऐंशी जातींचे प्राणी, पन्नास जातींचे पक्षी आणि वीस उभयचरांच्या जातींना धोका निर्माण झाला. प्राणी-पक्ष्यांच्या संचारावर बंधनं आली.

शेकरू हा प्राणी म्हणजे महाराष्ट्राचं निसर्ग मानचिन्हं. तो जमिनीवर कधी उतरत नाही. वृक्षराजींचे अच्छादन (Canopy) हा त्याचा रस्ता! पण वृक्षतोड झाल्यामुळे भीमाशंकरच्या आणि अन्य अरण्यांतून त्याचं बाहेर पडणं बंद झालं. आपल्याकडे एकेकाळी नऊशे माळढोक होते असे जाणकार म्हणतात, ती संख्या पन्नासपेक्षाही कमी झाली.

१९७३ ते १९९५ या बावीस वर्षांच्या काळात Western Ghats क्षेत्रातील (महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ, तामीळनाडू) जंगलं पंचवीस टक्क्यांनी कमी झाली. हे प्रमाण भारतातील सर्वच जंगलांच्या बाबतीत लागू असून दरवर्षी सुमारे अडीच टक्के जंगलांचा नाश होत आहे असं मोहन पै यांनी म्हटलं आहे.

नजिकच्या भविष्यात पक्ष्यांचं भवितव्य काय, या प्रश्नाला असद रहेमानी यांनी "Terrible" असं उत्तर दिलं आणि मी हबकून गेलो. जगाच्या विकासाचं नियोजन करणारे अर्थशास्त्रज्ञ जोवर चंगळवाद आणि खरा विकास यांतील अर्थ समजून घेत नाहीत तोवर परिस्थितीत सुधारणा होणं अवघड आहे असं ते म्हणाले. जगभरची संवेदनाहीन सरकारं आणि बधिर नेते यांच्या नाकर्तेपणाबद्दलची खंतही त्यांच्या बोलण्यातून दिसून आली.
हे सारं ऐकत असताना, पाहत असताना, वाचत असताना अस्वस्थ व्हायला होत होतं. 'What we are doing to the forests of the world is but a minor reflection of what we are doing to ourselves and to one another', असं महात्मा गांधींनी म्हटलंय, त्याची आठवण झाली.

माणूस हा काही निसर्गाचा निर्माता नाही, तर तो त्याचा एक भाग आहे, त्याला जर काही निर्माण करता येत नसेल तर जे आहे त्याचा विध्वंस करण्याचा तरी त्याला काय अधिकार आहे?

पक्ष्यांविषयी आपण वेद-उपनिषदांमधले दाखले देऊन बोलतो, संतमहंतांची उदाहरणं देतो, गरुड हे विष्णूचं, मोर हे सरस्वतीचं वाहन आहे यासारखी मिथकं मांडतो, पण पक्ष्यांना

वाचवण्यासाठी किंवा निसर्गाच्या संवर्धनासाठी नेमकं काय करतो हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

सर्वेऽत्रः सुखिनः सन्तु
सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चित् दुःखमाप्नुयात

या प्रार्थनेतील 'सर्वे' म्हणजे केवळ 'माणूस' नव्हे! त्यात पशू-पक्षी, सरपटणारे प्राणी, कीटक, फुलपाखरं, वनस्पती, शेवाळ सारं काही आलं. जे जे चैतन्यशाली आहे त्या सर्वांस सुख लाभो असा या प्रार्थनेचा अर्थ आहे, पण प्रत्यक्षात आपण 'सर्वे' म्हणजे फक्त माणूस असे समजतो.

सृष्टीच्या ह्या पसाऱ्यातील सजीवांची संख्या नमूद करणं ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. केवळ कीटकांच्या जाती मोजायच्या झाल्या तरी ती संख्या तीस लाखांवर जाईल असं रिचर्ड डॉकिन्स यांनी म्हटलं आहे. ते म्हणतात,'ऑक्टोपस असो, उंदीर असो वा ओक वृक्ष, या तिघांचा परस्परांशी काही संबंध नसला तरी पुनर्निर्मितीची त्यांच्यातील प्रेरणा सारखीच आहे'. यांतील प्रत्येकाला जगायचंय, टिकून राहायचंय, आपला वंश वाढवायचाय... त्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरू आहे. वर्षांनुवर्षं अव्याहतपणे सुरू असणाऱ्या निसर्गाच्या ह्या व्यवस्थेमध्ये माणसानं हस्तक्षेप का करावा? 'सहजीवना'चा खरा अर्थ समजून घेऊन हे जग, आपली ही पृथ्वी अधिक सुंदर व्हावी म्हणून पुढं येण्याचं शहाणपण त्याला खऱ्या अर्थानं कधी सुचणार आहे?

पक्ष्यांसाठी माणसाला अनेक गोष्टी करता येतील. झाडं लावणं, ती जगवणं, मुलांच्या मनात निसर्गाविषयी प्रेम निर्माण करणं, साऱ्यांना मूलभूत स्वरूपाचं निसर्गशिक्षण देणं, प्रदूषणाशी संबंधित उद्योगधंद्यांवर निर्बंध आणणं, त्यासाठी कडक कायदे करणं, खतं-कीटकनाशकांच्या वापराचा पुनर्विचार करणं, इंधन म्हणून लाकडाच्या वापरावर बंदी आणणं, पक्ष्यांच्या शिकारीवर आणि त्यांच्या व्यापारावर बंदी घालणं, निसर्गसहली, गिरिभ्रमण, पक्षिनिरीक्षण यांच्याशी संबंधित विविध उपक्रम हाती घेणं... ही यादी बरीच वाढवता येईल, पण ते नुसतं कोरडं भाषण केल्यासारखं होईल. माणूस आणि निसर्ग यांना आतून घट्ट जोडणारं आणि या नात्याचा कल्याणकारी प्रत्यय देणारं असं काहीतरी व्हायला पाहिजे असं मनात आलं, पण म्हणजे नेमकं काय करायचं? कोण करणार? कधी?

हे लेखन सुरू असताना नकळत कधीतरी चिमणीचा खोपा (Sparrow Shelter) आणला आणि तो घरात बाहेरच्या गॅलरीत लावला. तिथं नियमितपणे तांदळाच्या कण्या, बाजरीचे दाणे टाकू लागलो. चिमण्या येऊ लागल्या, दाणे टिपू लागल्या, चिवचिवाट करत नाचू लागल्या.

सुरेखानं जांभळीकडच्या गॅलरीत, जाळीला पाण्याचं एक भांडं बांधलं. कावळे तिथं सकाळ-संध्याकाळ नेमानं येऊन पाणी पिऊ लागले. लोखंडी जाळीवर तिरका बसून, चोचीत पाणी भरून घेत, मान वर करून लबालब पाणी पिणारा कावळा पाहण्यासारखा आनंद नाही. पाण्याचे घोट घेताना त्याच्या कंठावरील करड्या-काळ्या, चकचकीत पिसांची जी हालचाल होते ती पाहून समाधी लागल्यागत होतं.

आम्ही 'कबुतरांना ह्या घरात थारा नाही' असा निर्णय घेतला होता, पण त्यांच्याविषयी मनाच्या कोपऱ्यातलं प्रेम जागंच राहिलं. त्यांची अधूनमधून घरात होणारी घुसखोरी क्षम्य मानण्याइतपत आम्ही सहनशील झालो.


नोकरीच्या निमित्तानं महाराष्ट्रभर फिरताना अनेक शेजारी मिळाले, पण मुंबईसारख्या सिमेंटचं जंगल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात तांबटानं जो शेजार दिला त्याला तोड नाही. एक क्षण तर असा आला, की मी 'तांबटा'ला साकार करत आहे की तांबट मला घडवत आहे यातला फरक कळेनासा झाला...

तांबट आणि त्याच्या आडून निसर्ग मला बरंच काही शिकवत होता; आतून बदलवत होता, घडवत होता, समृद्ध करत होता. हा अनुभव व्यक्त करण्यासाठी त्यानं माध्यम म्हणून आपली निवड करावी या सारखा माझा दुसरा सन्मान होणे नाही.

'वॉल्डन'चे लेखक हेन्री डेव्हिड थोरो एकदा बागेत काही काम करत होते. तेवढ्यात तिथं एक पक्षी आला आणि त्यांच्या खांद्यावर बसला. त्यावर थोरो म्हणाले,''मला माझा अत्यंत सन्मान झाला असं वाटलं. कुठलंही सन्मानसूचक पदक तिथं लटकावलं असतं तरी त्यामुळे माझा असा सन्मान झाला नसता.''

असा एखादा क्षण आपल्या आयुष्यात यावा, एखादा पक्षी आपल्या खांद्यावर येऊन बसावा आणि तिथंच आपल्या आयुष्याची इतिश्री व्हावी; असं मलाही
या लेखन-प्रवासात वाटायला लागलं.

■■



**काही संदर्भ :**

*Biology Of Indian Barbets*
Prof. H.S.A.Yahya
Authorpress 2001, University Of Chicago

*The Book of Indian Birds* (Thirteenth Edition)
Dr. Salim Ali,
Bombay Natural History Society, Oxford University Press

*Common Birds*
Dr. Salim Ali & Laeeq Fatehally
National Book Trust, India

*Hand book of the birds of India and Pakistan,*Vol.- 4,
Dr. Salim Ali, S. Dillon Ripley
Oxford University Press

*The Western Ghats*
Mohan Pai
M/s. Narcinva Damodar Naik, Goa.

*The Selfish Gene*
Richard Dawkins
Oxford University Press, Indian Edition (2008).

*Gay-neck -The Story of a Pigeon*
Dhan Gopal Mukerji
National Book Trust, India

*Birds of Western Ghats, Konkan and Malabar* (including Birds of Goa)
Satish Pande, Saleel Tambe, Clement Francis M., Niranjan Sant
Bombay Natural History Society, Oxford University Press

*विश्वकोश* : खंड ७

*चित्रग्रीव* : धन गोपाल मुखर्जी - अनुवाद : मारुती चितमपल्ली
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

*पक्षिकोश* - मारुती चितमपल्ली,
साहित्य प्रसार केंद्र.

*वॉल्डनकाठी विचार विहार* - हेन्री डेव्हिड थोरो यांच्या काव्यमय ग्रंथाचा
दुर्गा भागवतकृत अनुवाद,
मॅजेस्टिक प्रकाशन.

*भावमुद्रा*
दुर्गा भागवत,
मौज प्रकाशन.

*पक्षीनिरीक्षण*
एस.बी.कुळकर्णी,
मॅजेस्टिक प्रकाशन.

*सखा नागझिरा*
किरण पुरंदरे,
निसर्गवेध प्रकाशन.

*कापशीची डायरी*
किरण पुरंदरे,
निसर्गवेध प्रकाशन, पुणे.

*देशोदेशीचे राजपक्षी*
दिगंबर गाडगीळ
प्रतीक प्रकाशन.

■■



प्रल्हाद दत्तात्रय जाधव

जन्म : २५ ऑक्टोबर, १९५६

वास्तव्य : अंगाई, पोलादपूर, जि.रायगड, पिन : ४०२३०३.

शिक्षण : एम.ए., बी.जे.

सेवा : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे संचालक
(शासकीय वसाहत, १४-सागर बी रोड-चर्चगेट, मुंबई-४०० ०२०)

लेखन : पाण्यातले दिवस, रानभूल, गॅलरीतील रातराणी हे ललित लेखन
शेवंता जित्ती हाय, हिरण्यगर्भ, यमक ही नाटकं
ढग, जिनिअस हे एकांकिका संग्रह प्रसिद्ध.
विविध वृत्तपत्रं, नियतकालिकांतून मोजकं पण वेधक लेखन.

लेखनासाठी शासन आणि अन्य संस्थांचे अनेक पुरस्कार.

अधिक साहित्यासाठी : www.pralhadjadhav.com